उत्कृष्ट क्वालिटी
जिरे २८०/- रु. किलो
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.३५४ ■ रविवार २७ सप्टेंबर २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ८

POST REGD.No./DHL/53/24-26

भतवाल हॉस्पिटल
म्हणजेच
गंगाराम हॉस्पिटल
अग्रवाल नगर,मालेगाव रोड, धुळे
मो.नं. 9158587711

## लोकनेते दाजीसाहेब रोहिदास पाटील

माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य



### यांच्या द्वितीय स्मृती दिनानिमित्त

# अभिवादन सोहळा

व

### लोकनेते दाजीसाहेब रोहिदास पाटील

# जनसेवा पुरस्कार सोहळा

**रविवार, दिनांक २७ सप्टेंबर २०२६ । वेळ : सकाळी ११.00 वाजता**

**शुभहस्ते**



**मा. श्री. सी. आर. पाटील**
केंद्रीय जलशक्ती मंत्री, भारत सरकार

**पुरस्कारार्थी**



**मा. श्री. विलास विष्णू शिंदे**
संस्थापक, सह्याद्री फार्म्स, नाशिक

**अध्यक्ष**



**मा. श्री. राहुल नार्वेकर**
विधानसभा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य

**प्रमुख अतिथी**



**ना.श्री. गिरीश महाजन**
मंत्री, जलसंपदा



**ना.श्री. जयकुमार रावल**
मंत्री, पणन व राजशिष्टाचार



**ना.श्रीमती रक्षाताई खडसे**
केंद्रीय क्रीडा व युवक कल्याण राज्यमंत्री



**ना.श्री. गुलाबराव पाटील**
मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता



**ना.श्री. दादाजी भुसे**
मंत्री, शालेय शिक्षण



**ना.श्री. जयकुमार गोरे**
मंत्री, ग्रामविकास



**ना.श्री. संजय सावकारे**
मंत्री, वस्त्रोद्योग



**आ.श्री. अमरिशभाई पटेल**
माजी मंत्री



**आ.श्री. संजय पाठक**
माजी मंत्री, मध्य प्रदेश



**आ.श्री. योगेश टिळेकर**
ओबीसी मोर्चा प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य

लोकनेते दाजीसाहेब रोहिदास पाटील,माजी मंत्री महाराष्ट्र राज्य, यांच्या द्वितीय स्मृतीदिनानिमित्त आयोजित अभिवादन व जनसेवा पुरस्कार सोहळ्यास आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

**निमंत्रक**

**विनय रोहिदास पाटील**
अध्यक्ष, लोकनेते दाजीसाहेब रोहिदास पाटील सामाजिक कृतज्ञता ट्रस्ट, धुळे

**कुणाल रोहिदास पाटील**
माजी आमदार, धुळे ग्रामीण

**रविवार, दिनांक २७ सप्टेंबर २०२६ । वेळ : सकाळी ११:०० वाजता । स्थळ : श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्थेचे कॉलेज मैदान, देवपूर, धुळे.**

# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

POST REGD.No./DHL/53/24-26

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.३५४ ■ रविवार २७ सप्टेंबर २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४


## धुळे जिल्ह्यातील चारसह दोनशे पासष्ट तालुक्यांत दुष्काळ जाहीर
## पंचनामे पूर्ण झाल्यावर डीबीटीद्वारे बँक खात्यात मदत मिळणार

**मुंबई, दि. २६ : अपुऱ्या पावसामुळे निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सरकारने राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला आहे. राज्यातील एकूण ३५८ तालुक्यांपैकी सुमारे ७५ टक्के तालुक्यांचा दुष्काळग्रस्त भागात समावेश करण्यात आला आहे. त्यात धुळे जिल्ह्यातील चारही तालुक्यांचा समावेश आहे. मात्र, दुष्काळ जाहीर झाल्यानंतरही प्रत्यक्ष मदत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी काही काळ लागणार असल्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी म्हटले आहे. त्यांच्या या वक्तव्यावरून राजकीय प्रतिक्रिया उमटल्या आहेत.**



परभणी जिल्ह्यातील पाथरी येथे बोलताना सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी यंदाच्या दुष्काळाची परिस्थिती गंभीर असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांची फी, टँकरद्वारे पाणीपुरवठा, वीज बिल यासह विविध प्रकारची मदत केली जाणार असून एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. मात्र, प्रत्यक्ष मदत वितरणामध्ये काही तांत्रिक अडचणी (पान ८ वर)

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या तालुक्यांमधील परिस्थितीबाबत तत्काळ पंचनामे सुरु करावेत असे निर्देश संबंधित जिल्हाधिकारी यांना दिले आहेत.पावसाअभावी शेतकऱ्यांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. दुष्काळी परिस्थिती जाहीर झालेल्या तालुक्यांमध्ये तत्काळ सर्व्हेक्षण करावे लागणार आहे. यासाठी महसूल विभाग, कृषि तसेच संबंधित सर्व यंत्रणांनी संवेदनशीलतेने आणि समन्वयाने काम करावे. त्यासाठी क्षेत्रीयस्तरावर सुसंवाद आणि संपर्क ठेवावा. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी या कामाला प्राधान्य द्यावे, असे निर्देशही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

## कबड्डीत दुहेरी सुवर्ण पुरुषांचा इराणवर विजय

नवी दिल्ली, दि. २६ : आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये भारताच्या पुरुष कबड्डी संघाने सुवर्णपदकावर नाव कोरले आहे. अंतिम सामन्यात भारताने इराणचा ४०-३४ असा पराभव करत सुवर्णपदक पटकावले. पहिल्या हाफमध्ये पिछाडीवर असलेल्या भारतीय संघाने दुसऱ्या हाफमध्ये जोरदार पुनरागमन करत सामना आपल्या बाजूने फिरवला. अंतिम सामन्याच्या पहिल्या हाफमध्ये इराणने भारतावर १८-१७ अशी आघाडी घेतली होती. त्यामुळे सामन्यात चुरस निर्माण झाली होती. मात्र, दुसऱ्या हाफमध्ये भारतीय खेळाडूंनी आक्रमणासोबतच बचावातही प्रभावी कामगिरी केली. भारताने दुसऱ्या हाफमध्ये २३ गुण मिळवले, तर इराणला १६ गुणांवर समाधान मानावे (पान ८ वर)

## धुळ्यात आज लोकनेते दाजीसाहेब रोहिदास पाटील अभिवादन; जनसेवा पुरस्कार सोहळ्याची तयारी पूर्ण

**धुळे, दि.२६- लोकनेते दाजीसाहेब रोहिदास पाटील अभिवादन व जनसेवा पुरस्कार सोहळ्याची जय्यत तयारी झाली असून केंद्रीय जलशक्ती मंत्री ना. सी.आर.पाटील यांच्या हस्ते तर महाराष्ट्र विधानसभा अध्यक्ष राहूल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. लोकनेते दाजीसाहेब रोहिदास पाटील यांच्या व्दितीय पुण्यतिथीनिमित्ताने उद्या रविवार दि.२७ सप्टेंबर २०२६ हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात येणार आहे. राष्ट्रीय पातळीवर कृषी क्षेत्रात उल्लेखनिय योगदान दिल्याबद्दल सह्याद्री फार्मचे संस्थापक श्री विलास शिंदे यांना यंदाचा जनसेवा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. हा पुरस्कार महाराष्ट्रात मानाचा पुरस्कार म्हणून मानला जातो.**



महाराष्ट्राचे माजी मंत्री लोकनेते दाजीसाहेब रोहिदास पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्ताने दरवर्षी मान्यवर व्यक्तीस जनसेवा पुरस्काराने सन्मानित करण्यात येत असते.मागील वर्षी पहिला जनसेवा पुरस्कार ज्येष्ठ सामाजसेवक डॉ. विकास आमटे यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते देण्यात आला होता.त्यामुळे लोकनेते दाजीसाहेब रोहिदास पाटील जनसेवा पुरस्कार हा मानाचा पुरस्कार आहे. यंदा हा पुरस्कार सोहळा उद्या रविवार दि.२७ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वा. एस.एस.व्ही. पी.एस. कॉलेज मैदान देवपूर,धुळे येथे आयोजित करण्यात आला आहे. लोकनेते दाजीसाहेब रोहिदास पाटील पाटील यांच्या व्दितीय पुण्यतिनिमित्ताने राष्ट्रीय पातळीवरील कृषी क्षेत्रातील नामांकित उद्योजक नाशिक येथील सह्याद्री फार्म्स कंपनीचे अध्यक्ष विलास शिंदे यांना यंदाचा मानाचा पुरस्कार देण्यात येणार असल्याचे मा.आ.कुणाल पाटील यांनी कार्यक्रमात जाहिर केले. यावेळी मा.आ.पाटील यांनी सांगितले कि,असंख्य शेतकऱ्यांना एकत्र करुन त्यांनी सहकार तत्वावर शेती करण्याचा प्रयोग केला आहे. जगात ४० हून अधिक देशात त्यांनी स्थापन केलेल्या सह्याद्री फार्म्स या कपंनीचे उत्पादन निर्यात केले जात असतात. केंद्रीय जलशक्ती मंत्री ना.सी.आर.पाटील यांच्या हस्ते विलास शिंदे यांचा सन्मान करण्यात येणार आहे. अभिवादन आणि जनसेवा पुरस्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र विधानसभा अध्यक्ष ना.राहूल नार्वेकर हे राहणार आहेत. तर कार्यक्रमाला प्रमुख अथिती म्हणून राज्याचे जलसंपदा मंत्री ना.गिरीष महाजन, पालकमंत्री ना.जयकुमार रावल,केंद्रीय क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. रक्षाताई खडसे, पाणी पुरवठा मंत्री ना.गुलाबराव पाटील, शालेय शिक्षण मंत्री ना.दादाजी भुसे,ग्रामविकास मंत्री ना. जयकुमार गोरे, वस्त्रोद्योग मंत्री ना.संजय सावकारे, माजी मंत्री आ.अरिशभाई पटेल, मध्यप्रदेशचे माजी मंत्री आ.संजय पाठक, भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष आ.योगशे टीळेकर यांच्यासह उत्तर महाराष्ट्रातील आजी माजी मंत्री,खासदार,आमदार,तसेच विविध पक्ष संघटनेतील पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. तरी अभिवादन आणि पुरस्कार वितरण सोहळ्याला उपस्थित रहावे असे आवाहन श्री विनय पाटील,अध्यक्ष लोकनेते दाजीसाहेब रोहिदास पाटील सामाजिक कृतज्ञता ट्रस्ट, मा.आ.कुणाल बाबा पाटील यांनी केले आहे.

## नंदुरबार जि.तील सर्व तालुके दुष्काळी बारा प्रकारच्या विविध सवलती लागू

**नंदुरबार, दि.२६ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र शासनाने खरीप २०२६ हंगामातील पर्जन्यमानातील तूट आणि अन्य निकषांच्या आधारे राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती असल्याचे जाहीर केले आहे. त्यात नंदुरबार जिल्ह्यातील सर्व तालुक्यांच्या समावेश असल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ नुसार करण्यात आलेल्या मूल्यांकनात या तालुक्यांमध्ये प्रथम कळ लागू झाल्याचे आयुक्त, कृषी यांच्या अहवालातून स्पष्ट झाले आहे. या यादीत नंदुरबार जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचा समावेश असल्याने जिल्ह्यात दुष्काळी उपाययोजना आणि विविध सवलती लागू होणार आहेत.**

शासनाच्या निर्णयानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने पंचनाम्याची कार्यवाही सुरू करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. सर्वेक्षण केलेल्या क्षेत्रातील पिकांची सद्यस्थिती दर्शविणारी छायाचित्रे तसेच जिपीएस कोऑर्डिनेट संकलित करून पिक परिस्थितीचा अहवाल आयुक्त, (पान ८ वर)

## मिल परिसरात तरुणावर हल्ला

धुळे, दि.२६- शहरात मिल परिसरातील श्रीराम नगर चौकात किरकोळ कारणावरून तरुणाला मारहाण करीत त्याच्यावर तलवारीने हल्ला करण्याचा प्रयत्न करण्यात आला. शुक्रवारी (ता. २५)रोजी रात्री घडली असून मोटारसायकलचीही तोडफोड करण्यात आली. या प्रकरणी धुळे शहर पोलीस ठाण्यात चार संशयिताविरुद्ध गुन्हा दाखल झाला.

मिल परिसरातील तुषार गजानन शिरसाठ (रा. अहिल्यादेवी नगर, धुळे) याला रात्री पावणे दहाच्या सुमारास श्रीराम नगर चौकाजवळ एकाने कारण नसताना शिवीगाळ केली. (पान ८ वर)

## प्रशासनाची पावसाची नोंद संशयास्पद राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे अहवालाची मागणी

**शिरपूर दि.२६ (का.प्र.) : तालुक्यातील प्रत्येक महसूल मंडळांमध्ये झालेल्या पावसाची महसूल विभागाने केलेली नोंद संशयास्पद असून जादा पाऊस दाखवल्यामुळे शेतकरी संभाव्य भरपाईपासून वंचित राहण्याची शक्यता असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी केला असून गावनिहाय स्वतंत्र वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करावा अशी मागणी केली आहे.**

पक्षाचे जिल्हाध्यक्ष जितेंद्र मराठे यांनी २५ सप्टेंबरला राष्ट्रवादी काँग्रेस किसान सभेचे प्रदेश उपाध्यक्ष सयाजीराव ठाकरे, जिल्हाध्यक्ष गुलाबराव पाटील, तालुकाध्यक्ष व्यंकटेश पाटील, विधानसभा क्षेत्रप्रमुख दिलीप पाटील, विद्यार्थी आघाडीचे जिल्हाध्यक्ष गौरव पाटील, शिंदखेडा तालुका कार्याध्यक्ष देविदास मोरे, मोहन कोळी, रब्बा पावरा, ॲड.रोहित पाटोळे, राजेंद्र पाटील, ज्ञानेश्वर पाटील, नथू पाटील यांना सोबत घेऊन शिरपूर तालुक्याचा दौरा केला. यादरम्यान त्यांनी विविध गावांच्या शिवारात शेताच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांशी (पान ८ वर)

## विसर्जन प्रसंगी पाण्यात बुडाल्याने युवकाचा मृत्यू

धुळे, दि.२६- गणपती विसर्जनासाठी गेलेल्या युवकाचा नाल्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना फागणे (ता.धुळे) येथे घडली.

ओम उर्फ गणेश नितीन शिंदे (वय १६, रा. फागणे) असे त्याचे नाव आहे. शुक्रवारी (ता.) सायंकाळी सातच्या सुमारास घडली. ओम शिंदे हा त्याच्या घरातील गणपतीचे विसर्जन करण्यासाठी नातेवाईकांसह गेला होता, यावेळी मूर्ती घेऊन तो पाण्यात उतरला, पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने तो पाण्यात बुडाला. नातेवाईकांसह तेथील काहींनी त्याला बाहेर काढून देवपूर (पान ८ वर)

## अतिक्रमणासह अवाढव्य वाहनांमुळे गणेश विसर्जन मिरवणुकीत खोळंबा

**सोनगीर दि. २६( प्रतिनिधी)- येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही गणेशोत्सव मोठ्या उत्साहात आणि धुमधडाक्यात साजरा झाला. गेल्या काही वर्षांपासून सार्वजनिक गणेश मंडळांमध्ये भव्य आणि मोठ्या गणेशमूर्ती स्थापन करण्याची स्पर्धा पाहायला मिळत आहे. मात्र, यंदा अनंत चतुर्दशीच्या विसर्जन मिरवणुकीत अरुंद रस्ते, अतिक्रमणाचा विळखा आणि बँड पथकांच्या अवाढव्य वाहनांमुळे मोठा व्यत्यय निर्माण झाला. माळी मंगल कार्यालयाजवळील अरुंद जागेत एका मंडळाचे बँडची गाडी अडकल्याने तब्बल दीड ते पावणेदोन तास मिरवणूक ठप्प झाली होती.**

गावातील सर्व प्रमुख सार्वजनिक गणेश मंडळांच्या विसर्जन मिरवणुका अनंत चतुर्दशीला दुपारी पारंपरिक वाद्ये आणि बँड पथकांच्या गजरात सुरू होतात. भव्य गणेशमूर्तींसाठी विशेष ट्रॉल्या आणि बँड पथकांसाठी आकर्षक सजावट केलेली वाहने वापरली जातात. मात्र, या सजावटीमुळे वाहनांची लांबी व उंची मानक प्रमाणापेक्षा अधिक वाढलेली (पान ८ वर)

## ढोल-ताशांच्या गजरात, गुलाल उधत गणेश विसर्जन हरिहर भेटीने डोळ्यांचे पारणे फिटले; महिलांचा सहभाग



**नंदुरबार, दि.२६ (प्रतिनिधी)- गुलालाची प्रचंड उधळण, ढोल-ताशांचा निनाद आणि हजारो भाविकांच्या उत्साहात नंदुरबार शहरातील गणेश विसर्जन मिरवणुकांची तब्बल २१ तासांनंतर दुसऱ्या दिवशी सकाळी सांगता झाली. काल दुपारपासून सुरू झालेल्या मिरवणुका रात्री उशिरापर्यंत सुरू होत्या. मध्यरात्रीनंतर जळका बाजार परिसरात श्री दादा गणेश आणि श्री बाबा गणेश यांची हरिहर भेट झाली. हा नयनरम्य सोहळा पाहण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.**

मध्यरात्रीपर्यंत शहरातील प्रमुख मार्गांवर ढोल-ताशांचा आवाज घुमत होता. त्यानंतर आवाजाची तीव्रता कमी झाली असली तरी गणेश विसर्जन मिरवणुका सकाळी ७ वाजेपर्यंत सुरूच होत्या. सोनी विहिरी येथे क्रेनच्या सहाय्याने गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले, तर अन्य गणेशमूर्तींचे प्रकाशा येथील तापी नदीपात्रात विसर्जन करण्यात आले. नंदुरबारच्या गणेशोत्सवाला १३९ वर्षांची (पान ८ वर)



## बांधावर पोहोचल्या खा.डॉ. बच्छाव दुष्काळी परिस्थितीची घेतला आढावा

**धुळे, दि.२६- धुळे लोकसभा मतदारसंघातील धुळे तालुक्यात निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर खासदार डॉ. शोभा बच्छाव यांनी आज दि.२६ सप्टेंबर २०२६ रोजी प्रत्यक्ष गावागावांत जाऊन शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचत परिस्थितीची पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून त्यांच्या अडचणी, पिकांची सद्यस्थिती आणि उपलब्ध पाण्याबाबत माहिती जाणून घेतली.**

धुळे तालुक्यातील आर्वी, हेंद्रुण, मोघण व पूरमेपाडा आदी गावांना भेट देत खासदार डॉ. बच्छाव यांनी शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन पिकांची पाहणी केली. पावसाचे प्रमाण, खरीप पिकांची स्थिती, पिकांचे संभाव्य नुकसान, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता तसेच पशुधनासाठी चारा व पाण्याची परिस्थिती याबाबत त्यांनी शेतकऱ्यांकडून प्रत्यक्ष माहिती घेतली.

यावेळी दुष्काळसदृश परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या अडचणींबाबत शेतकऱ्यांनी खासदार डॉ. बच्छाव यांच्याशी संवाद साधला. शेतकऱ्यांनी काळजी (पान ८ वर)

## पुढच्या वर्षी लवकर या..ची आर्त हाक देत लाडक्या गणरायाला भक्तांचा भावपूर्ण निरोप

**धुळे, दि.२६- अनंत चतुर्दशीनिमित्त विविध लहान मोठ्या गणेश मंडळांनी लाडक्या गणरायाला पुढच्या वर्षी लवकर या...ची आर्त हाक देत भावपूर्ण निरोप दिला. यावर्षी मोठ्या आकर्षक बाप्पाच्या मुर्तींनी धुळेकरांचे लक्ष वेधुन घेतले. लहान मंडळांसह घरगुती गणपती बाप्पाच्या मुर्तींचे पांझरा नदी किनारी महापालिकेने ठेवलेल्या पाण्याच्या टाक्यांमध्ये विसर्जनासह निर्माल्य संकलनही करण्यात आले.**



गणेशोत्सवानिमित्त शहरातील मंडळांनी लहान मोठ्या आरास, सजिव देखावे, प्रबोधनात्मक नाटीका सादर करून भाविकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला. सामाजिक, राजकीय तसेच व्यापाऱ्यांनी देखील आपापल्या आस्थापनांमध्ये गणपती बाप्पाच्या देखण्या (पान ८ वर)

## जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची ६९ वी वार्षिक सभा संपन्न बँकेच्या प्रगतीत सभासदांचे सहकार्य मोलाचे- राजवर्धन कदमबांडे

**धुळे, दि.२६- आपल्या धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., धुळे ची ६९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा आज दि. २६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता अत्यंत उत्साहात आणि खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. सभेचे अध्यक्षस्थानी बँकेचे अध्यक्ष राजवर्धन कदमबांडे यांनी भुषवले.**

यावेळी मंचावर बँकेचे अध्यक्ष राजवर्धन कदमबांडे यांच्यासह बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज चौधरी व बँकेचे सर्व सन्माननीय संचालक मंडळ उपस्थित होते.

बँकेचे सन्माननीय संचालक प्राध्यापक शरद पाटील यांनी बँकेच्या गेल्या वर्षभरातील कामगिरीचा आढावा घेतला. ते म्हणाले की, धुळे आणि नंदुरबार या दोन्ही जिल्ह्यातील शेतकऱ्यांची व सामान्य जनतेची आर्थिक वाहिनी म्हणून आपली जिल्हा बँक काम करत आहे. नोटाबंदी, कोरोना काळात देखील सभासदांनी दाखवलेला विश्वास आणि कर्मचाऱ्यांचे कष्ट यामुळेच हे शक्य झाले आहे. त्यानंतरची आर्थिक आव्हाने पेलून बँकेने सातत्याने प्रगतीचा



आलेख उंचावला आहे यंदाच्या आर्थिक वर्षात बँकेने उत्पन्नात समाधानकारक वाढ नोंदवली असून एन.पी.ए. (नॉन-परफॉर्मिंग असेट्स) कमी करण्यात बँकेने यश मिळवले आहे.

दरवर्षी शेती पीक कर्जाची ९४ % ते ९५ % वसुली होत असतें म्हणून प्रा.शरद पाटील यांनी शेतकरी सर्व सभासदांचे आभार मानले

बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज चौधरी यांनी मागील आर्थिक वर्षाचा सविस्तर ताळेबंद, नफा-तोटा पत्रक आणि ऑडिट अहवाल सभेसमोर सादर केला. त्यांनी चालू आर्थिक वर्षासाठीच्या विविध योजना आणि उद्दिष्टांची माहिती दिली. शेतकऱ्यांना वेळेवर शेती पीक कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी बँक कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. विषय पत्रिकेवरील सर्व विषयांचे वाचन त्यांनी केले.

सादर करण्यात आलेल्या अहवालावर उपस्थित सभासदांनी सविस्तर चर्चा केली. काही सभासदांनी मांडलेल्या सूचनांचे व प्रश्नांचे (पान ८ वर)


**दिपक ज्वेलर्स**

सोने- 22 K -1,38,950 रु.+3% GST

सोने- 24 K -1,51,000 रु.+3% GST

चांदी- 2,35,000 रु.+3% GST

तारगल्ली, सराफ बाजार, धुळे

फोन नं.२३३१०३/२३४१०३


## नवापूर पोलिसांची मोठी कारवाई मो.सायकल, मोटारी चोरांना अटक

**नवापूर, दि.२६(प्रतिनिधी)- नवापूर पोलीस ठाण्याच्या पथकाने मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यांचा तपास करताना एकूण ११ चोरीच्या मोटारसायकली हस्तगत करून सहा गुन्हे उघडकीस आणले आहेत. तसेच इन्व्हर्टर, बॅटरी व चार्जर चोरी आणि पाण्याची मोटार चोरीचे दोन गुन्हेही उघडकीस आणून मुद्देमाल जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे.**

नवापूर शहर व परिसरात मोटारसायकल चोरीच्या घटना घडल्याने विविध गुन्हे दाखल करण्यात आले होते. या गुन्ह्यांचा तपास सुरू असताना पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज, गोपनीय माहिती व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे विठोबा ऊर्फ कैलास श्रीराम माळी, रा. सोनगीर, ता. जि. धुळे यास अटक केली. चौकशीत त्याने नवापूर पोलीस ठाण्यात दाखल काही मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यांची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले.

आरोपीकडून नवापूर पोलीस ठाण्यातील गुन्ह्यांतील सहा मोटारसायकलींसह एकूण ११ मोटारसायकली हस्तगत करण्यात आल्या आहेत. यामध्ये हिरो स्प्लेंडर, हिरो सुपर स्प्लेंडर व बजाज पल्सर या मोटारसायकलींचा समावेश आहे. काही विनाक्रमांकाच्या मोटारसायकलींच्या मालकांचा शोध सुरू आहे. सदर आरोपीविरुद्ध गुजरात राज्यातील विविध पोलीस ठाण्यांत मोटारसायकल चोरीचे गुन्हे, तसेच दोंडाईचा पोलीस ठाणे, जि. धुळे येथे पाच गुन्हे दाखल असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

दरम्यान, राजू सदाशिव आगळे, रा. करंजी ओवारा, नवापूर यांच्या फिर्यादीवरून दाखल गुरनं. ६५९/२०२६ या गुन्ह्यात इन्व्हर्टर, बॅटरी व चार्जर चोरीला गेले होते. या प्रकरणात प्रथम शिरीष गावीत व अभय शिरीष गावीत, दोन्ही रा. सावरट, ता. नवापूर यांचा सहभाग निष्पन्न झाला असून त्यांच्याकडून २३ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करून फिर्यादीच्या ताब्यात देण्यात आला.

तसेच इंदा मालजी गावीत, रा. बोकळझर (मोठीफळी), ता. नवापूर यांच्या फिर्यादीवरून दाखल गुरनं.८६८/२०२६ मध्ये ३ एचपी क्षमतेची पाण्याची मोटार चोरीला गेली होती. या गुन्ह्यात अनसिल दिनेश गावीत, रा. वडकळंबी, पो. रायपूर; पियुषकुमार दिलीप गावीत, रा. बोकळझर, पो. धनरट; इम्तियाज अयुब पठाण, रा. इस्लामपुरा, नवापूर यांचा सहभाग निष्पन्न झाला असून चोरीची पाण्याची मोटार जप्त करून फिर्यादीच्या ताब्यात देण्यात आली आहे. ही कामगिरी पोलीस अधीक्षक (पान ८ वर)




आपला महाराष्ट्र
www.aplamaharashtra.in

# बहर



प्रा.डॉ.मधुकर जाधव
मो.९९७५५४६०२०

विश्वातील महान राजे

छत्रपती शिवाजी महाराजांचा काळ हा चारशे वर्षांपूर्वीचा. या काळात पाश्चात्त्य देशांत विज्ञान-तंत्रज्ञानाची पहाट उगवत होती. तिकडे प्रबोधनपर्वाची सुरुवात झालेली होती. तरीही आपल्याकडे मात्र अंधारी रात्रच होती. समाज मागासलेल्या अवस्थेतच होता. समाज प्रबोधनाचा मागमूसही नव्हता. अशा काळात छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्वप्रथम समाज प्रबोधनाचा मानदंड उभा केला. विवेकवादी विचारांची मशाल पेटवून समाजाला कृतिशील बनविले. छत्रपती शिवाजी महाराज त्यांच्या काळातील आधुनिकतेचे प्रणेते असून त्यांचे प्रागतिक विचार सर्वश्रेष्ठ ठरतात. ते प्रगतिशील विचारांचे, काळाच्या पुढे धावणारे

## छत्रपती शिवाजी महाराजांचे अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य



राजे होते. म्हणून त्यांचे अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य महत्त्वपूर्ण आहे. छत्रपती विज्ञानवादाचे पुरस्कर्ते होत. त्यांनी आधुनिकतेची कास धरत उन्नतीचा व उत्कर्षाचा मार्ग शोधला. प्रत्येक घटनेकडे वैज्ञानिक दृष्टीकोनातून पाहिले. शुभ, अशुभ, शकुन, अपशकुन, होमहवन, नवस आदि कर्मकांडे, प्रथा व परंपरा, भूतपिशाच्चादि अंधश्रद्धा मोडीत काढून समाजाला नवी दृष्टी दिली. छत्रपतींचे हे विवेकवादी विचार त्यांच्या वैज्ञानिक दूरदृष्टीची साक्ष देतात. छत्रपतींनी जातिव्यवस्था व वर्णव्यवस्था झुगारून स्वराज्य हे सर्व जाति-धर्मांचे आहे, असे जाहीर केले. समाजातील विषमता नष्ट करून सर्वजण एकसमान आहोत, हे स्पष्ट करून त्यानुसार राज्यकारभार केला. प्रत्येक क्षण महत्त्वाचा असतो, प्रत्येक दिवशी चांगले काम करावे, सत्कर्मानेच माणसे मोठी होतात, हे छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार काळाच्या पुढे होते. मांत्रिक, तांत्रिक, जादूटोणा नाकारून औषधोपचारानेच आजार बरा होतो, अशी त्यांची तर्कशुद्ध विचारसरणी होती. त्यांनी अनिष्ट रूढी व परंपरांवर हल्ले केले. मानवी कल्याणाच्या आड येणाऱ्या रूढी, परंपरा नष्ट केल्या. साहस, शौर्य, कर्तृत्व, बुद्धिमत्ता यावर त्यांचा विश्वास होता. छत्रपती शिवाजी महाराज बुद्धिवादी व परिवर्तनवादाचे पुरस्कर्ते असून प्रागतिक विचारांचे आदर्श राजे होत.

**प्रत्येक क्षण नि दिवस महत्वाचा:** सत्कर्मासाठी प्रत्येक क्षण आणि प्रत्येक दिवस सारखाच महत्त्वाचा असतो. छत्रपती शिवाजी महाराजांनी अनेक लढाया केल्या. परंतु त्यांनी कोणत्याही लढाईत विजय मिळविण्यासाठी कधीही शुभ वेळ किंवा मुहूर्त पाहिला नाही. अनेक महत्त्वपूर्ण लढाया त्यांनी अशुभ मानल्या जाणाऱ्या अमावस्येच्या रात्रीच केल्या आणि त्या जिंकल्या देखील. अमावस्येच्या रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन शत्रू पक्षावर मात केली व इतिहास घडविला. निसर्गाचा फायदा घेत मोहिमा व स्वाऱ्या यशस्वी केल्या. छत्रपतींच्या स्वराज्यात लहान मोठे ३६० ते ४०० गड-किल्ले होते. त्यातील काही जिंकून घेतलेले होते तर काही स्वतः बांधलेले होते. स्वराज्यातील जिंकलेल्या किंवा नव्याने बांधलेल्या कोणत्याही गडावर सत्यनारायण घातला नाही, वास्तुशांती केली नाही, की होमहवनाचे कर्मकांड केले नाही.

**समुद्र उल्लंघन:** समुद उल्लंघन करणे त्याकाळी अधर्म समजले जात असे. धर्माने समुद्र उल्लंघनावर बंदी घातली होती. अशा वेळी छत्रपतींनी सागरावरील सत्तेचे महत्त्व ओळखून सागरी किनाऱ्याचे रक्षण करण्यासाठी अतिशय दूरदर्शीपणे नाविक दलाची निर्मिती केली. व्यापारी युध्द्नौका बनवून सागरी सफरी केल्या. सागरी युध्द् मोहिमा काढून स्वतः समुद्रोल्लंघन करून नवी वाट निर्माण केली. सुसज्ज असे नाविक दल निर्माण करून सागरी सत्तेचा पाया घालणारे छत्रपती शिवाजी महाराज हे भारतातील पहिले राजे होत. त्यातून प्रथमच आरमार व नौसेनेला महत्त्व प्राप्त झाले. छत्रपती शिवाजी महाराज हे नौदलाचे जनक होत. छत्रपतींनी समुद्रावर स्वाऱ्या करून जमिनीबरोबरच सागरावरही आपली सत्ता निर्माण करून सागरी सत्तेचे महत्त्व अधोरेखित केले. महाराजांनी समुद्र पर्यटनाला असलेली बंदी मोडून आधुनिकतेला सुरुवात केली. आरामारामध्ये परकीय लोकांच्या नियुक्त्या करून परदेशातील तंत्रज्ञान भारतामध्ये आणले. आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित आरमारी सैन्याची उभारणी केली. त्यामुळे स्वराज्यातील सुसज्ज नौदल सागरी किनारपट्ट्या जिंकू लागले. सागरी युद्धनौका जगाशी व्यापार व दळणवळण करू लागल्या. आधुनिक व सुसज्ज शस्त्रास्त्रांमुळे युद्धनीती व युद्धव्यवहार या दोन्ही गोष्टींमध्ये आमूलाग्र बदल झाले. सुसज्ज आरमार व शस्त्र-साहित्यामध्ये सतत प्रगती करुन ते बनविण्याचे नवनवीन तंत्रज्ञान विकसित केले.

**आधुनिक विज्ञानवादी दृष्टी:** छत्रपतींनी मानवकेंद्रित विज्ञानवादाचा पाया घातला. त्यांनी मध्ययुगीन कालखंडामध्ये आधुनिक विज्ञानवादी दृष्टी निर्माण करण्याचे महान कार्य केले. एका किल्ल्यावरून दुसऱ्या किल्ल्यावर जलद पोहचणारी संदेशवहन यंत्रणा उभी केली व युद्धरचनेचे अतिशय योग्य नियोजन केले. त्यांनी दिवस व रात्र या दोन्हीही गोष्टी डोळयासमोर ठेवून संदेशवहन यंत्रणा राबविली. छत्रपतींनी जलद संपर्क यंत्रणेसाठी ध्वनीचा, संकेतांचा अतिशय योग्य पध्दतीने वापर केला.

(पान ६ वर)

# मराठी शुद्ध बोलताना ऐकून आपल्याला आश्चर्य का वाटते?

दिवाकर बुरसे, पुणे
मो.९५५२ ६ २९ २ ४ ५

अलीकडे विद्यानंद बापट नामक एका सर्वसामान्य पुणेकराचे अस्खलित, स्पष्ट आणि समृद्ध मराठी महाराष्ट्राने ऐकले आणि अनेकांना आश्चर्य वाटले. इतकं शुद्ध मराठी आजही कोणी बोलतं? मुख्यमंत्र्यांपासून सर्वसामान्यांपर्यंत अनेकांनी त्यांच्या भाषाप्रभुत्वाचे कौतुक केले. माध्यमांत त्याची चर्चा झाली. काहींनी तर त्या भाषेची टवाळी करणारी रिळेही प्रसारित केली. टवाळा आवडे विनोद!

पण या प्रसंगाने विनोदापेक्षा मोठा प्रश्न उभा केला- शुद्ध मराठी ऐकून आपल्याला आश्चर्य का वाटते? बापट एकटे नाहीत. पुण्यात, महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेरही उत्तम मराठी बोलणारे असंख्य लोक आहेत. प्रश्न त्यांच्या संख्येचा नाही. प्रश्न आहे तो अशा भाषिक परंपरेचा वारसा आपण पुढे नेतो आहोत की गमावतो आहोत, हा.

भाषा केवळ शब्दांचे साधन नाही. ती संस्कृतीची स्मृती आहे. विचारांची वाहिनी आहे. एका पिढीचा अनुभव दुसऱ्या पिढीपर्यंत पोहोचविणारा सेतू आहे. म्हणून भाषेची उपेक्षा ही केवळ भाषेची उपेक्षा राहत नाही.

हा प्रयत्न नवा नाही मराठी

शुद्ध, समर्थ आणि स्वाभिमानी व्हावी, यासाठीचे प्रयत्न आजचे नाहीत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रेरणेने राजव्यवहारकोश निर्माण झाला. पुढे स्वातंत्र्यवीर सावरकरांनी भाषाशुद्धीचा आग्रह अत्यंत प्रखरपणे धरला. त्यांच्या प्रयत्नांची प्रारंभी टवाळी झाली; पण कालांतराने त्यांच्या प्रयत्नांतून रूढ झालेले अनेक शब्द व्यवहाराचा भाग झाले.

इतिहास एक गोष्ट शिकवतो- आज अपरिचित वाटणारा शब्द उद्या आपलासा होऊ शकतो; आज टवाळीचा विषय ठरलेला आग्रह उद्या भाषेच्या संवर्धनाचा पाया ठरू शकतो. म्हणून भाषेचा विचार केवळ आजच्या सोयीने करता येत नाही.

'चालते' पुरेसे आहे का? आजच्या भ्रमणध्वनी-संदेशसंस्कृतीने एक नवी सवय लावली आहे-

आतपुढे म्हणजे आले तसे पुढे पाठवायचे. स्वलिखित असो वा अग्रेषित-शब्ददोष, व्याकरणदोष, सदोष वाक्यरचना, चुकीचे शब्दप्रयोग आणि विरामचिन्हांकडे झालेले दुर्लक्ष सहज दिसते. 'कळतंय ना काय म्हणायचंय ते, मग झालं!' 'काय फरक पडतो?'

'चालते!' हीच तर अडचण आहे. चूक वारंवार दिसली की ती रूढ होते; आणि रूढ झालेले आपण योग्य समजू लागतो. हेच पहा ना, व्यक्ती हा स्त्रिलिंगी शब्द पण सध्या ' तो व्यक्ती ' असंच म्हणू लागले आहेत लोक.

शुद्ध म्हणजे कठीण नव्हे शुद्ध भाषा म्हणजे अवघड भाषा नव्हे. संस्कृतप्रचुर शब्दांची गर्दी करणे म्हणजे भाषाप्रभुत्व नव्हे. दुर्बोध शब्द वापरणे म्हणजे भाषाशुद्धी नव्हे.

शुद्ध भाषा म्हणजे व्याकरणसम्मत, अर्थ स्पष्ट करणारी, प्रसंगानुरूप, नेमकी आणि सहज आकलन होणारी भाषा. भाषा साधी असावी; पण अशुद्ध नसावी. भाषा सहज असावी; पण सवंग, निष्काळजी नसावी. सहजता आणि निष्काळजीपणा यांत भेद आहे.

लेखकाचे दायित्व

आपण जे लिखाण इतरांच्या वाचनासाठी पाठवतो, त्यात वाचकाचा वेळ आणि श्रम गुंतलेले असतात. म्हणून लेख पाठवण्यापूर्वी तो एकदा नीट वाचणे, शब्द तपासणे, वाक्यरचना पाहणे, विरामचिन्हे लावणे-हे लेखकाचे कर्तव्यच नव्हे तर वाचकाप्रतीचे दायित्व आहे. वाचकाने आपल्या लेखाचा अर्थ लावण्यासाठी श्रम करू नयेत; अर्थ स्पष्ट करण्याचे श्रम लेखकाने घ्यावेत.




भाषा आणि विचार

भाषा केवळ विचार व्यक्त करत नाही; ती विचारांना आकारही देते. शब्द नेमके असतील तर विचार नेमका होतो. वाक्यरचना स्पष्ट असेल तर विचारांची मांडणी स्पष्ट होते. म्हणून भाषेची शिस्त ही केवळ व्याकरणाची शिस्त नाही. ती विचारांचीही शिस्त आहे.

परभाषिक शब्दांचा प्रश्न मराठी अनेक भाषांच्या सहवासातून समृद्ध झाली आहे. त्यामुळे प्रत्येक परभाषिक शब्द अशुद्ध आहे, असे म्हणणे योग्य नाही. प्रश्न आहे तो अनावश्यक परावलंबित्वाचा. जिथे मराठीत नेमका, रूढ आणि अर्थवाही शब्द उपलब्ध आहे, तिथे केवळ सवयीने परभाषिक शब्द योजण्याची आवश्यकता काय? आणि जिथे पर्यायी शब्द नाही, तिथे नवा शब्द निर्माण करण्याची क्षमता आपल्या भाषेत नाही का? भाषाप्रेम म्हणजे परभाषाद्वेष नव्हे; स्वभाषासामर्थ्याची जाणीव होय.

भाषा जपायची की जगवायची?

भाषा काचेच्या पेटीत ठेवून जपायची नसते. भाषा वापरली की जगते. नेमकी वापरली की समृद्ध होते. नव्या अनुभवांना सामावून घेतली की विकसित होते. नवे विज्ञान, नवे तंत्रज्ञान, नवे व्यवहार, नवे विचार-या सर्वांसाठी नवे शब्द लागतील. ते निर्माण करण्याचे दायित्व आपलेच.

वाचन : भाषेची मुळाक्षरे

शब्दसंपदा एका दिवसात निर्माण होत नाही. वाचनातून शब्द भेटतात. उत्तम वक्त्यांचे बोलणे ऐकण्यातून वाक्यरचना मनात साठते. चांगले साहित्य वाचल्याने भाषेची लय, अर्थछटा आणि अभिव्यक्ती समृद्ध होते. म्हणून भाषाशुद्धीचा आरंभ केवळ व्याकरणाच्या पुस्तकापासून होत नाही. तो वाचनापासूनही होतो. वाचनाला पर्याय नाही. विद्यानंद बापट यांच्या भाषेच्या संदर्भात त्यांच्या वाचनाच्या सवयीचा उल्लेखही पुढे आला आहे.

उद्याची मराठी कोणती?

आज प्रश्न असा नाही की मराठी टिकेल का. मराठीची परंपरा विशाल आहे. ती टिकेल. खरा प्रश्न आहे- आपण पुढच्या पिढीला कोणती मराठी देणार? शब्दसंपन्न? नेमकी? सुसंस्कृत? अस्खलित? की स्वतःचे समर्थ शब्द असूनही त्यांचा उपयोग करण्याचे कष्ट न घेणारी? उत्तर आपल्या रोजच्या वापरातूनच ठरणार आहे.



श्रीगणेशा कुठून? दुसऱ्याच्या चुका शोधण्यापासून नव्हे. स्वतःपासून. एक शब्द योग्य लिहिणे. एक वाक्य नीट रचणे. एक अनावश्यक परभाषिक शब्द टाळणे. पाठवण्यापूर्वी आपले लिखाण पुन्हा वाचणे. इतके केले तरी आरंभ झाला. भाषेचा स्तर एखादी व्यक्ती एकटी ठरवत नाही. लक्षावधी सामान्य माणसांच्या दैनंदिन व्यवहारातून भाषेचा स्तर घडत असतो. म्हणूनच भाषेचे भवितव्य आपल्या हातात आहे. आज शुद्ध मराठी ऐकून आपल्याला आश्चर्य वाटले. उद्या असे मराठी ऐकून आश्चर्य वाटू नये. शुद्ध मराठी बोलणारा माणूस विशेष वाटू नये; शुद्ध मराठी बोलणेच स्वाभाविक वाटावे. ही अपेक्षा अवास्तव नाही. त्यासाठी इच्छा हवी. हव्यास हवा.

वाचन हवे. भाषाज्ञान हवे. शब्दसंपदा हवी. विवेक हवा. आणि सर्वांत महत्त्वाचे- स्वतःपासून आरंभ करण्याची सिद्धता हवी, संकल्प हवा !

व्याकरणातील ऱ्हस्व-दीर्घ, 'न'-'ण', 'स'-'श'-'ष', लिंग, वचन, विभक्ती, काळ, शब्दप्रयोग, म्हणी, वाक्प्रचार आणि शब्दसंग्रह यांसारख्या विषयांवर आवश्यकतेनुसार स्वतंत्रपणे बोलता येईल. पण त्यापूर्वी एक गोष्ट मनात रुजली पाहिजे- आपली भाषा शुद्ध असावी, अशी इच्छा. कारण भाषाशुद्धी ही दुसऱ्याला सुधारण्यापासून नव्हे, स्वतःला सुधारण्यापासून सुरू होते. आणि म्हणूनच- चूक होणे शक्य आहे; स्वाभाविक आहे. पण चूक तशीच ठेवणे हा अपराध आहे. आणि भाषा शुद्ध ठेवण्याचे दायित्व- ते आपलेच आहे. तोपर्यंत नमस्कार!

# पुस्तकवाले बाबा आयुष्य बदलणारी भेट

राजेंद्र गवळी
पिंपळनेर, मो.८२७७५७८९६०

प्रशांत आज सकाळी कोणालाही काहीही न सांगता घरातून निघाला. मनात प्रचंड तणाव, अपयशाची खंत आणि भविष्याची चिंता घेऊन तो बराच वेळ पायी चालत राहिला. किती दूर आलो, याचे त्यालाही भान राहिले नाही. शेवटी थकून तो एका झाडाखाली बसलेल्या वयोवृद्ध व्यक्तीजवळ जाऊन थांबला. बाबा, तुम्ही इथे काय करता? मी थोडा वेळ इथे बसू का? हो बाळा, बस. तू कुठून आलास? खूप थकलेला दिसतोस. चेहऱ्यावरही खूप चिंता दिसतेय. काही त्रास आहे का? बाबांनी आपुलकीने विचारले. प्रशांत काहीच बोलला नाही. बाबांनी पुन्हा विचारले, मनात काहीतरी आहे. सांगशील तर कदाचित मन हलकं होईल. हे शब्द ऐकताच प्रशांतच्या डोळ्यांत पाणी आले. त्याने आपल्या मनातील सगळा ताण बाबांसमोर व्यक्त केला. बाबा, विज्ञान शाखेची पदवी घेतली आहे; पण नोकरी मिळत नाही. पुढे शिक्षण घ्यायचे आहे; पण पैसे नाहीत. आई-वडील गरीब आहेत. त्यांच्या अपेक्षा पूर्ण करता येत नाहीत. मला वाटतं, मी त्यांच्या घरावरचा भार झालो आहे. आयुष्यात कुठेच यश मिळत नाही. आता जगण्यात काही अर्थ उरलेला नाही. तो काही क्षण शांत राहिला. म्हणून आज घरातून निघालो. आता कुठे जायचं, काय करायचं, मलाच माहीत नाही. बाबांनी त्याच्याकडे शांतपणे पाहिले. अरे वेड्या! एवढ्याशा अपयशाने आयुष्य संपवायचं असतं का? तुझं तारुण्य अजून उभं आहे. तुझ्यात ताकद आहे, बुद्धी आहे, शिक्षण आहे. फक्त तुझा आत्मविश्वास हरवला आहे. प्रशांत शांतपणे त्यांच्याकडे पाहत राहिला.

बाबांनी आपल्या आयुष्याची कहाणी सांगायला सुरुवात केली. मी एका कंपनीत वेल्डिंगचं काम करायचो. शिक्षण फक्त आठवीपर्यंत झालं होतं; पण कामाचा चांगला अनुभव होता. संसार सुरळीत चालला होता. पत्नी आणि तीन मुली असा आमचा परिवार होता. मुलींच्या शिक्षणाची आणि त्यांच्या भवितव्याची चिंता होती. अचानक मला अर्धांगवायूचा झटका आला. उपचार केले; पण शरीर पूर्वीसारखं राहिलं नाही. सततच्या गैरहजेरीमुळे कंपनीने मला नोकरीवरून काढून टाकलं. घरखर्च, औषधोपचार आणि मुलींच्या शिक्षणाचा खर्च भागवणे कठीण झाले. हातातला पैसा हळूहळू संपत गेला. बाबा क्षणभर थांबले. त्या काळात नैराश्याने मला घेरलं होतं. एक वेळ अशी आली की, 'सगळं संपवून टाकावं,' असंही मनात आलं. पण एका पुस्तकात एक विचार वाचला-'परिस्थिती माणसाला हरवत नाही; परिस्थितीसमोर हार मानणारा माणूस स्वतःला हरवतो.' त्या विचाराने माझं आयुष्य बदललं. मग मी ठरवलं-काम कोणतंही असो, पण हात पसरायचे नाहीत. बाबांनी आपल्या शेजारी ठेवलेल्या पुस्तकांकडे पाहिले.

माझ्याकडे जेवढं थोडंफार भांडवल होतं, ते सगळं पुस्तकांच्या व्यवसायात लावलं. या झाडाखाली बसून पुस्तकं विकायला सुरुवात केली. कथा, कादंबऱ्या, सामान्य ज्ञान, स्पर्धा परीक्षांची पुस्तकं... सुरुवातीला चार-पाच महिने फारसा प्रतिसाद मिळाला नाही. रोज संध्याकाळी घरी जाताना मनात प्रश्न यायचा- 'आपण चुकीचा व्यवसाय तर सुरू केला नाही ना?' पण मी हार मानली नाही. हळूहळू लोक पुस्तकं घेण्यासाठी येऊ लागले. व्यवसाय वाढत गेला. मुलींचं शिक्षण सुरू राहिलं. घर पुन्हा उभं राहिलं. आज माझ्या दोन मुली इंजिनिअरिंगचे शिक्षण घेत आहेत, तर एक कायद्याचे शिक्षण घेत आहे. बाबांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य उमटले. माझ्याकडे आज मोठी संपत्ती नाही. शरीराची ताकदही पूर्वीसारखी नाही. पण मनाची ताकद प्रचंड आहे. मी पुस्तकं विकतो; पण खरं सांगायचं तर मी पुस्तकांसोबत ज्ञानही देतो. माझ्या प्रत्येक ग्राहकात मला देव दिसतो. त्यांच्या चेहऱ्यावरचे समाधान हीच माझी खरी कमाई आहे. प्रशांत




बाबांचे प्रत्येक शब्द मन लावून ऐकत होता. बाबांनी त्याच्या खांद्यावर हात ठेवला. बाळा, माझं शरीर आजाराने कमजोर केलं; पण माझ्या मनाला कोणीही हरवू शकलं नाही. तुझ्याकडे तर तरुण वय आहे, शिक्षण आहे, वेळ आहे. मग तू का हार मानतोस?

प्रशांतच्या मनात आशेची एक छोटीशी ज्योत पेटली. बाबांनी दुकानातून सामान्य ज्ञानाचे आणि स्पर्धा परीक्षेचे एक पुस्तक काढले. हे घे. पैसे देऊ नकोस. रोज इथे ये. एक तास माझ्या दुकानात मला मदत कर आणि उरलेल्या वेळेत अभ्यास कर. स्पर्धा परीक्षा दे. तुला नक्की यश मिळेल. प्रशांतने खिशातून शंभर-दोनशे रुपये काढले. बाबा, पुस्तकाचे पैसे घ्या. बाबांनी त्याचा हात थांबवला. पैसे ठेव खिशात. मी तुला पुस्तक नाही, ज्ञान देतोय. तू यशस्वी झालास, तर तेच माझ्या पुस्तकांचे खरे पैसे असतील. प्रशांतने बाबांच्या पायांना हात लावला. त्या दिवसापासून त्याच्या आयुष्याला नवी दिशा मिळाली. तो रोज बाबांकडे जाऊ लागला. दुकानात त्यांना मदत करू लागला आणि वेळ मिळेल तेव्हा अभ्यास करू लागला. हळूहळू त्याचा चिडचिडेपणा कमी झाला. चेहऱ्यावर पुन्हा आत्मविश्वास दिसू लागला. आईने एक दिवस विचारले, तू रोज कुठे जातोस? आणि ही पुस्तकं कुठून आणलीस? प्रशांत हसत म्हणाला, आई, मला एक बाबा भेटले. त्यांनी मला जगण्याचा मार्ग दाखवला. आता मी स्पर्धा परीक्षा देणार आहे. मुलाच्या बोलण्यात झालेला बदल आईने ओळखला. तिने आपल्या साठवलेल्या पैशांतून त्याला परीक्षेच्या तयारीसाठी मदत केली. काही महिन्यांनी प्रशांतने स्पर्धा परीक्षा दिली. निकालाचा दिवस उजाडला. प्रशांतची वर्ग दोनच्या शासकीय पदावर निवड झाली होती. त्याला स्वतःच्या डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता. तो सर्वप्रथम बाबांकडे धावत गेला. बाबा... मला ओळखलं का? बाबांनी त्याला जवळ घेतले. अरे प्रशांत! माझं पुस्तक वाचणारा हा मुलगा मी कसा विसरेन? प्रशांतच्या डोळ्यांत आनंदाश्रू होते. बाबा, तुम्ही मला फक्त पुस्तक दिलं नाहीत... तुम्ही मला जगण्याची नवी उमेद दिलीत. बाबांनी त्याच्या पाठीवर थाप मारली. नाही बाळा, आयुष्य तुझं होतं. मी फक्त त्याला योग्य दिशा दाखवली. काळ पुढे सरकला. प्रशांतची जिल्हा ग्रंथालय अधिकारी म्हणून नियुक्ती झाली. मोठ्या पदावर पोहोचल्यानंतरही त्याने पुस्तकवाले बाबांना कधीच विसरले नाही. त्याने बाबांसाठी वाचनालय सुरू करण्यास मदत केली. ज्या झाडाखाली कधीकाळी बाबा रस्त्यावर पुस्तकं विकायचे, त्याच परिसरात आता एक छोटंसं वाचनालय उभं राहिलं. एके दिवशी प्रशांत बाबांना म्हणाला, बाबा, आज तुमचं दुकान नाही; तुमचं वाचनालय आहे. बाबांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. बाळा, माझी पुस्तकं विकण्याची छोटीशी सुरुवात आज इतक्या लोकांच्या आयुष्यात ज्ञानाची ज्योत पेटवत आहे. यापेक्षा मोठं समाधान काय असणार?

प्रशांतने बाबांच्या चरणांना स्पर्श केला. त्या क्षणी त्याला पुन्हा एकदा जाणवलं- आयुष्य बदलण्यासाठी नेहमी मोठ्या संधीची गरज नसते. कधी कधी एखादा चांगला माणूस, एखादा सकारात्मक विचार आणि योग्य वेळी मिळालेला आधार एवढंच पुरेसं असतं. जगात चांगली माणसं अजूनही आहेत. फक्त त्यांच्यापर्यंत पोहोचण्याची आणि त्यांच्या चांगल्या विचारांवर विश्वास ठेवण्याची गरज आहे. प्रशांतच्या आयुष्यात आलेले ते पुस्तकवाले बाबा त्याच्यासाठी केवळ पुस्तक विक्रेते नव्हते... ते त्याच्या अंधारलेल्या आयुष्यात भेटलेले प्रकाशाचे देवदूत होते.



डॉ.सौ.प्रज्ञा पुसदकर
मो.९४२३७३३६३०

## आनंदी वाटचाल

# 'आत्मसूचना'

आत्म सूचना म्हणजे आत्म्याने आत्म्याला किंवा आपण स्वतः च स्वतःला केलेल्या सूचना. आत्मा हा शरीराचा मालक किंवा राजा असल्यामुळे त्याच्यावर आपली इंद्रिये मन किंवा बुद्धी यांची सत्ता चालू शकत नाही .आत्म्याने कशा प्रकारचे संकल्प केले पाहिजे हे आत्म्यालाच ठरवावे लागते आणि त्याबद्दल स्वतःला सूचना कराव्या लागतात .अशा सूचनांना आत्मसूचना असे म्हणतात.

व्यवहारात आपण इतरांना सूचना करतो आणि इतर आपल्याला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे सूचना करीत असतात .आपण केलेला सूचनांचा इतरांवर परिणाम होतो, आणि इतरांच्या सूचनांचा आपल्यावर परिणाम होतो .अनेक लोक आपल्याला स्पष्ट सूचना देतात पण इतर अनेक लोक स्वतःच्या आचरणाने आपल्याला अप्रत्यक्षपणे किंवा गर्भित सूचना करीत असतात .दुसऱ्यांची मते चालिरीती सवयी पोषाख आणि इतर अनेक गोष्टी पाहून आपण त्यांचे अनुकरण करतो .त्याचा खरा अर्थ लोकांच्या अप्रत्यक्ष सूचनानुसार आपण वागतो असाच आहे

जी गोष्ट दुसऱ्याने करावी अशी आपल्याला इच्छा असते ती दुसरा खात्रीने करील असे श्रद्धायुक्त आणि सूचनात्मक बोलल्यास दुसरा आपल्या सूचनेनुसार बहुधा वागतो असा अनुभव येतो. सूचना दुसऱ्यांनी केल्या तरच त्यांचा परिणाम आपल्यावर होतो असे नाही .दुसरे ज्याप्रमाणे आपल्याला सूचना करतात त्याप्रमाणे आपण स्वतःच स्वतःला सूचना करीत गेले तरी तोच परिणाम होतो .रोज सकाळ संध्याकाळ आंबट चेहरा करून मला बरे वाटत नाही असे एकसारखे तोंडाने म्हणत राहिले आणि बुद्धीत तेच विचार ठेवून दुखणे कऱ्यासारखे वागले तर खरोखरच बरे वाटेनासे होउन मनुष्य अखेर आजारी पडतो उलट एखाद्या आजाऱ्याने मला आता बरे वाटत आहे असे तोंडाने म्हणून आनंदाचे आणि उत्साहाचे विचार मुद्दाम बुद्धीत ठेवण्याचा प्रयत्न केला तर त्याच्या शरीरात शक्तीचा संचार झाल्यासारखे वाटू लागते आणि तो लवकर बरा होतो .स्वतः संबंधी जी परिस्थिती वास्तविक अस्तित्वात नाही .पण जिचे अस्तित्व आपल्याला हितावह वाटते ती अस्तित्वत आहे अशा प्रकारच्या आत्मसूचना वारंवार पुष्कळ दिवस पर्यंत करीत राहिल्याने ती परिस्थिती खरोखरच अस्तित्वात येते किंवा पूर्वी थोडी बहुत अस्तित्वात असल्यास जास्त दृढ होते . इष्ट आत्मसूचना करीत गेल्याने मनुष्य खरोखर तसा होतो आणि अनिष्ट आत्म सूचना करीत गेल्यास अनिष्ट परिस्थिती नाहीशी होण्या ऐवजी जास्त दृढ होते म्हणून कोणत्याही प्रकारच्या अनिष्ट आत्मसूचना केव्हाही करणे चांगले नव्हे. सत्याने बोलावे आणि सत्याने वागावे या नियमाला जे काही अपवाद आहेत त्यापैकी एक अपवाद म्हणजे स्वतःला सूचना करताना सत्य असतील त्याच सूचना करण्याची जरूर नसते हा होय. सत्य सूचना करणे पुष्कळ वेळा अपायकारक होण्याची भीती असते आपण कसे असले पाहिजे हे स्वतःच्या सात्विक बुद्धीने ठरवून आपण तसे खरोखर आहोत अशा सूचना स्वतःला करीत गेल्यास आपल्या अंगी असलेले गुणही कालांतराने खरोखर दिसू लागतात. म्हणून ज्यांना ऐहिक जीवनात सुखी आणि यशस्वी होण्याची इच्छा असेल त्यांनी आपण यशस्वी आणि सुखी होणार आहोत आपल्या अंगी उत्साह आणि शक्ती आहे आपण बलवान होत चाललो आहोत आपण आत्मविजयी आहोत ,आपल्याला आत्मशांती लाभणार आहे इत्यादी प्रकारे आत्म सूचना करीत गेले पाहिजे .तर बुद्धीत त्याच प्रकारचे विचार घोळत राहतात .त्यांना जुळणाऱ्या भावना मनात उत्पन्न होतात आणि त्या भावनांनुसार क्रिया हातून घढत राहतात. आपले आजचे गुणावगुण हे पूर्वी केलेल्या आत्मसूचनांचे फळ असते त्याप्रमाणे आजच्या आत्मसूचनांमुळे आपले उद्याचे भवितव्य ठरत असते. आपले विचार उच्चार आणि आचार यांच्याद्वारे जागृता वस्थेत च नव्हे तर स्वप्नातही आंतरजागृत बुद्धी त अशा सूचना घोळत राहिल्या म्हणजे त्याचा परिणाम फार अद्भुत झालेला दिसून येतो. आत्मसूचनामुळे अदभूत कार्य होते पण त्या अद्भुतपणाला काही मर्यादा असते .ती लक्षात न घेतल्यास मनुष्यावर हे आत्म सुचनामुळे होणारे मुख्य कार्य असते म्हणून आत्म सूचना चालू असता योग्य दिशेने प्रयत्नांची परा कष्ठा करीत राहणे आवश्यक असते हे लक्षात ठेवणे जरूर आहे.

तसेच आत्म सूचना करू लागल्याबरोबर त्यांचे परिणाम लगेच दिसतील अशी अपेक्षा करणे योग्य नाही. आत्मसूचना करीत असता अनासक्तीपूर्वक आपले कर्तव्य चालू ठेवल्याने सृष्टी नियमानुसार ज्या गोष्टी घडावयाच्या त्या जलद गतीने घडतात हे लक्षात ठेवून उताविळ न होता आत्मसूचना करीत गेले पाहिजे .तसेच आत्मसूचना नेहमी सकारात्मक भाषेत केल्या पाहिजेत .नकारात्मक भाषेत केलेल्या आत्मसूचनांचा चांगला उपयोग होत नाही .ज्या गोष्टी आपल्या आंतरजागृत बुद्धी त जाऊ नये




निराश होण्याची पाळी येण्याचा संभव असतो. म्हणून आत्मसूचनामुळे होणाऱ्या परिणामांची मर्यादा कोणती असते आणि आत्म सुचनांचे योग्य परिणाम होण्याकरिता त्या कशा केल्या पाहिजेत यासाठी काही गोष्टी लक्षात ठेवणे फारच जरूरीचे असते. आत्मसूचना हे मनुष्याच्या अंगात निसर्गतः असणाऱ्या शक्तींची पूर्ण आणि योग्य वाढत करणारे एक अत्यंत प्रभावी असे साधन आहे. तो एक निसर्ग नियम आहे अर्थात निसर्ग नियमाविरुद्ध गोष्टी आत्म सूचनांच्या सहाय्याने घडून येण्याची आशा धरणे व्यर्थ असते. माझ्याने अमुक गोष्ट होणार नाही ,मला परीक्षेत ,व्यापारात, धंद्यात यश मिळणार नाही अशा प्रकारचे निरुत्साही विचार करीत गेल्यास आपल्या नैसर्गिक शक्ती प्रगट होण्यास अडथळा होतो. योग्य प्रकारे आत्म सुचना केल्याने नैसर्गिक शक्ती प्रगट होण्याला भरपूर वाव मिळतो, आणि निसर्गाचे कार्य सुकर होते. निसर्गाच्या मार्गातील अडचणी दूर करणे अशी आपल्याला इच्छा असेल त्याचा उल्लेख आत्मसूचनात येता कामा नये .आत्मसूचना करताना त्यानुसत्या यांत्रिकपणाने करता कामा नये त्यावर दृढ श्रद्धा ठेवून त्या सूचनांप्रमाणे आपण दिवसेंदिवस होत चाललो आहोत अशी भावना मनात बाळगली पाहिजे. भावना शून्य मनाने केलेल्या आत्मसूचनात शक्ती नसते. त्या दुर्बल असतात .आत्मसूचना फलंदायी होतील किंवा नाही असला संशयात्मक विचार बुद्धीत केव्हाही येऊ देऊ नये आत्मसूचना करताना बुद्धी एकाग्र असावी. आत्मसूचना करण्याच्या वेळी सभोवार शांतता आणि एकांत . असेल तर जास्त चांगले. एका वेळी एकाच गोष्टी संबंधित आत्म सूचना कराव्यात काही दिवस त्याच त्या सूचना करीत राहावे. त्याप्रमाणे आत्म सूचनांचा उपयोग करीत गेल्यास जुन्या अनिष्ट सवयी सोडणे नव्या इष्ट सवयी जोडणे जुने अवगुण घालविणे नवीन सदगुण अंगी आणणे व आत्म विजय होणे सुलभ जाते पण आत्मविजयी होऊन आपल्याला काय मिळवायचे हे पुढे बघूया.



डॉ.यशवंत सुरोशे
मो.८३८०८६२२१२

## उमलत्या कळ्या

# अनुपालन



यंदा गणपतीच्या सणाची सलग आठवडाभर सुट्टी आहे.खरंतर धमाल केली असती.सरिताने बोलता-बोलता वाक्य तोडलं.

धमाल केली असती म्हणजे... तुझे कोणी हातपाय बांधलेत?वैशालीने नेमकं हेरलं.

अगं,तुला माहित आहे ना!यंदा डीजे,लाऊडस्पीकर आणि लेझर लाईट यावर बंदी घातलेय.कशी गं धमाल करणार? नुसतं गप्प-गप्प कसा सण साजरा करायचा? पाठीवरचं दप्तर सांभाळत सरिता बोलत होती.

अगंआपण अशी आयडिया करायची का... वैशालीने मुद्दाम वाक्य तोडलं.

काय? सांग ना पटकन! सरिता अधीर झाली होती.

पूर्वीच्या काळात म्हणजे जेव्हा डीजे,लाऊडस्पीकर नव्हता किंवा अगदी वीज नसेल तेव्हा गणपतीचा सण कसा साजरा करत असतील?वैशालीने विचारलं.

म्हणजे तू काय गुहेतला गणेशोत्सव साजरा करायला सांगतेस की काय?सरिताने कपाळावर तळहात ठेवत म्हटलं.

बरं! कल्पना करून सांग तरी कसा साजरा करत असतील हा सण?वैशालीने प्रश्न सोडला नाही.

माझी आजी म्हणतेरात्री घरातली कामं आवराली की शेजारच्या-पाजारच्या बाया जमायच्याव अनारसे,करंज्या करायला मदत करायच्यामग निवडणं,धुणे,किसणं,दळणं,मळणं,लाटणं अशी एकाला एक लागून कामं चालायची. घरातली पुरुष मंडळी बाहेरच्या भागात गप्पा मारत बसलेली असायची.मग मधघरात बसलेल्या ह्या बाया गप्पा करता-करता गाणी म्हणू लागत.त्यात विशेषतः गणपतीचे वर्णन असे.कधी-कधी घरात स्थापन केलेल्या 'श्रीं'च्या मूर्तीचे वर्णन करणारे काव्य त्यात असे.मधघरातून महिलांचा आवाज येऊ लागला की पुरुष मंडळी आपला आवाज हळूवार करायचे.ते ही महिलांची गाणी ऐकत.महिलांना ते जाणवायचे. मगत्यांना हुरूप येई.मग त्या फेर धरून,हळूवार, ताल धरूननाचत गाणं बोलायच्या. एकीने गाणं बोलायचे,फेऱ्यातील इतरजणींनी तसंच्या तसं पाठोपाठ म्हणायचे.मग गाण्याचा,सोबत ताल धरणाऱ्या टाळ्यांचा आवाजऐकून उरली-सुरली शेजारीणही यायची.फेऱ्यात मिसळून जायची.एकीचं गाणं ऐकून दुसरीला गाणं आठवायचं.मग तिसरीला गाणं गावांस वाटे.पुढे गाण्याची जणू स्पर्धाच लागे. घर स्वरांनी भरून जाई, असं माझी आजी सांगत असते.

जसं तुझ्या आजीनं तुला सांगितलंयतसं माझी आजीही तिच्या बालपणीच्या काळातल्या सणाच्या आठवणी सांगते.त्यातल्या काही गोष्टी आपणही करून पाहिल्या तर...?वैशालीनं आपल्या मनातली कल्पना सरिताला सांगितली.

पण कसं करणार?सरिताचा प्रश्न.

अगंआपण आजीला सविस्तर विचारू.हवंतर एखाद्या दिवशी तिचं व्याख्यान ठेवू आपापल्या घरी.

चलतुझं काहीतरीच!

अगंव्याख्यान म्हणजे खरोखरचं व्याख्यान नाही.आपण सगळ्या मुला-मुलींनी आजीभोवती बसायचं नि तिला विचारायचं,कसे करायचे सण तुम्ही? माझी आजी तर यावर दोन तास बोलू शकते. वैशाली

मग माझी आजीही भरपूर माहिती सांगू शकते.

दोघीही बोलता बोलता घराजवळ आल्या. दोघींनी एकमेकींना बाय म्हणत घरचा रस्ता धरला.मात्र दोघींच्या मनात एकच विचार होता.

रात्रीची जेवणं संपल्यावर दोघींनी आपल्या-आपल्या आजीलाआईला जुन्या काळात सण कसे साजरे केले जात हा प्रश्न विचारला.जुन्या आठवणींना उजाळा मिळाला म्हणून घरातली मंडळी एकदम खुश झाली.वैशालीची मम्मी म्हणाली,आमच्यावेळेस सणात दिखाऊपणा नव्हता.सर्वांनी एकत्र येऊन सण साजरा व्हायचा.काही कुटुंबं तर घरातल्या लहान मुलांना आनंद मिळावा,त्यांना परंपरा समजाव्यात म्हणून सण आवर्जून साजरा करीत.एकदा घरात दुख:द घटना घडली होतीतरी वडील म्हणाले, मुलांच्या हौसेसाठी तरी सण करायलाच हवा.माझे वडील आम्हा मुलांना गणपतीची पूजा करताना तिचे विश्लेषण करून सांगायचे.दुर्वाच का? लाल फुलं का वाहतात हे समजावून सांगायचे.ते पंचामृत आमच्यासमोर बनवायचे.रोजचा नवाताजा हार आमच्याकडून बनवून घ्यायचे. आईतर आलेल्या पाहुण्यांची पाने वाढायला आमची मदत घ्यायची. ताट पुस,पाण्याचे तांबे बाहेर नेऊन ठेव,वाटी आण,चमचा दे.आमच्या नावाचा घरभर घोषा चालू असे.आम्हाला खूप मजा यायची.

तिकडे सरिताच्या घरीही यापेक्षा वेगळी परिस्थिती नव्हती.तिचे वडील तिला सांगत होते की, गणपतीचा सण आला की सर्वांनामखर बनवणे,आरास करणे याची आस लागे. सुमारे आठवडाभर आधीच तयारीला सुरूवात होई.माळ्यावरचं जुनं पण व्यवस्थित असलेलं सामान, आरास करायला काढलं जाई.घरादाराची स्वच्छता होई.आई अथंरूणपांघरूणं धुवून आणायची.मखाराची सजावट तर मुर्तीची स्थापना होईपर्यंत चालायची.त्यामुळे धिंगाणा मस्ती करायला वेळच नसायचा.

सरिताची आजी सांगत होती की आपण गणपतीची जशी मनोभावे पूजा करतो तसंच दर्शनासाठी आलेल्या पाहुण्यांचे,नातेवाईकांचे मनापासून स्वागत करण्यात घरातील सर्वजण पुढाकार घ्यायचे.लहान मुलांनी मोठ्यांच्या पाया पडणे हा संस्काराचा भाग मानला जायचा.मुलेही न सांगता,न विसरता मोठ्यांना खात्रीने नमस्कार करत.मुलांची पुजेसाठी फुले आणणे,दुर्वा आणणे अशी कामं ठरलेली असत.तर मुली रांगोळी काढणे,हार बनवणे,दुर्वांच्या जुड्या तयार करणे,दर्शनासाठी आलेल्यांना प्रसाद देणे ह्या कामात गुंतलेल्या असत.

दुसऱ्या दिवशी सरिता भारावल्यागत वैशालीला शाळेत जाताना भेटली.

अगंआपण जुन्या गाण्यांचा संग्रह मिळवू.त्या गाण्यांच्या ठेक्यावर आपला नाच बसवू.

माझ्याही मनात तेच आहे.मी आजीला याविषयी बोलले तर ती म्हणाली की मी गाणं बोलेन तू लिहून घे.

यंदा आपण असं करू की एका रात्री तुझ्या घरी कार्यक्रम करू,दुसऱ्या रात्री माझ्याघरी गाणी बोलू.कशी वाटते आयडिया?

एकदम झक्कास! माझे आजोबा गणपतीच्या जन्माची कहाणी सांगणार आहेत एक दिवस.वैशाली म्हणाली.

मग तर एकदम भारी होईल.आपण एखादं छोटंसं नाटक बसवायचं का?

नक्की! नारद आणि गणपतीची भेट हा विषय घेऊ या आपण.मात्र नाटक सादर करताना लाऊडस्पीकर नाही हं लावायचा.

तू म्हणतेस ते बरोबर आहे.मला तर वाटतं आपण हळूवारमृदू आवाजात बोललो तर ऐकणारे जाणीवपूर्वक ऐकतील तरी.

आपण सुरुवात तर करू! लोकांना आवडलं तर शांत राहून ऐकतीलरी?

शाळेत पोहोचल्यावर दोघींनी आपल्या मनातल्या कल्पना आपल्या वर्गमैत्रिणींना सांगितल्या.मैत्रिणींना सणाच्या स्वरूपातीलबदल हवाहवासा वाटला.मैत्रिणींनी दोघींना मदत करण्याचे आश्वासन दिले आणि त्यांनी गणेशोत्सवात दिलेले आश्वासन पाळलेही.

काल स्थानिक पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक सरपंचासह अचानक वैशालीच्या दारात आले.क्षणभर घरातली मंडळी दचकली.मात्र पोलिस निरीक्षक कऱ्हाडे साहेबांनी वैशालीचं नि तिच्या मैत्रिणीचं,सरिताचं नाव घेऊन कौतुक केलं. ते म्हणाले,तुमच्या पोरींनी सण योग्य रीतीने साजरा करण्याचा आदर्श गावकऱ्यांपुढे ठेवला.मी त्यांचं कौतुक करण्यासाठी आलोय.

ही बातमी गावभर तसेच शाळेतही पोहोचली. शाळेनेही या दोघींचं नि त्यांच्या मैत्रिणींचं खूप कौतुक केले.

## वाचाल तर वाचाल

# देशभक्त जेठमल सारस्वत

# जळगावच्या मातीतील स्वातंत्र्यलढ्याची प्रेरणादायी गाथा

पुस्तक परिचय
डॉ दीपक शिरसाट

जगदीश रवींद्र बियानी लिखित देशभक्त जेठमल सारस्वत (शहीद भगतसिंग यांची फाशी आणि अपरिचित क्रांतिकारकांची महान क्रांतिकथा)

पुस्तकात लेखकाने एकूण १६ ऐतिहासिक क्रांती कथांचा समावेश समावेश केलेला आहे. १०४ पृष्ठ असलेल्या या पुस्तकात प्रस्तावना व मनोगत यासह २९ चित्रांचा समावेश आहे.

सदर पुस्तकाचे मुखपृष्ठ हे जेठ मल सारस्वत यांच्या चित्रांसह भगतसिंग राजगुरू सुखदेव व चंद्रशेखर आजाद या महान चित्रांचा समावेश आहे. सदर पुस्तकाला प्राचार्य डॉ. बी. एन. पाटील माजी अधिष्ठाता मानव्यविद्या विद्याशाखा कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांची प्रस्तावना लाभलेली आहे. स्वातंत्र लढ्यातील जळगाव या पहिल्या कथेत लेखकाने राष्ट्रीय पातळीवर असलेल्या क्रांतिकारकांच्या चळवळीचा जळगाव शी असलेला संबंध व त्या संबंधातून जेठमल सारस्वत यांनी क्रांतिकारकांना केलेली मदत यांची पार्श्वभूमी वर्णलेली आहे. जहाल व मवाळ या भारतीय स्वातंत्र्याच्या विचारसरणीत लोकमान्य टिळकांपासून प्रेरणा घेऊन अनेक क्रांतिकारक देशात निर्माण झाले. स्वातंत्र्य लढ्यामध्ये प्रत्येक नागरिक आपापल्या विचारसरणीने भारतीय स्वातंत्र्यलढ्यासाठी योगदान देत होता. त्यामध्ये क्रांतिकारकांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.या क्रांतिकारकांनी स्वतःच्या जीवनाचा काही न विचार करता भारत भूमीसाठी आपली काया अर्पण केली. त्याचाच एक भाग म्हणून जेठमल सारस्वत यांचे योगदान लेखकाने दुसऱ्या कथेमध्ये त्यांच्या जन्मापासून त्यांचे जळगाव शहरामध्ये झालेले स्थलांतर व त्यांनी कशा पद्धतीने क्रांतिकारकाना मदत केली याचे वर्णन आहे.

तिसऱ्या कथेमध्ये हुतात्मा सोबत रक्ताचे नाते यात १३ एप्रिल १९१९ या दिवशी अमृतसर मध्ये झालेल्या जालियनवाला बाग हत्याकांड याचा परिणाम भारतातील नव तरुणांवर विशेषतः भगतसिंग, राजगुरू ,सुखदेव व चंद्रशेखर आझाद या नव तरुणांवर कसा झाला व त्यांनी कोणकोणत्या संघटना स्थापन केल्या व त्याचा परिणाम सर्वसामान्य देशभक्तांवर कसा याचे याचे वर्णन तसेच महिलांनी दिलेले योगदान चंद्रशेखर आझाद वासंती देवी यांचाही परिचय महत्वपूर्ण आहे. चौथ्या कथेमध्ये एक असाधारण पंडित या शीर्षकातून चंद्रशेखर आझाद यांच्या कार्यकर्तुत्वाचे वर्णन केलेले आहे. देशासाठी काहीतरी करावं या पाचव्या कथेत शिवराम हरी राजगुरू श्रीराम सावरगावकर व क्रांतिकारकांनी केलेल्या कार्याचे वर्णन आहे व त्यांनी स्थापन केलेल्या योजना याचे वर्णन आहे येथूनच जेटमल सारस्वत व त्यांच्या नऊ सहकाऱ्यांची झालेली मदत ११ सप्टेंबर १९२९ ची घटना सदाशिवराव मलकापूरकर आणि भगवानदास माहौर यांनी बॉम्ब तयार करण्यासाठी लागणारे रासायनिक पदार्थ व दोन पिस्तूल आणि काही काडतूस राजगुरूंना देण्यासाठी अकोला येथे जाताना पकडले गेले व त्यांच्यात व पोलिसांमध्ये भुसावळ रेल्वे स्थानकावर झालेली चकमक. वृत्तपत्रातून आलेली ही बातमी. लाहोर कटाच्या खटल्यात पंचवीस लोकांवर झालेले आरोप व त्यातील सात जण माफीचे साक्षीदार होऊन आपल्या साक्षीदारांवर उलटले होते. जय गोपाल आणि फनींद्र घोष यांनी सदाशिव मलकापूरकर आणि भगवानदास माहौर यांची केलेली ओळख, त्यांच्या गटात असून त्यांच्या विरोधामध्ये त्यांचे नावे सांगून त्यांचा केला विश्वासघात याचे वर्णन आहे.

फितूर या सहाव्या कथेमध्ये ११ सप्टेंबर १९२९ रोजी ग्वालियर वरून चंद्रशेखर आझाद यांनी हिंदुस्तान सोशलिस्ट रिपब्लिकन पार्टीचे काही साहित्य बंदुकीच्या गोळ्या माजवर पिस्तूल हे सर्व साहित्य महाराष्ट्रात अकोला येथे असलेले राजगुरू यांना सुपूर्त करण्यासाठी भगवानदास माहौर आणि सदाशिव राव मलकापूर कर या संघटनेच्या अत्यंत विश्वासू सहकार्यांना दिलेली जबाबदारी व महाराष्ट्रात भुसावळ मार्गाने अकोला येथे जाताना दोघेही पोलिसांच्या माध्यमातून




कसे पकडले गेले व या संघटनेतील जय गोपाल व फणींद्र घोष यांना जळगाव येथील कोर्टात होणाऱ्या साक्षीच्या वेळी संपवता येईल का? ही योजना व या योजनेसाठी जळगाव मधील जेठमल सारस्वत व त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेली मदत त्याचे नियोजन व वर्णन आले आहे. सदर कथेत सहकाऱ्यांनी कशी फितुरी केली ही प्रकर्षाने जाणवते. सात क्रमांकाची कथा प्रस्तुत पुस्तकाचा आत्माच वाटतो

या कथेत ११ सप्टेंबर १९२९ ची घटना भुसावळ रेल्वे स्थानकावर घडलेला प्रसंग त्या प्रसंगातून पोलिसांनी पकडलेले भगवानदास माहौर व सदाशिवराव मलकापूरकर यांच्या विरोधात त्यांच्याच सहकाऱ्यांनी जय गोपाल व फणींद्र घोष यांची झालेली फितुरी व न्यायालयात दिली जाणारी साक्ष. या दोन साक्षीदारांच्या विरोधात देशभक्त जेठमल सारस्वत व त्यांच्या सहकाऱ्यांनी चंद्रशेखर आझाद यांनी पाठवलेली पिस्तूल जेवणाच्या डब्यातून बंदूक पुरविण्यासाठी सदाशिव मलकापूर यांचे बंधू शंकरावजी मलकापूर आणून देणार होते याचे वर्णन . जिल्हा सत्र न्यायालय जळगाव, पूर्व खानदेशातील खादी सेवा संघ जळगाव .शंकरावजी मलकापूर देवकीनंदन सारस्वत यांच्यात झालेली भेट. ठरलेल्या योजनेप्रमाणे भगवानदास माहौर यांनी केलेला गोळी बार. किरकोळ जखमी झालेला जय गोपाल याचे वर्णन आहे. ही सर्व घटना आजच्या जळगाव मधील टावर चौकामधील शहर पोलीस स्टेशन येथे २१ फेब्रुवारी १९३० रोजी घडल्याची माहिती लेखकाने नमूद केलेली आहे. घटनेनंतर खानदेशातील ब्रिटिश अधिकारी हादरले व त्यांनी चंद्रशेखर आझाद यांच्या जळगाव जिल्ह्यातील स्थानिक सहकाऱ्यांना पकडण्यास सुरुवात केली. जेठमल सारस्वत व त्यांचे नऊ साक्षीदार यावेळी पकडले गेले. न्यायालयासमोर त्यांना हजर करण्यात आले केशवराव सोनारकर आणि बापूसाहेब चित्रे यांच्या अथक परिश्रमामुळे जेठमल सारस्वत त्यांचे नऊ सहकारी यांच्यावर कोणताही आरोप सिद्ध झाला नाही मात्र ब्रिटिश न्यायाधीशांनी त्यांना सहा महिन्याची सक्त मजुरीची शिक्षा केली याचे वर्णन केलेले आहे.

कथा क्रमांक आठ मध्ये इन्कलाब जिंदाबाद या घोष शीर्षकातून लेखकाने महात्मा गांधी क्रांती अमर रहे रामचंद्र चटोपाध्याय क्रांती क्रांतीची कारणे भगतसिंग यांच्या कार्यकर्तुत्वाचा व क्रांतिकारकांचा महाराष्ट्रशी आलेला संबंध वर्णन आहे. लढा साम्राज्यवादाचा या नव्या कथेत लाहोर कटातील आणि दिल्लीतील बॉम्बस्फोटात सहभागी क्रांतिकारकांना इंग्रजांनी केलेली अटक व त्यांच्यावर भरलेले खटले त्यांच्यावर केलेले विविध आरोप कोर्टाचे अधिकार तुरुंगातील चर्चा, भगतसिंग यांना झालेली फाशीची शिक्षा संपूर्ण घटकांचे वर्णन आहे.

आझाद हु आझाद रहूंगा..! या दहाव्या कथेमध्ये अल्फ्रेड पार्क मध्ये चंद्रशेखर आजाद व त्यांचे सहकारी यांचे भेटीचे नियोजन व चंद्रशेखर आझाद यांच्यावर झालेला हल्ला ३० ते ३५ पोलीस शिपाई चंद्रशेखर आझाद यांना घेरतात दोघातही चकमक होते. माजवर पिस्तुलाचे टोक डोक्याला लावून गोळी स्वतःवर झाळतात.भारत मातेच्या चरणावर चंद्रशेखर आझाद स्वतःला अर्पण करतात या चित्तथरारक प्रसंगाचे वर्णन केलेले आहे.

शस्त्र पुरवण्यासाठी चंद्रशेखर आझाद यांनी पाठवलेले भगवानदास माहौर आणि सदाशिव राव साहित्यासह भुसावळ रेल्वे स्टेशनवर पकडले गेले त्यांना पकडून धुळे येथील तुरुंगात टाकले.मी तेव्हा समजलो आता आपली हिंदुस्तान प्रजातंत्र सेना संपुष्टात येईल आणि मला कोणते क्षणी सापळा रचून अटक केली जाईल..

असे शिवराम हरी राजगुरू यांना तर्काने वाटले होते... व त्यांना ७ ऑक्टोबर १९३० रोजी फाशीची शिक्षा सूनवीण्यात येते. न्यायालयात शिवाजी का बच्चा म्हणून ते स्वतःचा (पान ६ वर)




# राष्ट्रीय आंदोलनात सातपुड्यातील भिल्ल आदिवासींचे योगदान

स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास समाजात स्वाभिमान जागविणारा आहे.देशातील सामान्य माणसाला अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्याचे बळ देणारा भारतीय स्वातंत्र्याचा हा लढा अत्यंत स्वाभिमानी असणाऱ्या वीर पुरुषांनी अन्यायाविरुद्ध केलेला उठाव होता. सातपुड्यातील भिल्ल आदिवासींनी स्वातंत्र्यासाठी दिलेले बलिदान व अंबापाणीचा ऐतिहासिक



स्वातंत्र्यलढा, स्वातंत्र्यासाठी घडलेला नरसंहार नव्या पिढी समोर आणण्यासाठी फारसे प्रयत्न झालेले नाहीत. हा उठाव जो केवळ आदिवासींनी केलेला उठाव होता म्हणून इतिहासाच्या पानावर त्याला योग्य ती जागा मिळाली नाही हे तेवढेच खरे. या लेख मालिकेतून अशाच दुर्लक्षित असलेल्या सातपुड्यातील भिल्ल आदिवासींनी स्वातंत्र्यासाठी केलेल्या उठावाची व बलिदानाची कहाणी मांडण्याचा छोटासा प्रयत्न.

### आदिवासींची शौर्यगाथा अंबापाणीची ऐतिहासिक लढाई-

गुजरात, खानदेश, नगर नाशिक, माळवा या भागात भिल्ल आदिवासी सतत इंग्रजांशी झगडत राहिले.भिल्लांच्या विरुद्ध भिल्लांना वापरण्यासाठी इंग्रजांनी भिल्लांना लष्करी शिक्षण देऊन पलटणी उभारल्या. त्यात खानदेश भिल्ल कोअर, माळवा भिल्ल कोअर, भरवाड भिल्ल कोअर, इरितपुरा इरेग्युलर फोर्सेस, धडगाव रायफल्स या पलटणींचा समावेश होता. १८१८ नंतरच्या ५० वर्षांत १८५७ पर्यंत सुमाऱ्या नाईक, रामजी नाईक, अवचित नाईक, रायजी नाईक, अभिमान नाईक, आनंदा नाईक, देवजी नाईक, पंद्या खान, भिल्ल्या नाईक, खंडू नाईक, गुमन्या नाईक, चिल्या नाईक, खाज्या नाईक, दौल्या नाईक, भीमा नाईक, भाऊ रावल, काळू बाबा, गोवाण्या नाईक, भागोजी नाईक, महिपत नाईक, हिराजी नाईक असे अनेक क्रांतिवीर इंग्रजांविरुद्ध लढत राहिले.

पोस्ट ऑफिस लुटणे, तार, खांब तोडणे, आग्रारोडवरची वाहतूक ठप्प करणे या व अशा अनेक कारवाया सातपुड्यातील आदिवासींनी केल्या. इ.स. १८५७ साली इंग्रजांनी नमते घेऊन इंग्रज सरकार व भिल्लांचे प्रतिनिधी भीमा नाईक व मोवाच्या नाईक यांच्यात वाटाघाटी सुरू झाल्या.परंतु मध्येच वाटाघाटी फिसकटल्या. भिल्लांचा बंदोबस्त करण्यासाठी मेजर ईव्हान्स याने भिल्लांना जंग जंग पछाडले. परंतु त्यांना भिल्ल नाईक पुरून उरले. संघर्ष चालूच राहिला. मेजर ईव्हन्स याने भिल्लांवर चाल करून अंबापाणी या ठिकाणी इंग्रज सैन्य व भिल्ल वीर यांच्यात घनघोर युद्ध झाले. या लढाईला अंबापाणीची लढाई म्हणतात. लढ्यात भिल्ल स्त्रियांचाही मोठ्या प्रमाणात सहभाग होता. खबर देणे, भाकरी पोहचवणे या कामी त्यांनी मदत केली. परिणामस्वरूप ४६० स्त्रिया व मुलांना पकडून धुळ्याच्या तुरुंगात डांबण्यात आले. लढाईत खाज्या नाईकचा मुलगा दौल्या नाईक याचा मृत्यू झाला. त्यांच्या बरोबर अनेक माणसे मारली गेली. ५७ भिल्लवीर सापडले त्यांना ताब्यात घेऊन, एका ओळीत उभे करून लष्करी ढोल वाजवून (ड्रम ट्रायल)उभ्याने गोळी घालून मारण्यात आले. स्वातंत्र्य संग्रामाचा हा लढा भिल्ल आदिवासींचा आत्मसन्मान वाढविणारा व चिरंतन स्फूर्ती देणारा आहे.

### ब्रिटिश सैन्याचे क्रौर्य व अंबापाणीची चित्त थरारक घटना-

मध्यप्रदेशातील शिरपूरजवळील अंबापाणी जंगलात खाजा नाईक हे आपल्या सहकाऱ्यांसह असल्याची माहिती ब्रिटीश सरकारला मिळाली. त्यांनी अत्याधुनिक शस्त्रासह एक पलटण त्याठिकाणी रवाना केली. ११ एप्रिल १८५८ रोजी ब्रिटीश सैन्याने या परिसरात हल्ला चढविला. भिल्ल समाजातील महिला व पुरुष यांनी एकत्र येत ब्रिटीश सैन्याविरुध्द लढाईस सुरुवात केली. तिरकमान, गोफण, तलवार यासारख्या पारंपरिक हत्यारांच्या सहाय्याने ब्रिटीश सैन्याला संपूर्ण दिवसभर झुंज देण्यात आली. भिल्लांच्या या सैन्याचे काही ब्रिटीश अधिकारी व सैनिकांना ठार मारले. या लढाईत अनेक भिल्ल सैनिक मारले गेले. सायंकाळच्या सुमारास खाज्या नाईक व भिमा नाईक हे दोघं सहकारी ब्रिटीश सैन्याने घेरलेल्या कड्यातून निसटले. या लढाईत ब्रिटीश सैन्याने क्रौर्याची सीमा गाठत 'ड्रम ट्रायल' खटला चालवून भिल्ल बांधवांना एका रांगेत उभे करून ढोल वाजवून गोळ्या घालून ठार मारले. कुठल्याही आधुनिक शस्त्रांशिवाय भिल्ल बांधवांनी निधड्या छातीने ब्रिटीश सैन्याशी दिलेला हा लढा इतिहासात अजरामर झाला. या लढाईत तरुणांच्या बरोबरीने साधारण ४०० महिलादेखील ब्रिटीश सैन्याविरुद्ध लढल्या. भिल्ल समाजातील महिलांनी दाखविलेले शौर्याचे असे उदाहरण जगातील कोणत्याही देशाच्या इतिहासात बघावयास मिळत नाही.

### विश्वासघाताने खाज्या नाईकची निर्घृण हत्या-

११ एप्रिल १८५८ ला झालेल्या अंबापाणीच्या लढाईनंतर खाज्या नाईक व भीमा नाईक हे दोघेजण जंगलात फरार झाले. १८६० पर्यंत या दोघांनी जंगलामध्येच राहत इंग्रजांना सळो की पळो करुन सोडले. शेवटी नोकरीतील बढतीचे आमिष व दोन हजारांच्या बक्षीसाच्या लालसेपोटी एकेकाळी खाज्या नाईक यांच्या सैन्यात सेवक म्हणून असलेल्या रोहिद्दिन मकरानी याने खाज्या नाईक यांना ठार मारण्याचा कट रचला. खाज्या नाईक जंगलात गोई नदीच्या काठावर सकाळच्या सुमारास अंघोळ करीत असतांना मकरानी हा त्यांच्याजवळ गोड बोलून पोहचला व खाज्या नाईक यांचे लक्ष दुसरीकडे वळताच त्यांच्या पाठीत गोळ्या घातल्या. ब्रिटीश अधिकाऱ्यांना दाखविण्यासाठी मकरानी याने खाज्या नाईक यांचे शिर तलवारीने कलम केले. धरणगाव येथे खाजा नाईक यांचा मुलगा दौल्या नाईक याने वडीलांचे शिर ओळखत ब्रिटीश अधिकाऱ्यांसमोर मकरानीला शिव्या घातल्या. यानंतर मकरानीला नौकरीत बढ़ती मिळून दोन हजाराचे बक्षीस देण्यात आले. धरणगावात सात दिवस झाडावर लटकविले शिर ब्रिटीश कालखंडात धरणगाव हे खान्देशातील पोलीसांचे मुख्यालय होते. त्यात बऱ्हाणपूर, आशिरगड, सटाणा, निमाड, निमाडमधील सेंधवा घाट, अजिंठा अशा भल्या मोठ्या परिसराचा समावेश होता. खानदेश पोलीस बटालीयनचा अधिकारी कॅ. बिर्च व औट्राम यांनी भिल्ल समाजातील तरुणांचा आदर्श असलेल्या नेत्याचे शिर धरणगावच्या मुख्यप्रवेश रस्त्यावर लटकविले (आताच्या धरणगाव रेल्वे स्थानकासमोरील भाग) ब्रिटीश सैन्याची दहशत निर्माण होऊन भिल्ल समाजाच्या टोळ्या ब्रिटीश सरकारविरुद्ध उठाव करणार नाहीत, या उद्देशाने तब्बल सात दिवस निंबाच्या झाडाला खाज्या नाईक यांचे कापलेले शिर लटकवून ठेवण्यात आले होते. या घटनेचे स्मरण म्हणून आदिवासी मोठ्या संख्येने दरवर्षी ११ एप्रिल रोजी याठिकाणी तसेच शिरपूर जवळील अंबापाणी येथे एकत्र जमत खाज्या नाईक यांना श्रध्दांजली वाहतात.

खाज्या नाईक यांच्या बाबतीत शासकीय नोंदी खाज्या नाईक यांचा मृत्यू कधी झाला याबाबत इतिहासात स्पष्ट नोंद नाही. काहींच्या मते खाज्या नाईक यांचा मृत्यू ११ एप्रिल १८५८ रोजी अंबापाणीच्या लढाईत झाला. तसेच त्यांचा मुलगा दौल्या नाईक याचा मृत्यू देखील त्याच दिवशी झाल्याचे सांगण्यात येते. पेशवेकालीन इतिहासात भिल्ल समाजाच्या अनेक उठावासंबंधी ब्रिटीशकालीन उपलब्ध असलेल्या दस्तऐवजात खाज्या नाईक यांचा संदर्भ अनेक ठिकाणी आढळतो.खानदेशातील संपुर्ण भिल्ल जमातींनी स्वातंत्र्य रक्षणासाठी केलेला संघर्ष असे या विद्रोहाचे स्वरुप होते. ब्रिटीशांनी उठाव करणाऱ्या जवळजवळ सर्वांनाच संपवून टाकले. अतिशय निष्ठुरपणे चिरडले. खानदेश परिसरातील हजारो आदिवासी स्वातंत्र्य विरांना दवंडी देऊन फाशी देणे, ड्रम ट्रायल देणे, क्रूरपणे गोळ्या घालून मारणे,सश्रम कारावासापासून मरेपर्यंत कारावासाची शिक्षा देणे, हा सगळा इतिहास अंगावर काटे आणणारा आहे. भिल्लांच्या प्रमुखांना किंवा उठावात भाग घेणाऱ्यांचे जीवन संपवून ब्रिटीश थांबले नाहीत तर उर्वरित समाजाला गुन्हेगार जमात म्हणून बदनाम केले. गुन्हेगार जमातीचा कायदा आणून समाजाला सन्मानाने जीवन जगण्यापासून वंचित ठेवण्याचे महापाप ब्रिटीश सरकारने केले. दुर्दैवाने खान्देशातील आदिवासींच्या स्वातंत्र्य लढ्यासाठीच्या विद्रोहाचा बलीदानाच्या इतिहासाला इतिहासकारांनी न्याय दिला नाही, तो उपेक्षितच राहीला हे कटू सत्य नाकारता येणार नाही. काही प्रमाणात इतिहासाचे गाढे अभ्यासक प्राचार्य डॉ.जी.बी. शहा,डॉ. कांतीलाल टाटिया, वीरसिंग पाडवी यांनी उपेक्षित जमातीतील वीर पुरुषांच्या शौर्यगाथा पुस्तक,कथा व लेख स्वरूपात लिहिल्या आहेत. हा व अन्य काही अपवाद वगळता पाहिजे तेवढे लिखाण यांच्यावर झालेले दिसत नाही.

क्रांतीवीर खाज्या नाईक यांचा अंत ते बेसावध असतांना झाला, घातपाताने झाला. शेवटपर्यंत लढण्याची उर्मी असणारा, हा वीर थकला नाही की झुकला नाही. त्यांचा त्याग, बलीदान, शौर्य, वीरता याचा इतिहास नव्या पिढीला प्रेरणा देणारा, स्वत्व जागृत करणारा आहे. आज ही खानदेशात या क्रांतीविराच्या कथा, त्यांचे शौर्य, त्यांची चपळता, त्याचा धीटपणा हा लोककलावंताचा पोवाड्याचा विषय आहे. सतत ३ वर्ष संघर्ष करणाऱ्या या योध्याच्या अनेक दंतकथा, आख्यायिका प्रचलीत आहेत. हा वीर खानदेशातील तमाम जनतेसाठीचा अभिमान आहे! या उठावामुळे भारतीय इतिहासाला कलाटणी मिळाली. हिंदुस्थानचा कारभार ईस्ट इंडिया कंपनीकडून काढून इंग्लंडच्या संसदेकडे सोपविण्यात आला बोर्ड ऑफ कंट्रोल रद्द करुन इंडिया कौन्सील नेमण्यात आले. सैन्याची पुनर्रचना करण्यात आली. संस्थानिक व सरकार यांच्यातील संबंध चांगले करण्याचा प्रयत्न सुरु झाला.




## मायभूमीचे सांस्कृतिक प्रतिबिंब...'माझा खानदेश'

'आपला महाराष्ट्र' च्या 'बहर' पुरवणीतील डॉ.संजय ढोडरे यांची 'माझा खानदेश'लेखमाला मी नित्यनेमाने वाचतो... गेल्या सहा दशकापासून धुळे शहरातील साहित्य,कला,समाज,संस्कृती चळवळीशी मी सक्रियपणे जुळलेलो आहे. केवळ खानदेशच नव्हे,तर संपूर्ण महाराष्ट्रात साहित्य,कला व सांस्कृतिक चळवळीचे केंद्र म्हणून धुळे शहराची अगदी सुरुवातीपासून ओळख राहिलेली आहे...या क्षेत्रातील दबदबा आजही आहे... खानदेशातील चळवळींचा परामर्श घेण्याचे ठरविले तर, तो घेण्यासाठी एक भलामोठा ग्रंथ अपुरा पडेल... डॉ.ढोडरे यांनी अगदी थोडक्या शब्दांमध्ये तो परामर्श घेण्याचा चांगला प्रयत्न चालवलेला आहे.

**'बहर' साहित्य पुरवणीतून अनेक नवलेखक, नवकवी तयार होऊन नावारूपाला आलेले मी पाहिले आहे.त्यांचीही भलीमोठी यादी होईल**

'माझा खानदेश' लेखमालेतील सर्व लेख मी अत्यंत बारकाईने न चुकता वाचले... यातून खानदेश मायभूमीबद्दल अज्ञात माहिती कळत गेली. एका अर्थाने 'माझा खानदेश' लेखमाला 'मायभूमीचे सांस्कृतिक प्रतिबिंब' म्हणता येईल. ही अत्यंत कौतुकास्पद व अभिनंदनीय बाब आहे . यातून लेखकाचे आपल्या मायभूमीबद्दलचे प्रेम प्रकर्षाने जाणवते. खानदेशातील स्वातंत्र्य चळवळ,भौगोलिक, ऐतिहासिक माहिती, धुळे शहरातील आई एकवीरा ' वाग्देवता मंदिर , राजवाडे इतिहास व संशोधन मंडळ ' राजवाडे यांचे कार्य , महात्मा गांधी तत्त्वज्ञान मंदिर ( केंद्र), खानदेश गोशाळा, खानदेशातील ऐतिहासिक गड किल्ले ' प्राचीन मंदिरे या सर्वांचा सखोल इतिहास आपण आमच्या समोर मांडला . अशा लेखनामुळे नवीन पिढीला आपल्या मायभूमीचा खरा व प्राचीन इतिहास कळाला . आपल्या लेखात खानदेशातील पारंपारिक सण-उत्सव ,बोली- भाषा अहिराणीतील गाणी यांचा देखील उल्लेख माझ्या वाचनात आला . ' यापुढील अंकात खानदेश सांस्कृतिक क्षेत्रातील कलावंत यांच्या बद्दल लिहावे... अशी कलावंत म्हणून मी आपणाकडून अपेक्षा करतो... लेखमालेतून वैचारिक व उद्बोधनात्मक माहिती उपलब्ध करून दिल्याबद्दल आपले व दैनिक 'आपला महाराष्ट्र' समूहाचे हार्दिक अभिनंदन ...!

- **श्री.विश्राम बिरारी**, **अध्यक्ष- खानदेश अहिराणी कला व सांस्कृतिक संस्था, धुळे**




# आयकर कायद्यानुसार व्यवसायाच्याहिशोबाची पुस्तके ठेवणे कोणाला बंधनकारक आहे?

व्यवसायात नफा कमावणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच त्या नफ्याचा योग्य हिशोब ठेवणेही महत्त्वाचे आहे. अनेक व्यावसायिक आणि उद्योजक व्यवसाय सुरू करताना विक्री वाढविणे, ग्राहक मिळविणे आणि नफा कमावणे यावर भर देतात; परंतु व्यवसायाचे नियमित हिशोब, बिले, खर्चाच्या नोंदी आणि आर्थिक व्यवहारांची योग्य नोंद ठेवण्याकडे अनेकदा दुर्लक्ष होते. काही लहान व्यावसायिक तर आमचा व्यवसाय छोटा आहे, त्यामुळे आम्हाला हिशोबाची पुस्तके ठेवण्याची गरज नाही असा गैरसमज करून घेतात.

प्रत्यक्षात, आयकर कायद्यानुसार अनेक व्यवसायिक आणि व्यावसायिकांसाठी हिशोबाची पुस्तके ठेवणे बंधनकारक आहे. यामागील मुख्य उद्देश म्हणजे करदात्याचे वास्तविक उत्पन्न अचूकपणे निश्चित करणे आणि आयकर विभागाला आवश्यकतेनुसार ते पडताळून पाहता यावे. योग्य हिशोबामुळे केवळ करनिर्धारण सुलभ होत नाही, तर व्यवसायाचे आर्थिक नियोजन, बँक कर्ज, गुंतवणूक, लेखापरीक्षण आणि भविष्यातील विस्तार यासाठीही मोठी मदत होते.

आयकर कायदा, २०२५ मधील कलम ६२ मध्ये कोणत्या व्यक्तींनी हिशोबाची पुस्तके ठेवावीत, कोणत्या परिस्थितीत ती बंधनकारक होतात आणि कोणत्या व्यवसायांवर हा नियम लागू होतो याची सविस्तर तरतूद करण्यात आली आहे.

हिशोबाची पुस्तके ठेवण्यामागील मुख्य उद्देश म्हणजे करदात्याचे एकूण उत्पन्न अचूकपणे निश्चित करता यावे. त्यामुळे आयकर अधिकाऱ्याला व्यवसायातील उत्पन्न, खर्च, मालसाठा, देणी, घेणी आणि इतर आर्थिक व्यवहारांची पडताळणी करणे शक्य होते.

१. हिशोबाची पुस्तके ठेवणे खालीलविशिष्ट व्यवसायासाठी अनिवार्य आहेत: -

वकील, डॉक्टर, अभियंता, वास्तुविशारद, अकाउंटंट, तांत्रिक सल्लागार, इंटिरिअर डेकोरेटर, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील व्यावसायिक, कंपनी सेक्रेटरी, चित्रपट कलाकार (चित्रपट उद्योगात व्यावसायिक म्हणून कार्य करणारी व्यक्ती)या व्यवसायांपैकी कोणत्याही व्यवसायातील व्यक्तीचीवार्षिक एकूण उलाढाल/प्राप्ती १,५०,००० पेक्षा जास्त असल्यास, त्या व्यक्तीने आयकर कायदा, २०२५ नुसार विहित हिशोबाची पुस्तके आणि आवश्यक कागदपत्रे ठेवणे अनिवार्य आहे.

२. व्यक्ती आणि हिंदू अविभक्त कुटुंब इतर व्यवसायांसाठी विशेष मर्यादा:

आयकर कायदा, २०२५ मध्ये व्यक्ती आणि हिंदू अविभक्त कुटुंब यांना विशेष सवलत देण्यात आली आहे. अशा करदात्यांच्या बाबतीत वरील मर्यादांऐवजी जास्त मर्यादा लागू होतात. त्यामुळे त्यांच्या व्यवसायाचे उत्पन्न २,५०,००० पेक्षा जास्त असेल किंवा व्यवसायाची एकूण विक्री, उलाढाल २५,००,००० पेक्षा जास्त असेल, तर त्यांना हिशोबाची पुस्तके ठेवणे बंधनकारक आहे.

ही विशेष मर्यादा फक्त खपवळींळवींरश्र आणि क्ळाऋ यांनाच लागू असून ऋळी, ङङ्ग, डेरिपू, -जझ, इजख किंवा -गझ यांना लागू होत नाही.

३. भागीदारी संस्था, मर्यादित दायित्व भागीदारी, कंपनी, व्यक्तींची संघटना , व्यक्तींचा समूह, कृत्रिम न्यायिक व्यक्ती यांच्यासाठी



मर्यादा: या करदात्यांच्या बाबतीतहिशोबाची पुस्तके ठेवण्याबाबत स्वतंत्र वाढीव मर्यादा देण्यात आलेली नाही. त्यामुळे या करदात्यांच्या बाबतीत, मागील तीन कर वर्षांपैकी कोणत्याही एका वर्षात व्यवसायाचे उत्पन्न १,२०,००० पेक्षा जास्त असेल किंवा व्यवसायाची एकूण विक्री, उलाढाल अथवा स्थूल प्राप्ती १०,००,००० पेक्षा जास्त असेल, तर त्यांना आयकर कायदा, २०२५ नुसार विहित हिशोबाची पुस्तके ठेवणे बंधनकारक आहे.

४. अनुमानित करप्रणाली स्वीकारल्यास हिशोबाची पुस्तके ठेवण्याची गरज असते का?

आयकर कायद्यामध्ये काही पात्र करदात्यांसाठी अनुमानित करप्रणाली उपलब्ध आहे. या योजनेचा पर्याय स्वीकारल्यास करदात्याला नियमित हिशोबाची सर्व पुस्तके ठेवण्याची आवश्यकता नसते. कारण या योजनेत व्यवसायाचा नफा कायद्यानुसार निश्चित टक्केवारीने गृहीत धरून आयकराची गणना केली जाते.

तथापि, याचा अर्थ व्यवसायाच्या कोणत्याही नोंदी ठेवण्याची गरज नाही, असा होत नाही. करदात्याने व्यवसायाशी संबंधित विक्री, खरेदी, पावत्या, बिले, बँक व्यवहार आणि इतर आवश्यक आर्थिक नोंदी जतन करून ठेवणे हितावह व आवश्यक आहे. या नोंदी भविष्यात आयकर विभागाकडून चौकशी झाल्यास किंवा व्यवसायाची उलाढाल सिद्ध करण्यासाठी उपयुक्त ठरतात.

५. कलम ६२ आणि आयकर नियमांनुसार कोणती हिशोबाची पुस्तके ठेवणे आवश्यक आहे?

आयकर अधिनियम, २०२५ मधील कलम ६२ आणि त्याअंतर्गत करण्यात आलेल्या आयकर नियमांनुसार, करदात्याने त्याच्या व्यवसायाचे किंवा व्यावसायिक उत्पन्नाचे अचूक निर्धारण करता यावे यासाठी आवश्यक हिशोबाची पुस्तके आणि कागदपत्रे ठेवणे बंधनकारक आहे. यामध्ये रोकड वही, जर्नल (मर्कन्टाईल पद्धतीने हिशोब ठेवत असल्यास), लेजर, अनुक्रमांकित विक्री बिले व पावत्यांच्या प्रती, खरेदीची मूळ बिले, खर्चाची बिले व व्हाउचर्स (बिल उपलब्ध नसल्यास योग्य तपशीलासह तयार केलेले व्हाउचर्स), नफा-तोटा खाते आणि ताळेबंद (इरश्ररपलश डहशशीं) यांचा समावेश होतो. तसेच, करदात्याच्या व्यवसायाच्या स्वरूपानुसार स्टॉक रजिस्टर, वेतन नोंदवही, कराशी संबंधित नोंदी, बँक व्यवहारांची नोंद, देणी-घेणीची नोंद तसेच इतर आवश्यक अभिलेख देखील ठेवणे आवश्यक असू शकते.

६. हिशोबाची पुस्तके किती काळ जतन करून ठेवावीत?

आयकर अधिनियम, २०२५ अंतर्गत नियम ४६(९) नुसार, हिशोबाची पुस्तके, बिले, व्हाउचर्स आणि इतर आवश्यक कागदपत्रे संबंधित कर वर्ष संपल्यानंतर सात (७) कर वर्षे जतन करून ठेवणे बंधनकारक आहे. तसेच, जर एखाद्या कर वर्षाचे मूल्यांकन किंवा पुनर्मूल्यांकन पुन्हा सुरू करण्यात आले असेल, तर त्या कर वर्षाशी संबंधित सर्व हिशोबाची **(पान ६ वर)**




# एक फूल आणि संस्कार

५ सप्टेंबर, शिक्षक दिन. आदल्या दिवशी शाळेच्या व्हॉट्सप ग्रुपवर एक छोटीशी सूचना आली होती ५ सप्टेंबरला येताना दोन गुलाबाची फुले सोबत आणा.

सूचना वाचली आणि मनात आलं, लहान मुलांसाठी शिक्षक दिन म्हणजे किती आनंदाचा दिवस असेल!

सकाळी चिन्मय आणि चैतन्यला शाळेत सोडण्यासाठी मी निघालो. दोघांकडे मिळून चार गुलाबाची फुले होती. शाळेच्या रस्त्याने जात असताना मी सहजच चिन्मयला म्हटलं,

गेल्यावर टीचरला एक फूल दे. मी ते सहज म्हणून गेलो. पुढच्या क्षणी माझं लक्ष दुसऱ्या गोष्टीकडे गेलं. पण चिन्मयने मात्र माझे ते शब्द मनात कुठेतरी जपून ठेवले असावेत. शाळेत पोहचलो. त्याने दप्तर बाजूला ठेवले. मग आपल्या हातातील गुलाबांकडे पाहिले आणि त्यातील एक फूल काढून तो थेट आपल्या टीचरसामोर जाऊन उभा राहिला.

हॅपी टीचर्स डे! असं म्हणत त्याने ते फूल टीचरला दिलं. त्या छोट्याशा कृतीने टीचरच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद पाहण्यासारखा होता. त्यांनी त्याचे कौतुक केले. चिन्मयही आनंदून गेला. मग फोटोसाठी तो टीचरजवळ उभा राहिला. हातात उरलेले फूल, चेहऱ्यावर समाधान आणि डोळ्यांत एक वेगळाच उत्साह. हा प्रसंग माझ्या डोळ्यांसमोर घडला होता. त्यामुळे तो क्षण मनात तसाच साठून राहिला.

त्या दिवशी शाळेतील प्रत्येक मुलाने दोन-दोन फुले आणली होती. त्यामुळे शाळेत बरीच फुले एकत्र आली होती. मुलांनी आपल्या शिक्षकांना, आवडत्या टीचरना ती दिली असतील. काहींनी कदाचित एकमेकांनाही वाटली असतील. शिक्षक दिनाचा आनंद अशाच छोट्या कृतींमधून सगळ्या शाळेत पसरला असणार. पण माझ्या मनात मात्र चिन्मयचा तो पहिला प्रसंग राहिला. कारण मी त्याला काही मोठं सांगितलं नव्हतं. केवळ सहज म्हणून गेलो होतो-टीचरला एक फूल दे. त्याने ते लक्षात ठेवलं आणि शाळेत पोहोचताच दप्तर बाजूला ठेवून आपलं काम केलं. आपण मोठी माणसं अनेकदा बोलतो, ऐकतो आणि विसरून जातो. मुलांचं मात्र वेगळंच असतं. त्यांच्या मनाला एखादी गोष्ट पटली की ती ते लगेच कृतीत आणतात. त्यासाठी फार विचार करावा लागत नाही. शाळा सुटल्यावर चिन्मय आणि चैतन्यला घ्यायला मी पुन्हा शाळेत गेलो. मला पाहताच चिन्मय आनंदाने उड्या मारत माझ्याकडे आला. बाबा, मी साऱ्या टीचरला फुलं दिली! त्याच्या आवाजातला उत्साह ऐकण्यासारखा होता. दिवसभर त्याने शिक्षकांना फुले दिली होती आणि त्याचा आनंद अजूनही त्याच्या चेहऱ्यावर होता. तेवढ्यात चैतन्यने आपली निरागस तक्रार केली- बाबा, दादाने मला फुलं दिली नाहीत म्हणून मला जास्त वाटता आली नाही. मी क्षणभर दोघांकडे पाहत राहिलो. चिन्मयला सगळ्या टीचरना फुले दिल्याचा आनंद होता, तर चैतन्यला त्यात आपलाही थोडा अधिक वाटा हवा होता. जुळ्या भावांमध्ये असणारी ही छोटीशी हक्काची भावना किती गोड होती! नंतर मला आणखी एक सुंदर क्षण पाहायला मिळाला. जुळे असल्यामुळे चिन्मय आणि चैतन्य दोघांनी मिळून त्यांच्या आवडत्या टीचरला फूल दिलं होतं. त्या प्रसंगाचा फोटोही मला पाहायला मिळाला. दोघेही आपल्या टीचरच्या शेजारी उभे होते. तो फोटो पाहताना मन प्रसन्न झालं.

या छोट्याशा प्रसंगातून मला पुन्हा एकदा प्राथमिक शिक्षकांच्या कामाचं महत्त्व जाणवलं. महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा करण्यासाठी विद्यार्थ्यांना सांगावं लागतं. कार्यक्रमाची सूचना द्यावी लागते, सहभागासाठी आग्रह करावा लागतो. पण प्राथमिक शाळेतील मुलांना फारसं काही सांगावं लागत नाही. त्यांच्या मनात भावना अजून ताज्या असतात. शिक्षकांविषयीचा आदर ते एखाद्या फुलातूनही व्यक्त करू शकतात. प्राथमिक शिक्षकांचं काम म्हणूनच मला नेहमीच विशेष महत्त्वाचं वाटतं. ते मुलांना केवळ अक्षरं आणि आकडे शिकवत नाहीत; त्यांच्या कोवळ्या मनाला आकार देत असतात. नमस्कार करणे, मोठ्यांचा आदर करणे, धन्यवाद म्हणणे, दुसऱ्याला आनंद देणे आणि आपल्या आनंदात दुसऱ्यालाही सहभागी करून घेणे-या सगळ्याची सुरुवात याच वयात होते. शिक्षणाचा खरा परिणाम गुणपत्रिकेपेक्षा मुलांच्या वागण्यात दिसतो. एखाद्या शिक्षकाला पाहून त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेलं हसू, कुणाला मदत करण्याची सहज इच्छा किंवा आपल्याला मिळालेला आनंद दुसऱ्याबरोबर वाटण्याची तयारीहीसुद्धा शिक्षणाचीच फळं आहेत. त्या दिवशी शाळेत अनेक फुले वाटली गेली. काही शिक्षकांच्या हातात पोहोचली, काही मुलांच्या हातातून दुसऱ्या हातात गेली. फोटो काढले गेले आणि दिवसाची आठवण जपली गेली. पण माझ्यासाठी त्या दिवसाची गोष्ट एका छोट्याशा कृतीमुळे खास झाली.



शाळेत गेल्या गेल्या चिन्मयने माझे सहज बोलणे लक्षात ठेवून टीचरला दिलेलं ते एक फूल.

त्या एका फुलात मला मुलाची निरागसता दिसली. शिक्षकांविषयीचा आदर दिसला आणि ऐकलेली चांगली गोष्ट कृतीत आणण्याची तयारीही दिसली. मग वाटलं, त्या दिवशी मुलांच्या हातात असलेली फुले काही काळाने कोमेजतील. पण त्या फुलांच्या निमित्ताने त्यांच्या मनात जे रुजलं, ते अधिक महत्त्वाचं आहे. कदाचित त्या दिवशी हातातल्या फुलांबरोबर त्यांच्या मनात संस्कारांचं एक छोटंसं रोपही रुजलं असेल.

त्याला पाणी मिळत राहिलं, तर पुढे त्यावर चांगल्या कृतींची फुलं उमलत राहतील. आजोबांच्या डायरीत त्या दिवसाची नोंद म्हणून एवढंच- शिक्षकांना दिलेलं फूल हातातून निघून गेलं; पण त्याच क्षणी चिन्मय-चैतन्यच्या मनात उमललेला संस्कारांचा गुलाब मात्र कायमचा जपून ठेवावा असा होता.

## शब्दझुला

### परतीचा पाऊस.. बरसलाच नाही...

बरसलाच नाहीस तर
परतीचा प्रवास कसला?...
पृथ्वी तृप्त झाली नाही
तरी परतीचा प्रवास कुठला...
शेतकरी मृग नक्षत्राची वाट
पाहतात
शेतात दाणे पेरतात...
आभाळाकडे डोळे लावतात
बरसला नाही तर अश्रू
ढाळतात...
खूप तूट दिलीस पाण्याची
सुकले की शेत शिवार सार...
त्यांना जीवदान देण्यासाठी
ये कि जरा मुसळधार...
परतीचा पाऊस नीट येर
मिळेल साऱ्याला जीवदान...
तृप्त कर धरणीला
हिरवे कर सारे रान...

– विजया भट, धुळे.



### नभ बरसावे

हया मेघांनी बरसून जावे
आणि मातीतुन अंकुर फुटावे
सृष्टीला गंधित सुगंधित करावे
एकाचे हजारात दाणे भरावे.
तुझ्या कृपेनें जीव सारीच
जगावे
येण्याचं फलीत त्यांनी करावे
इथं नवं निर्मिती टाकून जावे
देत देत साऱ्यांनी जगावे.
जीव जीवन आनंदी व्हावे
जरी जिवश्य जीवनम तरी
क्षण उपभोगून हो घ्यावे
परत रे तुच सामावून घ्यावे.

– प्रदीप मनोहर पाटील, गणपूर जळगाव
मो. ९९२२२३९०५५

## आयकर कायद्यानुसार व्यवसायाच्या हिशोबाची पुस्तके ठेवणे कोणाला बंधनकारक आहे?

(पान ४ वरुन) पुस्तके आणि कागदपत्रे सदर मूल्यांकनाची कार्यवाही पूर्ण होईपर्यंत जतन करून ठेवणे आवश्यक आहे.

७. कलम ६२नुसार लेखा नोंदी न ठेवल्याबद्दल दंड :-

कलम ४४१ नुसार, करदात्याने कलम ६२ किंवा त्याअंतर्गत करण्यात आलेल्या नियमांचे पालन न केल्यास किंवा आवश्यक हिशोबाची पुस्तके, कागदपत्रे व अभिलेख विहित कालावधीपर्यंत जतन करून ठेवले नसल्यास, निर्धारण अधिकारी यांच्याकडून २५,००० पर्यंत दंड आकारला जाऊ शकतो.

याशिवाय, आवश्यक हिशोबाची पुस्तके उपलब्ध नसल्यास किंवा अपूर्ण असल्यास, आयकर विभागाला करदात्याचे उत्पन्न उपलब्ध माहिती व पुराव्यांच्या आधारे निश्चित करण्याचा अधिकार असू शकतो. त्यामुळे प्रत्येक करदात्याने केवळ हिशोबाची पुस्तके ठेवणेच नव्हे, तर ती आयकर नियमांमध्ये नमूद केलेल्या कालावधीपर्यंत सुरक्षित जतन करून ठेवणेही तितकेच आवश्यक आहे.

आयकर अधिनियम, २०२५ अंतर्गत हिशोबाची पुस्तके ठेवण्याची तरतूद ही केवळ आयकराच्या उद्देशाने आहे. तथापि, करदात्याच्या व्यवसायाचे स्वरूप, कायदेशीर रचना आणि नोंदणीच्या प्रकारानुसार इतर अनेक कायद्यांमध्येही हिशोबाची पुस्तके ठेवणे बंधनकारक असू शकते. त्यामुळे एखाद्या करदात्याला आयकर अधिनियमांतर्गत पुस्तके ठेवण्याची सक्ती नसली, तरी इतर लागू असलेल्या कायद्यांनुसार त्याला आवश्यक हिशोबाची पुस्तके आणि अभिलेख ठेवावे लागू शकतात.

उदाहरणार्थ, वस्तू व सेवा कर कायदा अंतर्गत नोंदणीकृत करदात्यांनी GST नियमांनुसार आवश्यक हिशोबाची पुस्तके आणि नोंदी ठेवणे बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे कंपनी अधिनियम, २०१३ अंतर्गत प्रत्येक कंपनीने विहित लेखा पुस्तके आणि आर्थिक अभिलेख ठेवणे आवश्यक आहे. भारतीय मर्यादित दायित्व भागीदारी अधिनियम, २००८ अंतर्गत ङ्खङ्झ ला देखील योग्य लेखा नोंदी ठेवाव्या लागतात. तसेच सार्वजनिक ट्रस्ट, धर्मादाय संस्था, सहकारी संस्था, सोसायटी किंवा इतर विशेष कायद्यांअंतर्गत नोंदणीकृत संस्थांनाही संबंधित कायद्यांनुसार हिशोबाची पुस्तके ठेवण्याची जबाबदारी असते.

## छत्रपती शिवाजी महाराजांचे अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य

(पान ३ वरुन) किल्ले रायगडावरून ही संदेशवहन यंत्रणा कार्यरत केली जात असे. रायगड हा जवळ-जवळ ६५ किल्ल्यांच्या गराडयात आहे. या किल्ल्यावरून संपर्क यंत्रणेचे केलेले नियोजन नाविन्यपूर्ण होते. तोफेचा व नगाऱ्याचा केलेला आवाज, त्याचबरोबर विविध वनस्पतींचा धूर हे ही संदेशवहन यंत्रणेचे एक माध्यम होते. गवताच्या गंजी पेटविणे व वेगवेगळ्या वनस्पतींचा धूर या माध्यमातूनही संपर्क यंत्रणा वापरली जात असे.

**अमावास्याही पुण्यपर्व :** लोक अमावास्येला अशुभ मानून चांगले कार्य करण्याचे टाळतात. परंतु छत्रपतींनी आपल्या महत्त्वाच्या मोहिमा, स्वाऱ्या व स्वराज्यातील कामे याच दिवशी केली आणि त्यात राजे यशस्वी देखील झाले. दि. ६ जानेवारी १६६५ रोजी शुक्रवार या दिवशी ग्रहणाचा मोक्षकाळ सुरू झाला, त्या पौष वद्य अमावास्येच्या दिवशी महाराजांनी महाबळेश्वर येथे आऊसाहेबांची सुवर्णतुला करून अमावस्या देखील पुण्यपर्व मानले. अशा प्रकारे शुभ व अशुभ पाहून अथवा मुहुर्त काढून त्यांनी कार्य केले नाही; तर चांगले कार्य करून सत्कर्म श्रेष्ट मानले.

**सती प्रथेला विरोध:** सती प्रथा ही मध्ययुगीन काळातील अमानुष प्रथा. पतीच्या निधनानंतर धर्माच्या नावाखाली स्त्रियांना पेटत्या चितेवर जिंवत जाळले जात असे. छत्रपतींनी सती प्रथेला कडाडून विरोध केला. शहाजी राजांच्या निधनानंतर माता जिजाऊ सती न जाता छत्रपती शिवाजी महाराजांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहिल्या. त्यांची ही कृती काळाच्या पुढचे पाऊल होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक करून सार्वभौम असे स्वराज्य निर्माण केले. अनिष्ट प्रथा, परंपरा नष्ट करून वैज्ञानिकतेला महत्त्व दिले. त्यांची प्रत्येक कृती वैज्ञानिक दृष्टीकोनाची साक्ष देते.

**पुरोगामी विचारांची पेरणी:** छत्रपतींनी भारतवर्षामध्ये प्रथमतः पुरोगामी विचारांची पेरणी करण्यास सुरुवात केली. छत्रपती शिवाजी महाराजांचे कनिष्ठ पुत्र छत्रपती राजाराम महाराजांचा दि. २४ फेब्रुवारी १६७० रोजी किल्ले राजगडावर जन्म झाला. ते पालथे जन्माला आले. त्यावेळी पुरोहित म्हणाले, 'मुलगा पालथा जन्मला, अपशकुन झाला'. त्यावेळी छत्रपती उदगारले,'ज्याअर्थी माझा मुलगा पालथा जन्माला आला, त्याअर्थी तो दिल्लीची पातशाही पालथी घालेल आणि पालथे राज्यही सावरेल; पालथे झाल्याखेरीज काही वेचता येत नाही'. त्यांचा हा दृष्टीकोन प्रगत आणि पुरोगामी विचारसरणी दर्शवतो.

**औषधोपचाराला महत्त्व :** मांत्रिक, तांत्रिक, जादूटोणा हे निरुपयोगी व निरर्थक असून औपधोउपचारानेच आजार बरा होतो, हे छत्रपतींचे विचार काळाच्या पुढे होते. कान्होजी जेधे आजारी असल्याची माहिती छत्रपती शिवाजी महाराजांना मिळाली. तेव्हा २ सप्टेंबर १६६० रोजी कान्होजी जेधे यांना एका पत्रात छत्रपती लिहितात, 'औसध घेऊन शरीरासी आरोग्य होई ते करणे. उपचाराचे विशी आलस न करणे. औषधोपचार घेऊन बरे होणे. त्याबाबत हयगय करू नये'. असा अगदी वैद्यकीय दृष्टीचा व मायेचा सल्ला ते कान्होजी जेधे यांना देतात. औपधोपचाराने आजारावर मात करून आरोग्यलाभ करता येतो, हे त्यांचे विचार तर्कसंगत आहेत.

छत्रपतींनी स्वराज्यात सर्वप्रथम आधुनिक विचारांची पेरणी केली. त्यांनी बुद्धिप्रामाण्यवादाने अंधश्रद्धेवर मात करून विज्ञानवादाचा पाया घातला. समाजाला नवी दृष्टी देणारे त्यांचे हे विचार श्रेष्ठ असेच आहेत. मध्ययुगीन कालखंडामध्ये छत्रपतींनी पुरोगामी विचारसरणीचा अवलंब करून आधुनिकतेची मशाल पेटविली. त्यांचे हे कृतिशील विचार जगासाठी अनुकरणीय असेच आहेत.

## आरोग्यम् धनसंपदा

डॉ.नितीन जाधव
मो.९८९२३०६०९२

# ऍसिडिटी समजून दुर्लक्ष करु नका!

मानवी जीवन खूप धावपळ आणि ताणतणावाने ग्रासलेले आहे. प्रत्येक माणूस नोकरीधंद्याच्या निमित्ताने करिअरच्या मागे धावत आहे. असे हे छोटे-मोठे ताणतणाव, चिंता याशिवाय बदलत्या जीवनशैलीमुळे फास्टफूडचा वापर, जेवणाच्या अनियमित वेळा यामुळे आम्लपित्त किंवा ऍसिडिटीचा त्रास सुरू होतो.

**आम्लपित्त**

दीर्घकाळ पाठपुरावा करणारा आजार. भरपूर प्रमाणात तिखट - तेलकट सेवन, जास्त मद्यपान, जड जेवण, अतिचिंता व झोपेचा अभाव यामुळे आम्लपित्ताचा त्रास सुरू होतो. अशा परिस्थितीत पोटात आम्ल जास्त प्रमाणात तयार झाल्याने मळमळते. याची प्रमुख लक्षणे म्हणजे मळमळ, डोकेदुखी, चक्कर येणे, तोंडाला पाणी सुटणे, तोंड आंबट व कडू वाटणे, आंबट ढेकर येणे अशी आहेत. अन्न घशाशी आल्यासारखे वाटते. कधी-कधी उलट्या होतात. दीर्घकाळ अपचन व आम्लपित्त असल्यास गॅस्ट्रिक अल्सर किंवा जठरव्रण या आजाराचे चिन्ह समजावे.

**गॅस्ट्रिक अल्सर किंवा पेप्टिक अल्सर*:***

अल्सर म्हणजेच जखम. जठराच्या आतील आवरणात जखम किंवा व्रण झाल्यास त्याला पेप्टिक अल्सर म्हणतात. हे व्रण साधारणतः अन्ननलिकेच्या खालच्या बाजूस, जठरात किंवा आतड्याच्या सुरवातीच्या भागात आढळतात. जठरामधील अन्नरसातील आम्लाचे प्रमाण जास्त वाढल्याने जठरव्रण होतो. पोटाच्या वरच्या बाजूस ठणकत राहते. याची प्रमुख कारणे म्हणजे मद्य, मिरची, मसाले, तेलकट पदार्थांचे अतिप्रमाणात सेवन, सिगारेट, तसेच मानसिक ताणतणाव. याशिवाय दात, हिरड्या, घसा, कान या ठिकाणी जंतुसंसर्ग झाला तर त्यातून तयार होणारी दूषित द्रव्ये पोटात गेल्याने त्याचा जर जठराच्या एखाद्या भागावर परिणाम झाला, तर ज्या भागावर परिणाम झालेला आहे तेथे जखमा होतात. त्यामुळेही अल्सर होतात.



**अल्सरचे प्रकार**

ऍक्यूट पेप्टिक अल्सर जठराच्या जागेवर खूप दुखते. अन्न घेताच दुखणे वाढते. मळमळते, उलटी होते. उलटी झाल्यावर बरे वाटते. जठरव्रणातून रक्तस्राव होत असेल तर रुग्णाला शौचास काळ्या रंगाची होते. कधी-कधी पोटदुखी जास्त दिवस चालू राहते. नंतर त्रास कमी होतो, पण परत थोड्या दिवसांनी सुरू होतो. जठरव्रणावर वेळेत उपचार झाले नाहीत, तर रक्ताची उलटी होते. पोटातील कळ अचानक वाढून पोट ताठ होते व आंतर्त्वचादाह किंवा पेरिटोनायटिसची लक्षणे दिसतात.

**क्रॉनिक गॅस्ट्रिक अल्सर** या प्रकारचा अल्सर जठरातील जुनाट जखमेमुळे होतो. या आजाराचे रुग्ण साधारणतः मध्यमवयीन असतात. मानसिक ताणतणाव याचे प्रमुख कारण आहे.

**प्रमुख लक्षणे म्हणजे अपचना**चा सतत त्रास होतो. पोटात वरच्या डाव्या बाजूला दुखते. हे दुखणे जेवल्यानंतर अर्ध्या ते दोन तासांनंतर चालू होते. पोटात टोचल्यासारख्या वेदना होऊन आग होते. कधी-कधी त्या जागी जडपणा येतो व रुग्णास अशक्तपणा येतो. विश्रांती घेतल्यावर बरे वाटते. हलके अन्न पचते. मसालेदार, तेलकट पदार्थांमुळे पोटात आग होऊन उलटी होते, मळमळते. या रुग्णांना बद्धकोष्ठतेचा त्रास अधूनमधून होतो.

**ड्युओडिनल अल्सर** लहान आतड्याच्या सुरवातीचा भाग जठराच्या खालच्या टोकाला जोडलेला असतो. या भागात होणाऱ्या जखमेला ड्युओडिनल अल्सर म्हणतात.

खूप मानसिक ताण, शारीरिक कष्ट आणि पचायला जड आणि तिखट मसालेदार पदार्थ खाल्ल्यावर त्रास वाढतो. जेवणानंतर पोटात दुखते, विशेषतः रात्री जास्त दुखते. या आजाराची प्रमुख कारणे हरी', वरी' आणि करी.' हरी' म्हणजे गडबड, धांदल, वरी' म्हणजे सतत काळजी, चिंता आणि करी' म्हणजे तिखट, मसालेदार पदार्थांचे अतिप्रमाणात सेवन करणे.

याची प्रमुख लक्षणे म्हणजे पोट रिकामे असताना वेदना वाढतात. पोटाच्या मध्यावर बेंबीच्या वर तीव्र वेदना होतात. जेवणानंतर तीन-चार तासांनी वेदना सुरू होतात व त्या वेळी रुग्णास भूक लागते त्यालाच हंगर पेन्स' म्हणतात. रुग्णास उलटी होते.

अल्सरेटिव्ह कोलायटिस या आजारात गुद्वाराचा दाह होतो. यालाच इन्फ्लेमेटरी बोवेल डिसीज म्हणतात. यात रुग्णास पातळ चिकट व रक्तमिश्रित शौचास होते. २० ते ४० वर्षे वयोगटातील लोकांमध्ये या आजाराचा प्रादुर्भाव आढळतो.

याची प्रमुख लक्षणे म्हणजे अशक्तपणा, अंगात बारीक मुरणारा ताप, वजन कमी होते, शौचाला थोडी-थोडी पण पातळ होते, पोटात कळ येऊन लालभडक रंगाचे रक्त शौचातून जाते. जुनाट रुग्णास असे खूप दिवस होत असते.

अश्या व्यक्तींनी लक्षात ठेवण्याच्या गोष्टी

मद्ययुक्त पेये, कॉफी, चहा, सिगारेट, मसालेदार पदार्थ, मिरची, तेलकट पदार्थ वर्ज्य करावेत.

जठरव्रणासाठी दूध हा एक चांगला उपाय आहे. तापवून थंड केलेले दूध थोडे-थोडे प्यायल्यास आराम वाटतो. जेवणाच्या व झोपेच्या वेळा व्यवस्थित पाळाव्यात. शारीरिक व मानसिक संपूर्ण विश्रांती घ्यावी. सात्विक आहार घ्यावा. आहार, विहार, पथ्य पाळल्यास रोगमुक्त होण्यास मदत होते. राग, चिंता, भीती यामुळे जठरव्रण वाढू शकतो. त्यामुळे मन शांत ठेवावे. वरील सर्व आजारांवर काही ठिकाणी शस्त्रक्रियेशिवाय पर्याय नाही.

(पान २ वरुन) उल्लेख करतात राजगुरूंना फाशीची शिक्षा झाल्यास त्यांची आई आणि मावशी यांची झालेली अखेरची भेट त्यांच्यातील संवाद स्वातंत्र्याचा नाजूक रोपटं ज्या अन्नावर जगत ते अन्न म्हणजे हुतात्माचा रक्तहोय. अस म्हणत फासावर गेलेले भगतसिंग राजगुरू आणि सुखदेव इंग्रजा विरोधात गोळीबारात स्वतःला संपवणारे चंद्रशेखर आझाद यांच्यासह क्रांतिकारकांनी इन्कलाब जिंदाबाद मानत एका क्रांती पर्वाला आणण्याचा प्रयत्न केला याचे संपूर्ण वर्णन शिवाजी का बच्चा या अकराव्या क्रांतिकारक कथेमध्ये लेखकाने केलेले आहे.

बाराव्या कथेत अखेरची गर्जना यामध्ये भगतसिंग राजगुरू सुखदेव भारत मातेच्या चरणी स्वतःला समर्पित करतात म्हणजे त्यांना फाशी होते या संपूर्ण घटनेचे वर्णन लेखकाने केलेले आहे. कथा क्रमांक १३ मध्ये वैकुंठनाथ शुक्ल यांनी हिंदुस्तान सोसॅलिस्ट रिपब्लिकन आर्मीचे कार्यकर्ते यांच्या संघटनेत असताना असलेले कार्य व संघटनेपासून बाहेर जाताना केलेले कार्य फितुरी याचे वर्णन व वैकुंठणाथ शुक्ल यांनी बेतीया गावी जाऊन फनींद्र घोष यांच्यावर केलेला चाकू हल्ला या प्रसंगाचे वर्णन आहे. देशभक्त जेठमल सारस्वत एक अपरिचित इतिहास वास्तविकता आणि विपर्यास या चौदाव्या ऐतिहासिक कथेत जेठमल सारस्वत यांचा परिचय त्यांनी दिलेले योगदान सेशन कोर्टात २१ फेब्रुवारी १९३० रोजी होणाऱ्या साक्षीच्या वेळी भगवानदास माहौर व सदाशिव मलकापूरकर यांना बंदूक कशी देता येईल यासाठी शंकररावजी मलकापूर यांच्या माध्यमातून त्यांच्याशी झालेला संपर्क क्रांतिकारी संघटनेला त्यांनी केलेले सहकार्य त्यांचे सर्व दहा सहकारी यांच्या संबंधी वर्णन केलेले आहे. हे सर्व वर्णन लेखकाने पुरुषोत्तम सारस्वत हे जेठामल सारस्वतांचे नातू यांच्याकडे असलेल्या कागदपत्रांच्या पुराव्यानुसारच मांडणी करतात हे प्रामुख्याने कथेत जाणवते.

स्वातंत्र्याकडे वाटचाल आणि जेठमलजी या पंधराव्या कथेत जळगावच्या क्रांतिकारकांचा सहभाग नोंदवलेला आहे. त्यामध्ये भैय्यासाहेब म्हणजे देवकीनंदन सारस्वत यांच्या मार्गदर्शनानेच जेठमलजींचे स्वातंत्र्यलढ्यात राष्ट्रीय कार्यात प्रवेश झाला. त्यांच्याबरोबर विधायक कार्याला खादी विक्रेत्यांचे कार्य. देवकीनंदन यांच्या

## देशभक्त जेठमल सारस्वत जळगावच्या मातीतील स्वातंत्र्यलढ्याची प्रेरणादायी गाथा

मदतीने जेठमजी करीत होते. सरदार वल्लभाई पटेल यांच्या नेतृत्वात झालेल्या बारडोली सत्याग्रहात जेठमलजींनी भाग घेतला आणि त्यांनी गुजरातचा दौरा करण्याचे भाग्य लाभले जळगाव नगरपालिकेत स्कूल बोर्डावर सुतकताईचे कार्य केले. देवकीनंदनच्या प्रयत्नाने महात्मा गांधीजी जळगाव येथे तीन वेळा पंडित जवाहर नेहरू डॉ. राजेंद्र प्रसाद , गोविंदपंत, विनोबा भावे खानदेशात आले खानदेशातील विधायक कार्यक्रमात काँग्रेसनिष्ठ वाढवण्यासाठी असलेले व्यक्ती शक्ती म्हणजे देवकीनंदन सारस्वत, अण्णासाहेब साने गुरुजी ,मगनशेठ चोपडेकर शंकरलाल मोतीलाल काबरा राजमल लखीचंद आणि देवकीनंदन यांच्या प्रयत्नामुळेच महाराष्ट्र नेहमी अग्रगण्य राहिला या संबंधित वर्णन आहे

शिवाय भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन फैजपूर येथे भरले त्यासंबंधी दानशूर यांनी केलेले दान आनंदराम, अकबर अली, व्यंकटेश वासुदेव मोडक , जन्म साने गुरुजी , धुळे तुरुंग व स्वातंत्र्यसैनिकांचा सहवास, जेठमलजी हे जळगाव धरणगाव येथे व्यवसाय करू लागले त्या काळात जेठमल स्वातंत्र्यात भूमिगत राहून आपली जबाबदारी पार पडत असत. सुतकताईचे प्रशिक्षण देणे, खादीचा प्रचार करणे हे कार्य त्यांच्या हातून कसे घडले, याचे वर्णन लेखकाने केलेले आहे. स्वातंत्र्याची सोनेरी पहाट हे सोळाव्या क्रमांकाची कथा असून यात लेखकाने भारत स्वातंत्र्यानंतर सारस्वत यांच्या कार्याचा धांडोळा घेतलेला आहे

जळगावच्या स्थानिक इतिहासात असलेल्या घटकांची नोंद घेतलेली आहे १४ ऑगस्ट १९४७ च्या रात्री जळगाव येथील आठवड्या बाजाराच्या प्रमाणात दादासाहेब देवकीनंदन नारायण यांच्या हस्ते रात्री सार्वजनिक जागी राष्ट्रध्वज फडकवण्याचा कार्यक्रम झाला. जे तुम्हाला सारस्व त्यावेळी कुटुंबासह याप्रसंगी उपस्थित होते

भारत स्वातंत्र्यानंतर त्यांनी आपले कर्तव्य अत्यंत चोखपणे बजावले गीताईच्या प्रभावामुळे गोहत्येवर त्यांनी कार्य केले जळगाव मधील गुरुनानक गोशाळेसाठी भारतभर दौरा केला सत्यनिष्ठ त्यांनी जोपासली वेळप्रसंगी स्वतःचा रॉकेल व्यवसायाचा परवानाही स्वतःहून तहसीलदारांकडे दिला. त्यांच्या कार्याची नोंद म्हणून १५ ऑगस्ट १९७२ रोजी तत्कालीन पंतप्रधान माननीय श्रीमती इंदिरा गांधी यांनी जेठमलजींना राष्ट्राच्या वतीने ताम्रपट प्रदान केला त्याचबरोबर महाराष्ट्र शासनाने २३ मे १९७२ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान केले १५ सप्टेंबर १९८८ रोजी आपल्या आठवणीचा स्मृतिगंध मागे ठेवून ते आपल्या अनंताच्या प्रवासात निघून गेले या सर्व घटनेची नोंद लेखकाने शेवटच्या कथेमध्ये घेतलेली आहे एवढेच नव्हे तर जळगाव मधील जेटमल रामलाल अँड सन्स या फॉर्मचे मालक श्री विश्वनाथजी सारस्वत यांनी जळगाव नगरपालिकेच्या सहकार्याने कवी इकबाल यांच्या सारे जहासे अच्छा हिंदुस्तान हमारा या काव्यपंक्तीने कोरलेले भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाचे प्रतीक असलेले अर्थपूर्ण शिल्प तयार केले आजही ते जळगावच्या नवीन पेठ मध्ये सारस्वत चौक म्हणून प्रसिद्ध आहे १९९२ मध्ये तत्कालीन अन्नपुरवठा मंत्री माननीय जवाहरलाल दर्डा यांच्या हस्ते त्याचे उद्घाटन करून नगरपालिकडे सोपविण्यात आले. स्वातंत्र्य सैनिकांच्या लढ्याचे ते प्रतीक आहे प्रस्तुत लेखकाने या कथेत संपूर्ण घटकांची नोंद घेतली असून त्यांच्या विद्यार्थ्यांच्या काव्यपतीचा पण उल्लेख केलेला आहे.

परिशिष्टामध्ये जळगाव सेशन कोर्टात झालेल्या गोळीबाराच्या खटल्यात जेठमल सारस्वत यांच्यासह १० आरोपी यांचा फोटो प्रकर्षाने दिसतो. सदर लेखक रवींद्र बियाणी यांनी लिहिलेले हे पुस्तक स्थानिक इतिहासात भर घालेल असेच आहे.कोणताही इतिहास स्थानिक इतिहासाच्या पायावरच उभा राहिलेला असतो. स्थानिक इतिहासातूनच आंतरराष्ट्रीय इतिहासाची ओळख होत असते. यामुळे भारतीय स्वातंत्र्यलढ्यात क्रांतिकारकांच्या माध्यमातून देशभक्त जेठमल सारस्वत यांनी दिलेले योगदान स्थानिक इतिहासात महत्वपूर्ण आहे. सदर पुस्तक इतिहास अभ्यासक, संशोधक ,वाचक, प्राध्यापक इतिहास प्रेमी यांना मार्गदर्शन व प्रेरणादाई ठरेल असे म्हणणे वावगे ठरणार नाही




**मेष:** हा सप्ताह तुमच्यासाठी महत्त्वाचं चिंतन आणि मनन करण्याचा आहे. हव्या तशा गतीने गोष्टी पुढे सरकणार नाहीत. एखाद्या गूढ आणि संभ्रम निर्माण करण्याऱ्या प्रसंगाला सामोरे जाऊ शकता. पण हे तुमच्या चांगल्यासाठीच असणार आहे. नेहमी वेग हाच पुढे वाढण्याचा प्रमाण नसतो, हे लक्षात ठेवा! या आठवड्यात तुम्हाला आत्मचिंतन करण्याची गरज आहे. कोणत्याही प्रसंगी इतरांकडे धाव घेण्यापेक्षा स्वतः अंतर्मुख होऊन उत्तर शोधण्याचा प्रयत्न करा. संथपणे आणि शांतपणे काम करा. विवेक आणि संयम ठेवा.

**वृषभ:** हा सप्ताह तुमच्यासाठी तडजोडी करण्याचा आहे. अपेक्षित यश मिळवणे कठीण आहे. बरेच कष्ट करावे लागतील. कसलीतरी कमतरता जाणवेल. लोकांवर अवलंबून राहावं लागेल. इतरांकडून हीन वागणूक मिळू शकते. पण या सगळ्यातूनच आजची रात्र ही उद्याच्या पहाटेची चाहूल घेऊन येते याचा अनुभव तुम्हाला येईल. या आठवड्यात तुम्ही स्वतः संयम ठेवण्याची गरज आहे. गरजा कमी करा. सध्या मोठी गुंतवणूक किंवा महत्त्वाचे व्यवहार टाळा. परोपकार करण्याचा प्रयत्न करा. गरिबांना मदत करा. आरोग्य सांभाळा!

**मिथुन:** हा सप्ताह तुमच्यासाठी वेगवान असणार आहे. अडकलेली कामे पुढच्या टप्प्यापर्यंत पोचू शकतात. ध्येयाकडे चांगली वाटचाल होईल. सतत होत असलेल्या घडामोडींमुळे अस्थिर आणि अस्वस्थ वाटू शकतं. सडेतोड बोलणाऱ्या व्यक्तींशी सामना होईल. मतभेद होऊ शकतात. या आठवड्यात तुम्ही धडाडीने आणि विश्वासाने पुढे चालण्याची गरज आहे. तुमचे विचार स्पष्टपणे मांडा, रोखठोक वागा. बुद्धीचातुर्य वापरा. कोणत्याही बाबतीत वेळ गाठा, विलंब नको. प्रवासात वेगावर आणि वाहनावर चांगले नियंत्रण ठेवा, घाईगडबड नको!

**कर्क:** हा सप्ताह तुमच्यासाठी एक अवघड वळण घेऊन येत आहे. एखादे ध्येय हुकले जाऊ शकते. तुम्ही करत असलेले कष्ट या काळात कमी प्रमाणात फलित होतील म्हणून जास्त अपेक्षा न ठेवलेल्या चांगल्या. वास्तविक परिस्थिती पेक्षा तुमची मानसिक स्थिती कशी आहे यावर तुमचा हा काळ अवलंबून राहील. या आठवड्यात तुम्ही तुमच्या मनाला येईल तसे वागायला जाऊ नका कारण त्यात तुमची चुकण्याची शक्यता जास्त आहे. कोणत्याही प्रसंगात कोणाचा तरी आधार घेऊन, सल्ला घेऊन पुढे चाला. तुमच्याकडे जे नाही त्यापेक्षा जे आहे त्याबद्दल सकारात्मक विचार करा!

**सिंह:** हा सप्ताह तुमच्यासाठी नवीन उमेद




घेऊन येत आहे. मागचं विसरून नवीन सुरुवात करण्यासाठी तयार रहा. एक प्रसन्न आणि उत्साहवर्धक घटना घडू शकते. चांगला सकारात्मक बदल घडू शकतो. तुमचा आत्मविश्वास वाढेल. नवीन संकल्पना सुचतील. नवीन बदल घडतील. या आठवड्यात तुमच्या मनात सुरू असलेले विचार आणि कल्पना लोकांपर्यंत पोचवा. सृजनशीलता बाळगा, वेगळ्या पद्धतीने काम करा. बदल घडत असतील तर ते स्वीकारा. आळस सोडलात तर उन्नती होईलच. केल्यानेच होत आहे आधी केलेची पाहिजे! हे लक्षात ठेवा!

**कन्या:** हा सप्ताह तुमच्यासाठी उत्साहाचा आणि आनंदाचा आहे. काहीतरी नवीन शिकायला मिळेल. अडकलेल्या गोष्टी काही प्रमाणात पुढे सरकतील. दुरावलेली नाती जवळ येतील. एखादी आनंदाची बातमी येऊ शकते. तुम्हाला समाधान लाभेल. लहान मुलांमध्ये मन रमेल. या आठवड्यात तुम्हाला मुंगी होऊन साखर खाण्याची गरज आहे. सगळ्यांना मदत करा, दुसऱ्याचे एखादे काम स्वतःहून करा! मुंगी होऊन साखर खा. चित्ते प्रसन्ने भुवनं प्रसन्नं या प्रमाणे मन आनंदी ठेवलंत तर घर आनंदी राहील हे लक्षात ठेवून वागा.

**तूळ:** हा सप्ताह तुमच्यासाठी निवांत वेळ घेऊन येत आहे. तुमच्या आवडीचं काहीतरी करु शकाल. एखादा आनंदाचा कार्यक्रम होईल. मागे केलेल्या कष्टाचे फळ काही प्रमाणात मिळेल. लहानसा उत्सव साजरा कराल. समारंभामध्ये सहभागी व्हाल किंवा तुम्ही स्वतः तुमच्या आवडीच्या लोकांशी भेटी होतील. एकमेकांना सहाय्य कराल. तब्येत सुधारेल. या आठवडयात तुम्ही एकटे राहू नका, लोकांना भेटायला जा. मन मोकळे हसा आणि मन मोकळे बोला. लोकांचे मत जाणून घ्या, त्यांना बोलतं करा. तुमच्या जवळच्या माणसांशी आवर्जून संवाद साधा. स्वार्थबुद्धी सोडा.

**वृश्चिक:** हा सप्ताह तुमच्यासाठी कष्ट करण्याचा आहे. कुठलीतरी आवडीची घटना घडायला किंवा केलेल्या प्रयत्नांना यश मिळायला वेळ लागेल. वाट पहावी लागेल. संयम आणि धैर्याचा कस लागेल. काहीतरी कमतरता जाणवेल. थांबून रहावं लागेल, इतरांवर अवलंबून राहावं लागेल. या आठवड्यात तुम्ही शांतपणे परिस्थितीचा सामना करण्याची गरज आहे. तडकाफडकी कोणतेही निर्णय घेऊ नका. खूप कष्ट करा. फळ मिळेल हे निश्चित पण विलंब होईल. आर्थिक गुंतवणूक खात्रीशीर ठिकाणी करू शकता. प्रयत्नांती परमेश्वर हे लक्षात ठेवा!

**धनू:** हा सप्ताह तुमच्यासाठी परीक्षेचा असणार आहे. तुमचा संयम, तुमचा सात्विक भाव आणि तुमची सचोटी या गोष्टींना धक्का लागण्याचे प्रसंग येऊ शकतात. कामे रखडली जातील. काही प्रमाणात हतबल झाल्यासारखं वाटू शकतं. या आठवड्यात तुम्ही स्वतःला कणखर बनवण्याची गरज आहे. कुठल्याही आमिषाला भुलू नका. लाचारी पत्करू नका. सात्विक मनाला योग्य वाटत नसेल ते काम अजिबात करू नका. कोणतेही नियम मोडू नका. जोखीम उचलू नका. व्यसनात गुंतू नका. अती तिथे माती हे लक्षात ठेवा! आत्मसंयम ठेवा!

**मकर :** हा सप्ताह तुमच्यासाठी भावभावनांचं प्राधान्य घेऊन येत आहे. तुम्ही आनंदी राहणार आहात. तुम्हाला तुमच्या मनाचा कौल घेऊन, बुध्दी आणि इतर व्यवहारिक गोष्टींपेक्षा मन काय सांगत आहे त्याप्रमाणे वागून चांगला अनुभव येईल. कठीण परिस्थितीसुद्धा सकारात्मकतेने हाताळू शकाल. कला क्षेत्रात चांगली प्रगती होईल. या आठवड्यात तुम्ही भावनांमध्ये वाहवत जात नाही आहात ना, याकडे लक्ष देण्याची गरज आहे. कोणामध्येही भावनिक दृष्ट्या अडकू नका. तुम्हाला आवडणारा एखादा छंद किंवा एखादी कला आत्मसात करा, त्यात वेळ घालवा.

**कुंभ:** हा सप्ताह तुमच्यासाठी भावभावनांचं प्राधान्य घेऊन येत आहे. तुम्ही आनंदी राहणार आहात. तुम्हाला तुमच्या मनाचा कौल घेऊन, बुध्दी आणि इतर व्यवहारिक गोष्टींपेक्षा मन काय सांगत आहे त्याप्रमाणे वागून चांगला अनुभव येईल. कठीण परिस्थितीसुद्धा सकारात्मकतेने हाताळू शकाल. कला क्षेत्रात चांगली प्रगती होईल. या आठवड्यात तुम्ही भावनांमध्ये वाहवत जात नाही आहात ना, याकडे लक्ष देण्याची गरज आहे. कोणामध्येही भावनिक दृष्ट्या अडकू नका. तुम्हाला आवडणारा एखादा छंद किंवा एखादी कला आत्मसात करा, त्यात वेळ घालवा.

**मीन:** हा सप्ताह तुमच्यासाठी महत्त्वाच्या वळणाचा आहे. एक प्रकारे विरक्ती आणणारा हा काळ असू शकतो. कष्टाचे हवे तसे फळ मिळणार नाही. विलंब होईल. पण यामुळेच तुम्ही अंतर्मुख व्हाल आणि नवीन मार्ग सापडेल! परिस्थितीचा स्वीकार करुन आनंदाने मार्गक्रमण कराल. निरस व्हाल पण निराश नाही! स्वार्थ सोडून परमार्थाचा विचार येईल. या आठवड्यात तुम्ही विवेकबुद्धी आणि धीराने वागा. आत्मोन्नतीचा मार्ग शोधा. इतरांकडून फार अपेक्षा ठेवू नका, त्या पूर्ण होणार नाहीत. भौतिक पसाऱ्यातून स्वतःला थोडे अलिप्त करून बघा. एकांतात वेळ घालवा.

# मोराणेत महिलेचा संशयास्पद मृत्यू

धुळे, दि.२६- मोराणे (ता. धुळे) गावातील महिलेचा संशयास्पदरीत्या मृत्यूची घटना घडली. गळ्यावर खुणा असल्याने गळफासने मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

वैशाली गोपाल भामरे (वय २८ रा.न्यु बालाजी नगर सर्किट हाऊस जवळ मोराणे) असे तिचे नाव आहे. २४ सप्टेंबरला रात्री पोलिसांना माहिती मिळाली. धुळे तालुका पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. तेथील एका पत्र्याच्या घरात वैशाली भामरे पडलेली होती. पती गोपाल भामरे दारूच्या नशेत तेथेच होता. पोलिसांनी वैशाली भामरे हिला श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल केले. तेथे डॉक्टरांनी वैशाली भामरे हिला मृत घोषित केले. तालुका पोलीस ठाण्याचे निरीक्षक धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली. दरम्यान, गळफासने वैशालीचा मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. गळफास नेमका कसा लागला, याची माहिती चौकशीअंती निष्पन्न होईल.

## बाल साहित्य संमेलन

धुळे, दि.२८ सप्टेंबर २०२६ महाराष्ट्र शासन मराठी भाषा विभागाच्या सहकार्याने का. स. वाणी स्मृती प्रतिष्ठान संचलित रेऊ वाणी विज्ञान विहार यांच्या संयुक्त विद्यमाने धुळे येथे जिल्हास्तरीय बालसाहित्य संमेलनाचे आयोजन दि.२८ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता हिरे भवन, धुळे येथे होणार आहे.

या संमेलनाचे उद्घाटन मा. डॉ. किरण कुलकर्णी, सचिव, मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी कुलगुरु डॉ. के. बी. पाटील, का.स.वाणी स्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. शशिकांत धामणे, सचिव डॉ. शोभा शिंदे उपस्थित राहणार आहेत. तसेच मा.डॉ. किरण कुलकर्णी, कृष्ण आकाश चळवळ प्रणेत्या श्वेता कुलकर्णी, शाश्वत जीवनशैली अभ्यासक राजश्री कुलकर्णी यांची प्रकट मुलाखत घेण्यात येणार आहे.

# सैनिकी विद्यालयाचे बुध्दीबळ स्पर्धेत यश

धुळे, दि.२६ (प्रतिनिधी)- **धुळे जिल्हा क्रीडा संकुल येथे झालेल्या धुळे तालुकास्तरीय शालेय बुद्धीबळ स्पर्धेत, मोराणे सैनिकी विद्यालयाने घवघवीत यश मिळविले. इंदुबाई भदाणे प्रतिष्ठान संचलीत श्री.छत्रपती सैनिकी विद्यालयातील तब्बल १० विद्यार्थ्यांनी तालुकास्तरावर यश मिळवित जिल्हास्तरावर मजल मारली.**

जिल्हास्तरीय बुध्दीबळ स्पर्धेसाठी पात्र ठरलेले विद्यार्थी वयोगटानुसार पुढीलप्रमाणे. १९ वर्षाखालील मुलांमध्ये विजय भोये व प्रतिक शेमले यांनी तर १९ वर्षाखालील मुलींमध्ये अर्पणा साबळे, सीमा कामडे, तनिषा पाडवी व रिंकू पवार यांनी तालुकास्तरावर यश मिळविले. तर १४ वर्षाखालील मुलांमध्ये कृष्णा पाटील यांनी यश मिळविले. तर १४ वर्षाखालील मुलींमध्ये सृष्टी बागुल, १७ वर्षाखालील मुलींमध्ये प्रिती पवार, १९ वर्षाखालील मुलांमध्ये सागर ठाकरे यांचीही जिल्हास्तरीय बुध्दीबळ स्पर्धेसाठी राखीव खेळाडू म्हणून निवड झाली आहे. तालुकास्तरीय बुध्दीबळ स्पर्धेत यश मिळवित, जिल्हास्तरावर मजल मारलेल्या सर्व यशस्वी खेळाडूंना बुद्धीबळाचे नॅशनल ऑबिटर प्रा.प्रमोद एम. साळुंके यांचे मार्गदर्शन लाभले.

सर्व विजयी खेळाडूंचे संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब रावण भदाणे, सचिव शालिनीताई बाळासाहेब भदाणे, प्राचार्य एस.बी. गरुड, उपप्राचार्य एन.जे. देवरे, पर्यवेक्षक बी.एच. मगर तसेच क्रीडा प्रमुख एस.एस. देवरे,क्रीडाशिक्षक बी.एम. बाविस्कर, प्रशिक्षक शुभम धामोडे, रोहित अहिरे , प्रशांत वाडीले व सर्व शिक्षक- शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

**आपला महाराष्ट्र**
**वाचकांना विनम्र सुचना**
आपला महाराष्ट्र वृत्त पत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहीरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबधी आर्थिक व्यवहार करावा जाहीरातीतील आपल्या उत्पन्नाच्या संदर्भात अथवा सेवेच्या संदर्भात जाहीरातदार जे दावे करतात त्याची आपला महाराष्ट्र वृत्तपत्र समुह कोणतीही हमी घेत नाहीत जाहीरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहीरातदारांकडून न झाल्यास होणाऱ्या परिणामास आपला महाराष्ट्र वृत्तपत्र समुहाचे मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक जबाबदार रहाणार नाहीत कृपया वाचकांनी यांची नोंद घ्यावी.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, संबंधितांना, वित्तीय संस्था, बँका, पतसंस्थांना आणि सावकारांना सदर जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे मोहाडी प्र. ल. येथील महानगरपालिका हद्दीतील.

**७/१२ उताराप्रमाणे : ग. नं. ७२ पैकी प्लॉट नं. ७२ चे एकूण क्षेत्र ७५.०० चौ. मी. बखळ प्लॉट हे इकबाल अहमद अब्दुल अजीज रा. गफूर नगर, धुळे, यांच्या मालकीची व प्रत्यक्ष ताबा उपभोगातील असून चतु:सिमा व मापे मंजूर नकाशाप्रमाणे**

मिळकतीचे मालक यांनी वर नमूद मिळकत कायमस्वरुपी विक्रीचा आमचे अशिलांन सोबत सौदा केलेला असून बयाणापोटी रक्कम स्विकारलेली आहे. आमचे अशिल हे सदरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहे.

सबब वर नमूद मिळकतीबाबत इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, हितसंबंध, टाच, बोजा, वारसा हक्क, हस्तांतरण व्यवहार, खरेदी, सौदा पावती, कोर्ट कचेरी, बक्षीसपत्र, गहाण, मृत्यूपत्र, मुखत्यारपत्र, सरकारी अगर निमसरकारी आरक्षण वगैरे व्यवहार असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत खालील पत्त्यावर कायदेशीर कागदपत्रांसह लेखी हरकत कळवावी.

येणे प्रमाणे सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत निर्बोज म्हणून खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत सदर मिळकतीवर व आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. कळावे.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या अधिकारावरुन, माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे, दि. २६/०९/२०२६.

**ॲड.दानिश अहमद अ. रउफ (शेख)**
पहिला मजला, अन्सारी मस्जिद समोर, ८० फुटी रोड, तिरंगा चौक, धुळे मो.९८८१९२९४२४
नोटीस देणार तर्फे ॲडव्होकेट)

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वलवाडी, ता. जि. धुळे येथिल स. नं. १४/१/२ पैकी प्लॉट नं. ५९ चे क्षेत्र २४३.७५ चौ. मी यांसी चर्तु:सीमा पुर्वेस : रस्ता, पश्चिमेस : ओपन स्पेस, दक्षिणेस : प्लॉट नं. ६०, उत्तरेस : रस्ता. येणे प्रमाणे वर्णनाची बखळ प्लॉट मिळकत **१) शोभा प्रकाश पाटील २) श्री. प्रकाश दगा मोरे ३) श्री. नितीन फुला बाविस्कर,** रा. वलवाडी शिवार, धुळे यांचे मालकीची असुन त्यांनी वर नमुद मिळकत कायमस्वरूपी विकण्याचा सौदा आमचे अशिलांशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण, करार, सौदा, कब्जा, विसार पावती, अन्नवस्त्र, मृत्यूपत्र, बक्षिसपत्र, मुखत्यारपत्र, कब्जापावती, सॉल्वन्सी, आरक्षण, रक्कम देणे/ घेणे इ. असल्यास अथवा सदर मिळकतीचे कोणतेही मूळ दस्त जमा / तारण असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतीसह आमच्या कार्यालयात लेखी हरकत नोंदवावी. तोंडी हरकत किंवा परस्पर वर्तमान पत्रात प्रसिद्ध केलेल्या व मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. मुदतीत व योग्य त्या पुराव्यानिशी प्रत्यक्ष आमच्या कार्यालयात हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आमचेवर बंधनकारक असणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचेमार्फत प्रसिद्धीस दिली असे.धुळे :
दि.: २६/०९/२०२६

**ॲड.विजय म. मोरे**
नोटरी भारत सरकार
रा.बी/१२ भन्साली प्लॉझा, नगरपट्टी, धुळे मो.९८२२८५२६५०

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि, मौजे वलवाडी येथील स. नं. २५/२ यापैकी प्लॉट नं. ९२ चे एकूण क्षेत्र १८७.५० चौ. मी. यात बांधीव मिळकत बखळ जागेसह
यासी चतु:सिमा

| दिशा | चतु:सिमा |
|---|---|
| पुर्वेस- | ९ मीटर रुंदीचा रस्ता |
| पश्चिमेस- | स. नं. २६ |
| दक्षिणेस- | प्लॉट नं. ९१ |
| उत्तरेस- | प्लॉट नं. ९३ |

येणे प्रमाणे वर्णनाची आतील बांधीव मिळकत अंजली संजय साळवे, शिवम संजय साळवे, दिपीका संजय साळवे व शुभम संजय साळवे सर्व रा. सदनिका क्र. ६ जे विंग, ची कॅबिन रोड, मोतीराम पार्क जवळ, राधे गोविंद नगर, अंबरनाथ, ठाणे ४२१५०१ यांचे मालकीची व ताबे उपभोगातील असून त्यांनी सदरहू मिळकत कायमस्वरुपी विकणेचा सौदा आमचे अशिल यांच्याशी केला आहे.

आमचे अशिल यांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीच्या बाबतीत सरकारी, निमसरकारी संस्था, वित्तीय संस्था, बँका, व इतर कोणाचाही खाजगी हक्क, अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लीज, सौदा, करार, मुखत्यार, मृत्यूपत्र, वगैरे कोणत्याही प्रकारचा तबदिलीची व्यवहार असल्यास सदर जमीनीवर कोणत्याही प्रकारे हिस्सा, अधिकार, असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खालील पत्यावर मिळकती संबधीत मुळ कागदोपत्री पुराव्यानिशी व त्याचे झेरॉक्स प्रती जोडुन लेखी स्वरूपात हरकतीसह प्रत्यक्ष भेटुन आपली हरकत नोंदवावी. तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. वरील मुदतीत कोणाची काहीही एक हरकत न असल्यास सदरची मिळकती निर्बोज व निर्वेध समजण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील, त्यानंतर मात्र कोणची हरकत आल्यास ती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या कागदपत्राच्या व माहितीवरून व सांगणेवरून आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे.
ठिकाण:-धुळे दि.२६/०९/२०२६

**ॲड.चेतन महादु यादव**
पत्ता : सि.स.नं.-२५९७/अ, श्रीसदगुरू सदन, गल्ली नं.५, मिरच्या मरुती चौक, धुळे-४२४००१
मो.नं. ९६८९१-२४६९२

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या टायटल जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

**मौजे महिंदळे येथील स. नं. १००/१अ,ब,क पैकी प्लॉट नं. ६६/ब चे एकूण क्षेत्र ११२.५० चौ. मी. बखळ प्लॉट.**

**यासी चतु:सिमा**

| | |
|---|---|
| **पुर्वेस** | **: प्लॉट नं. ६६ अ** |
| **पश्चिमेस** | **: प्लॉट नं. ६७अ** |
| **दक्षिणेस** | **: रस्ता** |
| **उत्तरेस** | **: प्लॉट नं.४६अ** |

येणेप्रमाणे वर्णन असलेली मिळकतीचा आमचे अशिल **यांनी मिळकतीचे मालक सौ. पुजा सागर वेंदे** रा. १७, नवनाथ नगर, सुरत बायपास जवळ, साक्री रोड, धुळे यांचेशी कायम खरेदी करणेचा तोंडी सौदा केलेला आहे. व बयाणा रक्कम दिलेली आहे.

सबब तमाम लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत कोणाचेही कोणत्याही स्वरुपाचे जसे सौदा, करार, बक्षीस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्यूपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, खरेदी - विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे अथवा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील नमूद पत्त्यावर पुराव्यानिशी लेखी हरकती नोंदवाव्यात. टपाल व फोनवर तसेच परस्पर वर्तमानपत्रात दिलेल्या हरकती मान्य होणार नाही. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही, तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरून त्यांचे वतीने आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.
धुळे दि. २६/०९/२०२६

**ॲड.रोहित राजकुमार छाबिडया**
ब्लॉक नं. आर/२, रूम नं. १, कुमारनगर, साक्री रोड, धुळे
मो. ९९२२८२८८८३/७४९९९९८९५५

## NAME CHANGE

MY OLD NAME WAS
**SALIMA BI BINTE SHAIKH MANWAR**
MY NEW NAME IS
**SALIMA BASHIR PINJARI**
AS PER MY DOCUMENTS
**ADD- WADIBHOKAR ROAD LANE NO.2, BHANDPURA DEOPUR, DHULE MAHARASHTRA 424002**

## NAME CHANGE

I HAVE CHANGE MY NAME FROM
**JUNAID AHMAD EJAZ AHMAD QURESHI**
TO NEW NAME
**QURESHI JUNAID EJAZ**
AS PER MY DOCUMENTS
**ADD- VADJAI ROAD NEAR AKBAR GARDAN MILLAT NAGAR, DHULE.**

## NAME CHANGE

MY PREVIOUS NAME WAS
**SHAKEEL AHMAD MOHAMMAD AYYUB**
AND MY NEW NAME IS
**SHAKEEL AHMAD MOHAMMAD AYYUB ANSARI**
**ADD- 103 MUNSHI MASJID MUSLIM NAGAR, DHULE-424001.**

## NAME CHANGE

MY OLD NAME WAS
**RUBEENA BANO SHAIKH ASADULLAH**
MY NEW & CORRECT NAME IS
**RUBEENA BANO MAHMOOD AHMAD ANSARI**
**ADD- 4314, A LANE NO.4 NEAR NOORONI MASJID, DEOPUR, DHULE-424002.**

## जाहीर हरकत नोटीस

तमाम जनतेस, तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था व सर्व संबंधिताना, या जाहिर हरकत नोटीसीने आमचे पक्षकार जाकीर नियमत हुसैन शेख उव ५० धंदा :- मजुरी रा.८० फुटी रोड, प्रिन्स कॉम्प्लेक्स धुळे ता जि धुळे पिंन ४२४००१ यांचे मार्फत कळवण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन** :- मौजे धुळे ता.जि.धुळे महानगर पालिका हद्दीतील, ८० फुटी रोडवरील सर्व्हे नं ३७२ त्यासी प्लॉट नं ८१ पैकी प्लॉट नं २, चे एकूण क्षेत्र ४८५.१३ चौ.मी. यासी चतु:सिमा खालील प्रमाणे

| | |
|---|---|
| पुर्वेस :- | प्लॉट नं ३ (डॉ कबरी यांचा दवाखाना), |
| पश्चिमेस :- | प्लॉट नं १, (डॉ जीमल अन्सारी यांचा दवाखाना), |
| दक्षिणेस :- | प्लॉट नं ११, (सिमा नर्सिंग होम), |
| उत्तरेस :- | हमरस्ता, (८० फुटी रोड) |

आर सी सी बांधीव मिळकत असुन तळ मजल्यावर सात दुकाने, तर पहिल्यामजल्यावर नऊ रुम व बाथरूम तर दुसऱ्या मजल्यावर हॉल व बाथरूम व वाशरूम असे आहे.

येणे प्रमाणे वर नमूद मिळकतीचे बाबत विशेष दिवाणी दावा क्र ८०/२०१६ हा प्रलंबित असतांना, सदर दाव्यात वादीच्या लाभात अर्थात प्रतिवादींच्या विरुध्द मनाई हुकुम पारीत असतांना, १) सद्दाम नियामत हुसैन शेख २) नुरजहाँ नियामत हुसैन शेख ३) नजमा शहाजहा नियामत हुसैन शेख ४) शहाजहाँ बी नियामत हुसैन शेख ५) दिलशाद बी नियामत हुसैन शेख यांनी सदर मिळकत ही बख्खळ मिळकत आहे असे खोटे नमुद करून सब रजि सो यांची फसवुणक करून रियाजुद्दीन मजहरूदद्दीन जिलानीय अबरार अहेमद सय्यद रिजजुददीन जिलानी, अन्सारी ईमान अहमद इस्रेखार अहमद आणि जावीद अन्सारी मोहंमद शाबान यांना याची सर्व माहिती असतांना देखील अर्थात प्रत्यक्षात मिळकत ही पाहिली व अवलोकन केलेली असतांना देखील सदर मिळकत बख्खळ म्हणुन दि.१५/१०/२०१९ रोजी खरेदीखत दस्त क्र ४५७/२०१९ अन्वये केवळ रक्कम रू.१९,५५,०००/- मात्रच्या मोबदल्यात विक्री दाखवुन आमचे पक्षकार व त्यांचे हल्ली मयत भाउ नामे सादीक नियमत हुसैन शेख यांची व शासनाची फसवणुक केलेली हाती आहे.

सदर मिळकत विकत घेण्याचा अग्रगण्य अधिकार हा आमचे पक्षकार यांचा होता व आहे. तसेच सदर मिळकतीची कोणत्याही प्रकारे वाटणी झालेली नसतांना देखील अविभक्त अविभाज्य हिस्सा तसेच मिळकतीतील मोबाईल टॉवर चे बाबत काहीएक उल्लेख नमुद न करता बेकायदा सुरवातीपासुनच चुकीची खरेदीखत नोंदविलेले आहे.

सदर वर नमुद बेकायदेशीर खरेदीखताअन्वये कोणतेही अधिकार हे रियाजुद्दीन मजहरूददीन जिलानीय अबरार अहेमद सय्यद रिजजुददीन जिलानी, अन्सारी ईमान अहमद इस्रेखार अहमद आणि जावीद अन्सारी मोहंमद शाबान यांना प्राप्त झालेले नसतांना पुढे विक्री करण्याचे कामी प्रयत्न हे प्रॉपर्टी एंजट, ब्रोकर करीत आहेत. सदर मिळकत ही आमचे पक्षकार यांच्या अविभक्त अविभाज्य मालकीची व ताबेउपभोगातील होती व आहे. वर नमूद मिळकत वहीवाटिसह असलेल्या हक्कासह व त्यातील अंगभूत व तदंगभूत आमचे अशिल यांच्याशी कायमस्वरूपी मालकी हक्क होता व आहे.

तरी सदर वर नमूद प्लॉट मिळकतीत कोणाचाही कोणत्याही प्रकारची मालकी हक्क, हिस्सा, हितसंबंध, गहाण, बोजा, टाच, जप्ती, भाडेपटटा, हक्क निर्माण करू नये केल्यास किंवा संकल्पीत व्यवहार केल्यास सदरचा व्यवहार हा बेकायदेशीर व आमचे पक्षकार यांचेवर बंधनकारक राहणार नाही.

तसेच परस्पर दैनिकात हरकतीचे उत्तर आल्यास त्याची प्रत रजि पोस्टाने पुराव्याच्या कागदपत्रासह प्राप्त न झाल्यास हरकतीचे उत्तर ग्राहय धरल्या जाणार नाहीत.

येणे प्रमाणे जाहीर हरकत नोटीस आमचे अशिलाने दिलेल्या माहितीवरून व सांगितले वरून त्यांचे तर्फे आमचे मार्फत दिली असे

धुळे, ता.२६/०९/२०२६.

**ॲड.सर्वोत्तम एस.कुलकर्णी**
१८, दिघे ॲडव्होकेट चेंबर्स कोर्टासमोर, धुळे-१ (महा.).
**मो.नं.९३२५१८२६५३**

## टायटल व्हेरिफिकेशन नोटीस

तमाम लोकांना तसेच बँका, पतसंस्था इतर वित्तीय संस्था, शासकीय, निमशासकीय संस्था व सावकार यांना या टायटल व्हेरिफिकेशन नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :** मौजे धुळे म. न. पा. हद्दीतील देवपूर शिवारातील स. नं. ८७ अंतर्गत रस्त्यावरील बखळ प्लॉट नं. ४४ व ४७ चे एकूण क्षेत्र ४६४.५१ चौ. मी. बखळ प्लॉट यास नगर भूमापन क्र. ६५५६ (देवपूर भाग) असा नंबर लागलेला असून क्षेत्रफळ १९५.२० चौ. मी. हे सध्य स्थितीत आहे.

यासी चतु:सिमा

| | | | |
|---|---|---|---|
| पुर्वेस : | प्लॉट नं. ४६ | पश्चिमेस : | प्लॉट नं. ४८ |
| दक्षिणेस : | ३० फुटी रस्ता | उत्तरेस : | प्लॉट नं. ४४ |

या प्रमाणे वर्णन असलेली सदरची मिळकत ही **सौ. शितल शांतीलाल चौधरी** रा. प्लॉट नं. १६, नंदनवन बँक कॉलनी, देवपूर, धुळे ह्यांनी खरेदीखताद्वारे विकत घेतलेली आहे. १९५.२० चौ. मी. क्षेत्रफळ हे आमचे पक्षकार श्री. मनोज बाळाभाऊ जोशी रा. राम गल्ली, हिंगोली जि. हिंगोली ४३१५१३ हे संपूर्ण क्षेत्र खरेदी खताद्वारे विकत घेणार आहेत.

सबब तमाम लोकांना या टायटल व्हेरिफिकेशन नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत कोणाचेही कोणाचेही कोणत्याही स्वरुपाचे जसे सौदा, करार, बक्षिस, अदलाबदल, गहाण, लीज, लीन, लिव्ह, ॲण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्यूपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, खरेदी विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे अथवा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क, व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील नमूद पत्त्यावर पुराव्यानिशी व कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवाव्यात. ७ दिवसानंतर आलेल्या हरकती लेखी पुराव्या शिवाय घेतलेल्या हरकती ग्राह्य धरण्यात येणार नाहीत. तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिद्ध हरकत घेतलेल्या असल्यास देखील त्या विचारात घेतल्या जाणार नाहीत. याची नोंद घ्यावी. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे पक्षकार खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही असे समजण्यात येईल. तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे. सदरची टायटल व्हेरिफिकेशन नोटीस आमचे पक्षकार यांनी दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. स्थळ : धुळे : दि. २६/०९/२०२६

**ॲड.अमित म. दुसाने**
२२, गोविंदस्मृती, विद्यानगर, स्वामीनारायण मंदिर रोड, देवपूर, धुळे
मो. ८२७५००७३९०/९४२१५३०७०७

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस सर्व वित्तीय संस्था, बॅका, पतसंस्था यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की.

**मिळकतीचे वर्णन - मौजे मोहाडी प्र. लळींग शिवारातील धुळे म.न.पा. हदीतील स. नं.६९ पैकी १ पैकी प्लॉट नं. १९ चे एकूण क्षेत्र २६७ चौ.मी. असा बखळ प्लॉट तुम्हांस कायम खरेदी देण्याचा सौदा केला तो आमचे मालकीचे प्लॉटची चतु:सिमा मजुर नकाशा प्रमाणे**

वर नमूद वर्णन केलेला बखळ प्लॉट/मिळकत ही **१) राहील हारून पटेल २) अवैस हारून पटेल दोन्ही रा. धुळे** यांचे मालकीचे व प्रत्यक्ष कबजे ताबे उपभोगातील आहे. सदरचे प्लॉट/मिळकत आमचे अशिल **जुबैर अहमद मुख्तार अहमद शेख रा.धुळे** यांनी कायम खरेदी करण्याबाबत सौदा केला आहे सबब आमचे अशिल वरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत.

वर नमूद बखळ प्लॉट/मिळकतीवर नमूद केलेल्या मालका व्यतिरिक्त इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, तारण, टाच, बोजा, खरेदी विक्री, करार, हस्तांरतण हिस्सा, व्यवहार, अधिकार अगर हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्धद झालेपासून ३ दिवसांचे आंत आमचे खालील पत्त्यावर लेखी व मुळ कागदपत्रांसह हरकत नोंदवावी परस्पर वर्तमानपत्रात जाहीर केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

वरील कालावधीत कुणाचीही कोणतीही हरकत न आल्यांस वरील मिळकती ही निर्बोज व निर्वेध आहे असे गृहित धरून आमचे अशिल वर नमूद मिळकतीचा अंतिम व्यवहार पूर्ण करतील. आणि त्यानंतर कोणतीही तक्रार आमचे अशिलावर व सदर मिळकतीवर बंधनकारक असणार नाही यांची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहिती व सांगणेवरून आमचे मार्फत दिली असे. धुळे दि. २६/०९/२०२६

**ॲड.लखमीचंद अ. गुजर**
ॲडव्होकेट नोटरी
ग. नं. २, घर नं. ३३२६, मुल्लावाडा, धुळे मो. ९४२३४९३०८९

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, संबंधितांना, वित्तीय संस्था, बँका, पतसंस्थांना आणि सावकारांना सदर जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे धुळे येथील महानगरपालिका हद्दीतील.

**७/१२ उताराप्रमाणे : स. नं. ४२२/५ पैकी प्लॉट नं. १२ चे एकूण क्षेत्र ७५.००० चौ. मी. बखळ प्लॉट**

**सि. स. उताराप्रमाणे : सि. स. नं. १४५५३ चे एकूण क्षेत्र १०६०३.०० चौ. मी. या पैकी प्लॉट नं. १२ चे एकूण क्षेत्र ७५.०० चौ. मी. बखळ प्लॉट हे १) सुशमाराणी हसन पटेल २) मभाबाई हसन पटेल, ३) हबीब राजू पटेल अ. क्र. १ ते ३ रा. गरीब नवाज नगर, धुळे यांच्या मालकीची व प्रत्यक्ष ताबा उपभोगातील असून चतु:सिमा व मापे मंजूर नकाशाप्रमाणे**

मिळकतीचे मालक यांनी वर नमूद मिळकत कायमस्वरुपी विक्रीचा आमचे अशिलांन सोबत सौदा केलेला असून बयाणापोटी रक्कम स्विकारलेली आहे. आमचे अशिल हे सदरील मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहे.

सबब वर नमूद मिळकतीबाबत इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, हितसंबंध, टाच, बोजा, वारसा हक्क, हस्तांतरण व्यवहार, खरेदी, सौदा पावती, कोर्ट कचेरी, बक्षीसपत्र, गहाण, मृत्यूपत्र, मुखत्यारपत्र, सरकारी अगर निमसरकारी आरक्षण वगैरे व्यवहार असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत खालील पत्त्यावर कायदेशीर कागदपत्रांसह लेखी हरकत कळवावी.

येणे प्रमाणे सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकत निर्बोज म्हणून खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत सदर मिळकतीवर व आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. कळावे.

सदरची जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या अधिकारावरुन, माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

धुळे, दि. २६/०९/२०२६.

**ॲड.दानिश अहमद अ. रउफ (शेख)**
पहिला मजला, अन्सार मस्जिद समोर, ८० फुटी रोड, तिरंगा चौक, धुळे मो.९८८१९२९४२४ (नोटीस देणार तर्फे ॲडव्होकेट)

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतस्था व सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,-

**मिळकतीचे वर्णन** - मौजे-गाव नंदाळे (खु.) शिवार ता.जि. धुळे येथील **शेत गट नं.** ७५ भोगवटदार वर्ग-१ यांसी क्षेत्र ०० हेक्टर ९३ आर, आकार १ रुपया यांसी चतु:सिमा महसूल दप्तरी प्रमाणे वरील मिळकत आमचे अशिलांनी शेतजमीनीचे ७/१२ उतायातील इतर हक्कात विहिरीसाठी क्षेत्र ०० हेक्टर ०१ आर, आकार रूपये-०० पैसे ०१ (फेरफार नोंद नं. ११७५) महसूल रेकॉर्ड नुसार नमूद श्री. प्रविण गोपीनाथ वाडी रा. फ्लॅट न.३०१, संतकृपा संकुल, केशर नगर, देवपूर धुळे ता.जि.धुळे यांचे कडून कायमस्वरूपी विकत घेणेकामी सौदा केला असून, लवकरच सदरची शेतजमीन आमचे अशिल शेतमालक यांचे कडून नोंदणीकृत खरेदीखताने विकत घेणार आहेत.

तरी उपरोक्त मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, गहाण, तारण, टांच, बक्षिस, बोजा, लीज, सौदा, करार, मुखत्यार, तसेच कोणत्याही प्रकारचा व्यवसायापोटी गहाण, तारण चा तबदिलीचा व्यवहार असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसांच्या आत आमचे खालील पत्यावर मिळकती संबंधीत मुळ कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी. तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. वरील मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची लेखी हरकत न आल्यास सदरची मिळकत ही निर्बोज समजण्यात येवून आमचे अशिल वर नमुद मिळककतीचा खरेदीखताचा व्यवहार मिळकतीचे मालकांशी पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास ती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहिती व सांगणेवरून आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. दि.२६/०९/२०२६.

**ॲड.धर्मराज एन. महाजन** मो.९४२३१९११७८
२३ अ, विजय पोलीस कॉलनी, वाडीभोकर रोड, देवपूर, धुळे

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, व सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन : १) मौजे गाव कासविहीर शिवार ता. जि. धुळे येथील शेत गट नं. २७/२/अ भोगवटदार वर्ग -१, यांसी क्षेत्र ०१ हेक्टर ३९ आर. पो. ख. ०० हेक्टर ७६ आर. आकार ५ रुपये ८१ पैसे यांसी चतु:सिमा महसूल दप्तरी प्रमाणे २) मौजे गाव कासविहीर शिवार ता. जि. धुळे येथील शेत गट नं. २७/२/ब भोगवटदार वर्ग-१ यांसी क्षेत्र ०२ हेक्टर ०० आर आकार ९ रुपये यांसी चतु:सिमा महसूल दप्तरी प्रमाणे तसेच ३) मौजे : गाव कासविहीर शिवार ता. जि. धुळे येथील शेत गट नं. २७/१/क भोगवटदार वर्ग-१ यांसी क्षेत्र ०१हेक्टर ०० आर आकार २ रुपये ५० पैसे यांसी चतु:सिमा महसूल दप्तरी प्रमाणे असून, वरील तीनही मिळकती आमचे अशिलांनी वरील तीनही शेतजमीनीचे मालक किशोर गोपीनाथ वाडी रा. फ्लॅट नं. ४, अर्थव अपार्टमेंट वैभव नगर, पोलीस क्लब जवळ, धुळे ता. जि. धुळे यांचे कडून कायमस्वरुपी विकत घेणे कामी सौदा केला असून लवकरच सदरची शेत जमीन आमचे अशिल शेत मालक यांचे कडून नोंदणीकृत खरेदीखताने विकत घेणार आहेत.

तरी उपरोक्त मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, गहाण, तारण, टांच, बक्षिस, बोजा, लीज, सौदा, करार, मुखत्यार, तसेच कोणत्याही प्रकारचा व्यवसायापोटी गहाण, तारण चा तबदिलीचा व्यवहार असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसांच्या आत आमचे खालील पत्त्यावर मिळकती संबंधीत मुळ कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमानपत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. वरील मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची लेखी हरकत न आल्यास सदरची मिळकत ही निर्बोज समजण्यात येवून आमचे अशिल वर नमूद मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार मिळकतीचे मालकांशी पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास ती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहिती व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. दि. २६/०९/२०२६

**ॲड.धर्मराज एन. महाजन** मो.९४२३१९११७८
२३ अ, विजय पोलीस कॉलनी, वाडीभोकर रोड, देवपूर, धुळे

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, व सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन : १) मौजे गाव कासविहीर शिवार ता. जि. धुळे येथील शेत गट नं. २७/२/क भोगवटदार वर्ग -१, यांसी क्षेत्र ०२ हेक्टर ०० आर. आकार ९ रुपये यांसी चतु:सिमा महसूल दप्तरी प्रमाणे तसेच २) मौजे गाव कासविहीर शिवार ता. जि. धुळे येथील शेत गट नं. २७/२/ड भोगवटदार वर्ग-१ यांसी क्षेत्र ०२ हेक्टर ०० आर आकार ९ रुपये यांसी चतु:सिमा महसूल दप्तरी प्रमाणे असून, वरील दोन्ही मिळकती आमचे अशिलांनी वरील दोन्ही शेतजमीनीचे मालक वृषाली प्रविण वाडी रा. फ्लॅट नं. ३०१, संतकृपा, केशर नगर, देवपूर, धुळे ता. जि. धुळे यांचे कडून कायमस्वरुपी विकत घेणे कामी सौदा केला असून लवकरच सदरची शेत जमीन आमचे अशिल शेत मालक यांचे कडून नोंदणीकृत खरेदीखताने विकत घेणार आहेत.

तरी उपरोक्त मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, गहाण, तारण, टांच, बक्षिस, बोजा, लीज, सौदा, करार, मुखत्यार, तसेच कोणत्याही प्रकारचा व्यवसायापोटी गहाण, तारण चा तबदिलीचा व्यवहार असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसांच्या आत आमचे खालील पत्त्यावर मिळकती संबंधीत मुळ कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमानपत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. वरील मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची लेखी हरकत न आल्यास सदरची मिळकत ही निर्बोज समजण्यात येवून आमचे अशिल वर नमूद मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार मिळकतीचे मालकांशी पूर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आल्यास ती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहिती व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. दि. २६/०९/२०२६

**ॲड.धर्मराज एन. महाजन** मो.९४२३१९११७८
२३ अ, विजय पोलीस कॉलनी, वाडीभोकर रोड, देवपूर, धुळे

## जाहीर नोटीस

**ॲड.एस. एस. शाह**
ॲडव्होकेट शहादा
ता. शहादा जि. नंदुरबार

### म. दिवाणी न्यायाधिश सो. (व. स्तर) शहादा यांचे कोर्टात

दि. कि. अर्ज नं. ४१४/२०२६

पठाण सलीम खान रशीद खान ----- अर्जदार
विरूद्ध
कोणीही नाही ----- सामनेवाला
कै. रशिदखाँ महेबुबखाँ पठाण, ----- मयत
(मृत्यु दि. ०५/१२/२००७)

अर्ज :- दि बॉम्बे रेग्युरेशेन ॲक्ट १८२७ चॅप्टर VIII चे कलम २ व ७ प्रमाणे वारस दाखला (Legal Heirship Certificate) मिळणेसाठी.

ज्याअर्थी कै. रशिदखाँ महेबुबखाँ पठाण, हे दि. ०५/१२/२००७ रोजी मौजे गरीब नवाज कॉलनी शहादा, ता. शहादा, जि. नंदुरबार येथे मयत झाले असुन त्यांचे पश्चात त्यांना १) अफशान बी रशीद खान पठाण, २) पठाण रहीमान रसीदखान, ३) पठाण सलीम खान रशीद खान, ४) पठाण कलम खा रशीद खा, ५) गफ्फार खान रशीद खान पठाण येणे प्रमाणे वारस असल्याने वर नमूद अर्जदाराने सन १८२७ चे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टमधील ८ चे कलम २ व ७ प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठी शहादा येथील म. दिवाणी न्यायाधिश सो. (व. स्तर) यांचे कोर्टात दि. ३०/१०/२०२६ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वरील अर्जासंदर्भात कोणास काही म्हणणे अगर हरकत सादर करावयाचे असल्यास ते सादर करण्यासाठी दि. ३०/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः अगर वकिलांमार्फत शहादा येथील मा. दिवाणी न्यायाधिश सो. व.स्त. शहादा यांचे न्यायालयात हजर राहुन लेखी म्हणणे सादर करावे.

तरी तमाम जनतेस या नोटिसीने कळविण्यात येते की, वर नमुद केलेल्या दिवषी किंवा नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाचे आत कोणीही वयक्ति स्वतःअगर आपल्या वकिलांमार्फत हजर न झाल्यास सदर अर्जाच्या बाबतीत कोणाचीही काहीएक तक्रार नाही असे गृहीत धरण्यात येवुन सदर अर्जांत पुढील योग्य ते हुकुम होतील याची नोंद घ्यावी.

आज तारीख २४/९/२०२६ रोजी माझे सहीनिषी व कोर्टाच्या शिक्यानिशी सदरची जाहिर नोटीस दिली आहे. आदेश

सही... सही...
क. लिपीक (कोर्टाचा शिक्का) सहा. अधिक्षक
म. दिवाणी न्यायालय, व. स्तर शहादा

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना तसेच बँका, पतसंस्था, इतर वित्तीय संस्था, सरकारी निमसरकारी संस्था व सावकार यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन : तुकडी जिल्हा धुळे पोट तुकडी तालुका धुळे पैकी मौजे सायने येथील गट नं. १८३/ पैकी खाते नं. ११२१ यासी क्षेत्रफळ १ हेक्टर ७१ आर पोट खराब ० हेक्टर ३ आर एकूण क्षेत्रफळ १ हेक्टर ७४ आर यासी आकार ३ रु. ४५ पैसे भोगवटा वर्ग १ असलेली जिरायत शेतमिळकत यासी चतु:सिमा गाव नकाशा प्रमाणे.

येणे प्रमाणे चतु:सिमातील वर्णनाची मिळकत ही श्री. मयुर कैलास कुळथे, श्री. समाधान लहू धनगर, श्री. किशोर गोविंद वाणी रा. सायने ता. जि. धुळे यांच्या मालकीची व ताबे उपभोगातील मिळकत असून त्यांनी आमचे अशिल घनश्याम चंद्रकांत माळी रा. प्लॉट नं.१४ राजेश्वर नगर, विद्यानगरी, देवपूर धुळे यांच्याकडून वरील मिळकतीच्या सौदे करारापोटी बयाणा म्हणून रक्कम स्विकारलेली आहे..

तरीही सदर वरील मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही स्वरुपाचे सौदे, करार, बक्षिस, गहाण, दान, खावटी पोटगी, लिजडिड, भाडेपट्टा,वारस हक्क, मुखत्यार, मृत्यूपत्र, बोजे, ताबा, अथवा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क व अधिकार इतर तबदिलीचे व्यवहार असतील तर सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर पुराव्यानिशी मुळ कागदपत्रांसह लेखी हरकत घ्यावी.

सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती सदर मिळकतीवर व आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या हरकती देखील विचारात घेतल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्बोज, र्निविवाद व हस्तांतरणीय आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीबाबत खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी. सदरची नोटीस आमचे अशिलांनी दिलेल्या माहिती व दाखविलेल्या कागदपत्रावरुन व सांगण्यावरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

ठिकाण धुळे दि. २६/०९/२०२६

**ॲड. परमेश्वर ए. चौधरी**
पत्ता : आधार कमल बंगलो प्लॉट नं. ४, अ नित्यानंद नगर, निरामय हॉस्पीटल मागे, ८० फुटी रोड, धुळे ४२४००१ मो. ९४२३२८९१००

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना तसेच बँका, पतसंस्था, इतर वित्तीय संस्था, सरकारी निमसरकारी संस्था व सावकार यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन : तुकडी जिल्हा धुळे पोट तुकडी तालुका धुळे पैकी मौजे देवपूर धुळे येथील सर्व्हे नं. ४७/२ पैकी प्लॉट नं. ११ यासी विस्तारीत सिटी सर्व्हे नं. २०१३ यासी क्षेत्रफळ २०२.५० चौ. मी. यापैकी दक्षिणेकडील भागाचे क्षेत्रफळ १०२.५० चौ. मी. बखळ प्लॉट मिळकत यासी चतु:सिमा खालील प्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| पुर्वेस : | रस्ता | पश्चिमेस : | सर्व्हे नं. ४७/१ |
| दक्षिणेस : | रस्ता ९ मी. | उत्तरेस : | याच प्लॉटचा उर्वरित भाग |

येणे प्रमाणे चतु:सिमातील वर्णनाची मिळकत ही श्री. तुषार दिगंबर परदेशी रा. सप्तशृंगी नगर, मालेगांव रोड, धुळे यांच्या मालकीची व ताबे उपभोगातील मिळकत असून त्यांनी आमचे अशिल यांच्याकडून वरील मिळकतीच्या सौदे करारापोटी बयाणा म्हणून रक्कम स्विकारलेली आहे..

तरीही सदर वरील मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही स्वरुपाचे सौदे, करार, बक्षिस, गहाण, दान, खावटी पोटगी, लिजडिड, भाडेपट्टा,वारस हक्क, मुखत्यार, मृत्यूपत्र, बोजे, ताबा, अथवा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क व अधिकार इतर तबदिलीचे व्यवहार असतील तर सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ५ (पाच) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर पुराव्यानिशी मुळ कागदपत्रांसह लेखी हरकत घ्यावी.

सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती सदर मिळकतीवर व आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या हरकती देखील विचारात घेतल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्बोज, र्निविवाद व हस्तांतरणीय आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीबाबत खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी. सदरची नोटीस आमचे अशिलांनी दिलेल्या माहिती व दाखविलेल्या कागदपत्रावरुन व सांगण्यावरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

ठिकाण धुळे दि. २६/०९/२०२६

**ॲड. परमेश्वर ए. चौधरी**
पत्ता : आधार कमल बंगलो प्लॉट नं. ४, अ नित्यानंद नगर, निरामय हॉस्पीटल मागे, ८० फुटी रोड, धुळे ४२४००१ मो. ९४२३२८९१००

## जाहीर नोटीस

श्री.संजय ओंकार पाटील रा.मोहिदे त ह., ता.शहादा, जि.नंदुरबार यांच्या सांगण्यावरुन व त्यांनी दिलेल्या तोंडी माहिती वरुन त्यांच्या तर्फे ॲड.श्री.सरजू एस. चव्हाण, शहादा यांच्या मार्फत तमाम लोकांना जाहिर नोटीस देण्यात येते की,

मौजे मोहिदे त.ह, ता.शहादा, जि.नंदुरबार शिवारातील सर्वे नं. २२४/५ मधील प्लॉट नं. १४ क्षेत्र ३००-०० चौ.मी. चा प्लॉट श्री.संजय ओंकार पाटील यांनी दिनांक ०४/०१/२००८ रोजी श्री. मिथुलाल संभु ईशी यांच्याकडून नोंदणीकृत खरेदीखताचे दस्त क.६१/२००८ अन्वये विकत घेतली आहे. आणि सदर मिळकतीवर गृह कर्ज घ्यावयाचे असल्याने सदर खरेदी खताची मुळप्रत दिनांक २१/०७/२०२६ रोजी मोहिदे त.ह. ता.शहादा, जि.नंदुरबार च्या परिसरात हरविली आहे. सदर खरेदीखत कुणासही प्राप्त झाल्यास आमच्या अशिलांच्या वर नमूद पत्यावर अथवा आमच्या कार्यालयात सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या आत आणून द्यावे ही नोटीस असे.

शहादा, दिनांक- २५/०९/२०२६.

**ॲड.श्री.सरजू एस.चव्हाण**
शहादा, ता.शहादा, जि.नंदुरबार.
**मो.नं.९८८१८६८१२८, ८३२९२७५६७०**

## जाहीर नोटीस

श्री.एस.एस.शाह, ॲडव्होकेट, शहादा
ता.शहादा, जि.नंदुरबार

### म.दिवाणी न्यायाधिश सो., (व.स्तर) शहादा यांचे कोर्टात

दि.कि.अर्ज क्रं.४१४/२०२६

पठाण सलीम, खान रशीद खान ....अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही ....सामनेवाला
कै.रशिदखॉ महेबुबखॅ पठाण, (मृत्यू दि.०५/१२/२००७) ....मयत

अर्ज:- दि. बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चॅप्टर VIII चे कलम २ व ७ प्रमाणे वारस दाखला (Legal Heirship Certificate) मिळणेसाठी.

ज्याअर्थी कै.रशिदखाँ महेबुबखॉ पठाण, हे दि.०५/१२/२००७ रोजी मौजे गरीब नवाज कॉलनी, ता.शहादा शहादा जि.नंदुरबार येथे मयत झाले असून त्यांचे पश्चात त्यांना १) अफशान बी रशीव खान पठाण, २) पठाण रहीमान रसीदखान, ३) पठाण सलीम खान रशीद खान ४) पठाण कलीम खा.रशीद खा. ५) गफ्फार खान रशीद खान पठाण येणे प्रमाणे वारस असल्याने वर नमूद अर्जदाराने सन १८२७ चे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टमधील ८ चे कलन २ व ७ प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठी शहादा येथील म.दिवाणी न्यायाधिश सो. (व.स्तर) यांचे कोर्टात दि.३०/१०/२०२६ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वरील अर्जासंदर्भात कोणास काही म्हणणे अगर हरकत सादर करावयाचे असल्यास हे सादर करण्यासाठी दि.३०/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतःअगर वकिलांमार्फत शहादा येथील म.दिवाणी न्यायाधिश सो. व.स्त. शहादा यांचे न्यायालयात हजर राहुन लेखी म्हणणे सादर करावे.

तरी तमाम जनतेस या नोटिसीने कळविण्यात येते की, वर नमूद केलेल्या दिवषी किंवा नोटीस प्रसिध्दी झाल्यापासून ३० दिवसाचे आत कोणीही व्यक्ति स्वतःअगर आपल्या वकिलांमार्फत हजर न झाल्यास सदर अर्जाच्या बाबतीत कोणाचीही काहीएक तक्रार नाही असे गृहीत धरण्यात येवून सदर अर्जात पुढील योग्य ते हुकुम होतील याची नोंद घ्यावी.

आज तारीख २४/९/२०२६ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाच्या शिक्यानिशी सदरची जाहिर नोटीस दिली आहे.

आदेशावरून

क.लिपीक (शिक्का) सहा अधिक्षक
अधिक्षक म.दिवाणी न्यायालय
(व.स्तर) शहादा

## पान १ वरुन

### धुळे जिल्ह्यातील चारसह दोनशे पासष्ट तालुक्यांत दुष्काळ जाहीर

असल्याने त्यासाठी थोडा वेळ लागणार असल्याचेही त्यांनी सांगितले. दरम्यान, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी नुकसानभरपाईचे पंचनामे पूर्ण झाल्यानंतर दिवाळीपूर्वी डीबीटीच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट आर्थिक मदत जमा करण्याचे नियोजन असल्याचे सांगितले आहे.

**दोनशे पासष्ट तालुक्यांचा समावेश**

दुष्काळ जाहीर करण्यात आलेल्या २६५ तालुक्यांमध्ये छत्रपती संभाजीनगर महसूल विभागातील ७४, अमरावती विभागातील ५६, नाशिक विभागातील ४९, नागपूर विभागातील ३९, पुणे विभागातील ३५ आणि ठाणे महसूल विभागातील १२ तालुक्यांचा समावेश आहे. नाशिक विभागातील दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार आणि अहिल्यानगर जिल्ह्यांचा समावेश आहे. धुळे जिल्ह्यातील धुळ्यासह, साक्री, शिंदखेडा आणि शिरपूर तालुक्यात दुष्काळ असल्याचे जाहीर करण्यात आले आहे.

**दुष्काळी भागांसाठी विविध सवलती**

दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सरकारकडून विविध उपाययोजना राबविण्यात येणार आहेत. त्यामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची व्यवस्था, जनावरांसाठी चारा छावण्या व चारा उपलब्ध करून देणे, शेतकऱ्यांच्या वीज बिलासंदर्भातील सवलती, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काबाबत सवलत तसेच मनरेगाअंतर्गत रोजगाराची कामे उपलब्ध करून देणे यांचा समावेश आहे. याशिवाय पीक नुकसानीची पाहणी आणि पंचनामे पूर्ण झाल्यानंतर डीबीटीच्या माध्यमातून नुकसानभरपाईची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्याचे नियोजन आहे.

**विरोधकांकडून सरकारवर टीका**

मदत मिळण्यासाठी विलंब होणार असल्याच्या सहकारमंत्र्यांच्या वक्तव्यावर विरोधकांनी टीका केली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी शेतकऱ्यांना मदत तातडीने मिळावी, अशी मागणी केली. मंत्रीच मदत उशिरा मिळणार असल्याचे सांगत असतील तर मुख्यमंत्र्यांनी याबाबत स्पष्टीकरण द्यावे, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे. दरम्यान, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सरकारने जाहीर केलेल्या दुष्काळग्रस्त क्षेत्राच्या व्याप्तीवर प्रश्न उपस्थित केला असून त्यांच्या मते राज्यातील दुष्काळाची व्याप्ती सरकारच्या आकडेवारीपेक्षा अधिक आहे.

### कबड्डीत दुहेरी सुवर्ण पुरुषांचा इराणवर विजय

लागले. दुसऱ्या हाफमध्ये भारताने इराणला ऑलआऊट करत सामन्यात महत्त्वाची आघाडी मिळवली. त्यानंतर भारतीय बचावफळीने इराणच्या खेळाडूंवर दबाव कायम ठेवला आणि अखेर भारताने ६ गुणांच्या फरकाने सामना जिंकत सुवर्णपदक निश्चित केले. या स्पर्धेत भारताच्या महिला कबड्डी संघानेही इराणचा ३७-३४ असा पराभव करत सुवर्णपदक मिळवले होते. त्यानंतर पुरुष संघानेही इराणवर विजय मिळवत कबड्डीतील दुसरे सुवर्णपदक भारताच्या खात्यात जमा केले. आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ मध्ये भारताने आतापर्यंत ४ सुवर्ण, ११ रौप्य आणि १३ कांस्य अशी एकूण २८ पदके जिंकली आहेत. पदकतालिकेत भारत १०व्या स्थानावर आहे. महिला क्रिकेट, नेमबाजी आणि महिला व पुरुष कबड्डीमध्ये भारताला सुवर्णपदके मिळाली आहेत. आशियाई क्रीडा स्पर्धेत २०२३ मध्ये भारताने एकूण १०७ पदके जिंकली होती. आता २०२६ च्या स्पर्धेत भारताची पदकांची संख्या आणखी किती वाढते, याकडे क्रीडाप्रेमींचे लक्ष लागले आहे.

### नंदुरबार जि.तील सर्व तालुके दुष्काळी

कृषी यांच्या माध्यमातून शासनाकडे तातडीने सादर करण्यात येणार आहे. दुष्काळग्रस्त म्हणून घोषित करण्यात आलेल्या तालुक्यांमध्ये शासनाने विशेष बाब म्हणून विविध उपाययोजना आणि सवलती लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये जमीन महसुलात सूट, पिक कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती, कृषी पंपाच्या चालू वीजबिलात सूट, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी यांचा समावेश आहे. ७.५ हॉर्सपावरपर्यंत क्षमतेच्या कृषी पंपांचे वीजबिल यापूर्वीच माफ करण्यात आले असून, त्यावरील क्षमतेच्या पंपांना शासन निर्णयातील सवलत लागू राहणार आहे. दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी रोजगार हमी योजनेअंतर्गत कामांचे निकष शिथिल करून जास्तीत जास्त कामे सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आवश्यक त्या ठिकाणी पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची व्यवस्था करण्यात येणार आहे. टंचाई जाहीर केलेल्या गावांमध्ये शेतकऱ्यांच्या कृषी पंपांची वीज जोडणी खंडित न करण्याचेही निर्देश आहेत.शेतीवर अवलंबून असलेल्या शेतकरी व शेतमजुरांना अन्नधान्याची टंचाई भासू नये यासाठी आवश्यक व्यवस्था करण्याबरोबरच जनावरांसाठी पुरेसा चारा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी प्रशासनावर सोपविण्यात आली आहे. तसेच जलसंधारणाची कामे सुरू करणे आणि शासनाच्या यापूर्वीच्या निर्देशानुसार पिण्याचे पाणी व जनावरांच्या पाण्याचे नियोजन करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

दरम्यान, दुष्काळग्रस्त तालुक्यांमधील शेतकऱ्यांना पिकांच्या नुकसानीबाबतची मदत पंचनामे व विहित कार्यपद्धती पूर्ण झाल्यानंतर स्वतंत्र शासन निर्णयाद्वारे जाहीर करण्यात येणार आहे. त्यामुळे नंदुरबार जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे लक्ष आता होणाऱ्या पंचनाम्यांकडे आणि त्यानंतर जाहीर होणाऱ्या पीकनुकसान मदतीकडे लागले आहे. दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे नंदुरबार जिल्ह्यातील अनेक आदिवासी मजूर हे पर जिल्ह्यात व परराज्यात स्थलांतर करायला लागले आहेत.

### मिल परिसरात तरुणावर हल्ला

त्यावरुन वाद घातला, हाताबुक्क्यांनी मारहाण करीत तलवारीने जीवघेणा हल्ल्याचा प्रयत्न केला. त्याच्या मोटारसायकलची तोडफोड करून नुकसान केले. याप्रकरणी तेजस बागुल, प्रथमेश राजपूत यांच्यासह अन्य दोन संशयितांविरुद्ध धुळे शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

### विसर्जन प्रसंगी पाण्यात बुडाल्याने युवकाचा मृत्यू

मधील खासगी रुग्णालयात आणि तेथून श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल केले. तेथे डॉ. पूजा चक्रवर्ती यांनी गणेश शिंदे यास मृत घोषित केले. धुळे तालुका पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद झाली.

### प्रशासनाची पावसाची नोंद संशयास्पद

संवाद साधला. त्यानंतर त्यांच्यातर्फे निवेदन जारी करण्यात आले. त्यानुसार, महसूल मंडळांतर्गत नोंदवलेले पर्जन्यमान खूप जास्त दाखवण्यात आले आहे. बांधावरील भेटीदरम्यान, शेतकऱ्यांनी अत्यंत कमी पाऊस झाला असल्याचे सांगितले. मुखेड येथील पाझर तलावात केवळ १५ टक्के पाणीसाठा आहे तर या मंडळात मात्र जास्त पाऊस नोंदवण्यात आला आहे. प्रशासनाच्या संशयास्पद आकडेवारीमुळे शेतकऱ्यांना शासनाच्या योजना, नुकसान भरपाई आदिंपासून वंचित राहावे लागण्याची भीती आहे. त्यामुळे प्रत्येक गावाचा स्वतंत्र वस्तुनिष्ठ अहवाल प्रशासनाने तयार करावा व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे करण्यात आली.

### पुढच्या वर्षी लवकर या..ची आर्त हाक देत

मुर्ती बसवून विधीवत पूजन व आरती करत अखेर विसर्जन केले. गणपती बप्पा मोरया...पुढच्या वर्षी लवकर च्या गजरात अनेक गणेश मंडळांनी आपापल्या मुर्ती शहरातील आग्रारोड या प्रमुख मार्गाने भव्य मिरवणूक काढली. शहरातील खुनी गणपती येथून दरवर्षाप्रमाणे या ही वर्षी भव्य पालखी मिरवणूक काढण्यात आली. या गणपती मिरवणूक जुने धुळ्यातील खुनी मशीद समोर प्रथेप्रमाणे काही काळ थांबवण्यात आली. यावेळी शहराचे आ.अनुप अग्रवाल, माजी खा.डॉ.सुभाष भामरे, भाजपा जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, खा.डॉ.शोभा बच्छाव यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. मिरवणुक मार्गात भाविकांसाठी पिण्याचे पाणी, खाद्य पदार्थांची सोय अनेक मान्यवरांकडून करण्यात आली. त्या माजी आ.राजवर्धन कदमबांडेंच्या हस्ते भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.

## पान १ वरुन

### ढोल-ताशांच्या गजरात, गुलाल उधळत गणेश विसर्जन

परंपरा आहे. पुणे आणि मुंबईच्या गणेशोत्सवाप्रमाणेच नंदुरबारच्या गणेशोत्सवाला मोठे मानाचे स्थान प्राप्त झाले आहे. पारंपरिक लेझीम, गोफ नृत्य, ढोल-ताशांचे पथक आणि मोठ्या प्रमाणात होणारी गुलालाची उधळण ही नंदुरबारच्या गणेशोत्सवाची वैशिष्ट्ये आहेत. यंदाही अवाढव्य गणेशमूर्ती, आकर्षक आरास आणि विविध सांस्कृतिक उपक्रम पाहण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. सोशल मीडियाच्या माध्यमातून नंदुरबारच्या गणेशोत्सवाची देशासह जगभरात चर्चा झाली.

गणेशोत्सवाच्या बारा दिवसांत आरोग्य शिबिरे, रक्तदान शिबिरे, प्रबोधनात्मक कार्यक्रम तसेच विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. नंदुरबारसह नवापूर आणि शहादा शहरातही गणेशोत्सवाचा उत्साह पाहायला मिळाला. यंदाच्या गणेशोत्सवात कोट्यवधी रुपयांची आर्थिक उलाढाल झाल्याचे चित्र दिसून आले.

नंदुरबारच्या गणेशोत्सवाला पूर्वी अनेकदा दंगलीचे गालबोट लागले आहे. त्यामुळे यंदा पोलिसांनी पूर्व इतिहासाचा आढावा घेत मोठा बंदोबस्त तैनात केला होता. जिल्हा पोलीस अधीक्षक अश्विनी सानप यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी मिरवणुकीच्या मार्गांवर विशेष बंदोबस्त ठेवला. माळीवाड्याच्या राजा गणपतीची भव्य मिरवणूक, श्री दादा गणेशाची रथातून निघणारी मिरवणूक आणि मध्यरात्रीनंतर होणारी श्री दादा व श्री बाबा यांची हरिहर भेट हे पोलिसांसाठी महत्त्वाचे आव्हान असते. मात्र यंदा कोणत्याही अनुचित प्रकाराला वाव न देता सर्व मिरवणुका शांततेत पार पडल्या.

विसर्जन मिरवणुकांमध्ये माजी खासदार डॉ. हिना गावित आणि सुप्रिया गावित यांनी लेझीम नृत्यात सहभाग घेतला. अनेक महिलांनीही लेझीम नृत्य सादर करत मिरवणुकीत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. अंबिका मंडळाच्या पथकानेही आकर्षक नृत्य सादर केले. हजारो गणेशभक्त मिरवणुकीत सहभागी झाल्याने शहरातील रस्ते दुतर्फा गर्दीने फुलून गेले होते. अनेक ठिकाणी पाय ठेवायलाही जागा नसल्याचे चित्र होते. मिरवणुकांमुळे काही काळ वाहतुकीची कोंडीही झाली.

शक्तीसागर मित्र मंडळ, तात्या गणपती, महाराणा प्रताप गणेश मंडळ, खासगी दादा, मामा, काका, मोठा मारुती यांसह शहरातील प्रमुख गणेश मंडळांच्या मिरवणुकांमध्ये उत्साह शिगेला पोहोचला होता. आमदार चंद्रकांत रघुवंशी मित्र मंडळाच्या वतीने विविध गणेश मंडळांच्या अध्यक्षांचा सत्कार करण्यात आला.

विसर्जन मिरवणुकीच्या दुसऱ्या दिवशी शहरातील प्रमुख मार्ग गुलालाने माखले होते. यंदा गणेशोत्सवाच्या काळात पाऊस न पडल्याने गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी सुटकेचा निश्वास सोडला. जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती असतानाही नंदुरबारच्या गणेशोत्सवातील उत्साहावर त्याचा परिणाम जाणवला नाही. ढोल-ताशांचा गजर, लेझीमचा ठेका, गुलालाची उधळण आणि हजारो भाविकांच्या उपस्थितीत २१ तास चाललेल्या विसर्जन मिरवणुकांनी नंदुरबारचा गणेशोत्सव दिमाखात संपन्न झाला.

### बांधावर पोहोचल्या खा.डॉ. बच्छाव

करू नये, त्यांच्या अडचणी शासनाच्या निदर्शनास आणून देऊन आवश्यक त्या उपाययोजनांसाठी पाठपुरावा करण्यात येईल, असा विश्वास त्यांनी शेतकऱ्यांना दिला.

पाहणी दौऱ्यादरम्यान महसूल, कृषी, पंचायत समिती, पशुसंवर्धन, ग्रामीण पाणीपुरवठा तसेच संबंधित विभागांचे अधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते. गावनिहाय पर्जन्यमान, पिकांची सद्यस्थिती, संभाव्य पीकनुकसान, पाणीटंचाई, चारा उपलब्धता आणि आवश्यक शासकीय उपाययोजनांची अद्ययावत माहिती संकलित करण्याच्या सूचना खासदारांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

दुष्काळी परिस्थितीचा केवळ कार्यालयीन अहवालावर अवलंबून न राहता प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन वस्तुस्थिती जाणून घेण्यावर या पाहणी दौऱ्यात भर देण्यात आला. शेतकऱ्यांनी मांडलेल्या अडचणींच्या आधारे आवश्यक त्या शासकीय उपाययोजना करण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने कार्यवाही करावी, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या दौऱ्या दरम्यान जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष युवराज करनकाळ तसेच शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते..

शेतकरी हा केंद्रबिंदू मानून प्रत्यक्ष परिस्थिती समजून घेणे आणि त्यांच्या अडचणी शासनापर्यंत पोहोचवणे ही आपली जबाबदारी आहे. शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत मिळण्यासाठी प्रशासनाशी समन्वय साधून पुढील कार्यवाही केली जाईल, असे खा.डॉ. बच्छाव यांनी यावेळी सांगितले.

सागवान व साल लाकडाचे तयार दरवाजे चौकट फ्रेम, पॉलिश केलेले सागवान शटर्स, फ्लश डोअर, कोटींग दरवाजे, PVC फायबर दरवाजे, RCC सिमेंटचे कलर चौकट व खिडकी तसेच प्लास्टो कंपनीची पाण्याची टाकी इ. उत्तम क्वॉलिटी वाजवी रेटमध्ये मिळण्याचे एकमेव ठिकाण...



शंकर विजय सॉ मिल
प्रकाश टॉकीज समोर, पारोळा रोड, धुळे
फो. 9595397718, 9665886722

**भाड्याने उपलब्ध**

धुळे विमानतळ प्लाझा येथे भाड्याने जागा उपलब्ध गोंदूर विमानतळ रोड, धुळे येथे शो-रूम, ऑफिस व गोडाऊनसाठी प्रशस्त जागा भाड्याने उपलब्ध.
पाणी व वीज सुविधा उपलब्ध जागा वापरण्यास पूर्णतः तयार उपलब्ध जागा व मासिक भाडे :

* शो-रूम क्र.१-४३५ चौ.फुट रू.२५,०००/- प्रतिमाह
* शो-रूम क्र.२-६५१ चौ.फुट रू.३०,०००/- प्रतिमाह
* ऑफिस/गोडाऊन क्र.३-७७० चौ.फुट रू.२५,०००/- प्रतिमाह
* ऑफिस/गोडाऊन क्र.४-७३५ चौ.फुट रू.२५,०००/- प्रतिमाह
* ऑफिस/गोडाऊन क्र.५-१,०१५ चौ.फुट रू.३०,०००/- प्रतिमाह

व्यवसाय सुरू करण्यासाठी उत्तम लोकेशन त्वरित ताबा उपलब्ध
-: संपर्क :-
श्री. गणेश: ९९२३४५८२१३
श्रीमती भगवती: ९८२००६०५२०

## पान १ वरुन

### अतिक्रमणासह अवाढव्य वाहनांमुळे

दिसून येत आहे. सोनगीर हे जुन्या लोकवस्तीचे गाव असल्याने येथील मुख्य रस्ते मुळातच अरुंद आहेत; त्यातच रस्त्यांवर झालेल्या अतिक्रमणांमुळे हे रस्ते आणखीच अरुंद झाले आहेत. मिरवणूक मार्ग असलेल्या बागुल गल्ली, गांधी चौक, ग्रामपंचायत चौक, संत सावता महाराज चौक, मुख्य बाजारपेठ, अकबर चौक, आंबेडकर चौक आणि बजरंग चौक या भागातून ही अवाढव्य वाहने काढताना मंडळांची आणि चालकांची मोठी कसरत होते. यंदा विसर्जन मिरवणूक सुरळीत सुरू असताना, एका सार्वजनिक गणेश मंडळाचे आकर्षक सजावट केलेले बँड पथकाचे वाहन माळी मंगल कार्यालयाजवळील अरुंद, वळण असलेल्या ठिकाणी अडकले. अरुंद रस्ता, हवाई अतिक्रमण आणि वाहनाचा आकार मोठा असल्यामुळे ते वाहन पुढे नेणे अशक्य झाले. सुमारे दीड ते पावणेदोन तास ते वाहन बाहेर काढण्याचे शर्थीचे प्रयतक सुरू होते. अखेर, ते वाहन पुढे न जाता आले नसल्याने मागील बाजूने मागे घेऊन कसेबसे बाहेर काढण्यात आले. या सर्व प्रकारामुळे या मंडळाच्या मागे असलेल्या इतर सर्व गणेश मंडळांची मिरवणूक तिथेच थांबून राहिली.

गणेशोत्सवापूर्वी पोलीस प्रशासनाने आयोजित केलेल्या शांतता समिती व मंडळांच्या बैठकांमध्ये विसर्जन मिरवणुकीची वाहने गावातील अरुंद आणि अडचणीच्या ठिकाणी अडकणार नाहीत, वाहनांचा आकार मर्यादित ठेवावा, अशा सक्त सूचना वारंवार दिल्या होत्या. मात्र, प्रशासनाच्या या सूचनांकडे मंडळांनी दुर्लक्ष केल्याचे या घटनेवरून स्पष्ट झाले आहे.या व्यत्ययामुळे अनेक सार्वजनिक गणेश मंडळांच्या श्रींच्या मूर्तींचे विसर्जन करण्यास मोठा विलंब झाला. गणेशभक्त व ग्रामस्थांमध्ये या गोंधळाची आणि गणेश मंडळांच्या नियोजनाच्या अभावाची जोरदार चर्चा रंगली असून, भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी अतिक्रमणावर कारवाई करण्याची आणि विसर्जन वाहनांच्या आकारावर नियंत्रण आणण्याची मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.

### नवापूर पोलिसांची मोठी कारवाई

श्रीमती अश्विनी सानप, अप्पर पोलीस अधीक्षक आशिष कांबळे, उपविभागीय पोलीस अधिकारी नंदुरबार हनुमंत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली नवापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अभिषेक पाटील यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. या पथकात पोहे कॉ किशोर वळवी, पो हे का अनिस गावीत, पो हेकॉ जितेंद्र सूर्यवंशी, पोहेकॉ. अमोल जाधव, पोना. दिनेश शिरसाठ, पोकॉ. अतुल पानपाटील, पोकॉ. दिनकर चव्हाण, पोकॉ. गणेश बच्छे, पोकॉ.संदीप काटके व पोशि.प्रमोद गुजर यांचा सहभाग होता.

## पान १ वरुन

### जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची ६९ वी वार्षिक सभा संपन्न

मा.अध्यक्ष साहेब व मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी समाधानकारक निरसन केले. त्यानंतर विषय पत्रिकेवरील मागील सभेचे इतिवृत्त कायम करणे, आगामी वर्षाचे बजेट मंजूर करणे, इत्यादी सभेचे अधिकृत कामकाज चालू असताना आयत्या वेळचा विषयात बँकेचे संचालक चंद्रकांत रघुवंशी यांनी अध्यक्षांच्या पूर्वपरवानगीने धुळे व नंदुरबार या दोन्ही जिल्यातील पावसाची प्रचंड तूट व कोरड्या दुष्काळाचे सावट असल्यामुळे बळीराजाच्या सद्यस्थितीकडे सभागृहाचे लक्ष वेधले. दोन्ही जिल्ह्यांमध्ये यंदा पर्जन्यमानाचे प्रमाण अत्यंत अत्यल्प राहिले आहे. पावसाअभावी विहिरी, बोअरवेल आणि स्थानिक जलस्रोतांची पातळी खालावली असून दोन्ही जिल्ह्यांत गंभीर कोरड्या दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे.

अध्यक्षीय भाषणात बाबासाहेब कदमबांडे म्हणाले की, जिल्हा मध्यवर्ती बँक ही केवळ एक वित्तीय संस्था नसून ती शेतकऱ्यांची कामधेनू आणि जीवनवाहिनी आहे. संचालक चंद्रकांत रघुवंशी यांनी मांडलेली दुष्काळाची व्यथा ही प्रत्येक शेतकऱ्याच्या घरातली वस्तुस्थिती आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकरी बांधव मोठ्या संकटात सापडले आहेत, अशा कठीण काळात जिल्हा बँक बळीराजाच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहील. सभेने मंजूर केलेला संपूर्ण कर्जमाफीचा ठराव आम्ही तातडीने मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, महसूल मंत्री व सहकार विभागाकडे सादर करू. व केवळ पत्रव्यवहार न करता, दोन्ही जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शासनस्तरावर शासनदरबारी प्रत्यक्ष पाठपुरावा केला जाईल. पुढे बोलताना राजवर्धन कदमबांडे म्हणाले की शेतकरी जगला तरच सहकार टिकेल, हा विचार समोर ठेवून जिल्हा बँक नेहमीच शेतकरी हिताला सर्वोच्च प्राधान्य देईल. बँकेच्या प्रगतित सभासदांची मोलाचे सहकार्य असल्याचे असा विश्वास त्यांनी शेवटी व्यक्त केला.

### जितेंद्र सोनवणे

धुळे, दि.२६- धुळे येथील पत्रकार नरेंद्र वामन सोनवणे यांचे लहान बंधू जितेंद्र वामन सोनवणे अल्पशः आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ५० वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात दोन भाऊ, एक बहीण, पत्नी, मुलगा, मुलगी, असा परिवार आहे.



**अकाउंटंट पाहिजे**
फॅक्टरीसाठी अनुभवी अकाउंटंट आवश्यक. Tally, GST व अकाउंटिंगचे ज्ञान आवश्यक.
राहण्याची व जेवणाची सोय कंपनीकडून
दर २ ते २.५ महिन्यांनी ३-४ दिवसांची सुट्टी.
नोट: वर्षातील ५-६ महिने बाहेरगावी राहण्याची तयारी असणाऱ्यांनीच संपर्क साधावा. ४-५ महिने धुळे येथील ऑफिसला काम.
-: संपर्क :-
8554057113

**प्लॅट भाड्याने देणे आहे**
सर्व सोईयुक्त 1 BHK फ्लॅट
२४ तास पिण्याचे पाणी व गरम पाण्यासह फ्लॅट भाड्याने देणे आहे.
पत्ता : -
पार्श्वनाथ अपार्टमेंट
अशोक नगर पाण्याची टॉकीसमोर जमनागिरी रोड, धुळे
-: संपर्क :-
92091109678

**पाहिजेत**
सेल्समन : २ पुरुष
हेल्पर : २ पुरुष
-: संपर्क :-
स्वर्ण पॅलेस
आग्रारोड,
सराफ बाजार,धुळे
फोन नं. O2562 / 232428 / 355891

**साक्री येथे प्लॉट**
प्लॉट साक्री आमच्याकडे प्राईम लोकेशन मध्ये प्लॉट आहेत नविन प्लॉट योग्य दरात स्वीकारले जातील.
-: संपर्क :-
9096219686

**भाड्याने पाहिजे**
धुळे सिटीमध्ये रो हाऊस किंवा 2-3 BHK FLAT भाड्याने पाहिजे
-: संपर्क :-
9724681538

**भाड्याने देणे आहे**
अलक नंदा क्रिकेट ॲकेडमी भाड्याने देणे आहे.
चावरा हायस्कूलच्या पाठीमागे. कार्तिक उद्यानला लागून
-: संपर्क :-
9405466937
9422789513

**अकौंटंट पाहिजे**
लेडीज/जेन्टस
-: संपर्क :-
भाग्यश्री कृषी सेवा केंद्र
पारोळा रोड,
प्रकाश टॉकीजसमोर,
धुळे
9423135555

**प्लॉट विकणे आहे**
नगांव येथील अंदाजे १००० स्क्वे.फुट प्लॉट योग्य किंमत आल्यास त्वरीत विकणे आहे.
-: संपर्क :-
प्रसाद पाटणकर
9422275567

**पाहिजेत**
अनुभवी/नविन
पेट्रोल पंपाच्या कामासाठी कर्मचारी पाहिजे.
चांगला पगार/वेतन देण्यात येईल.
-: संपर्क :-
सुपर सर्वो सेंटर
पांझरा पोळ समोर,
पारोळा रोड, धुळे

**पाहिजेत**
मशीन ऑपरेटर
बॅनर प्रिंटींग मशीनसाठी
लक्ष डिजीटल
सुभाष पुतळा मागे,
औदुंबर मारुती मंदिर, ग.नं.७ धुळे
मो.87931 82796 / 9764832896

**पाहिजेत**
अनुभवी सेल्समन पाहिजे.
आकर्षक पगार
-: संपर्क :-
साईबाबा रेडिमेड & होजीअरी
गल्ली नं. २, अकबर चौक, धुळे
9422286958
पगार १० ते १२ हजार

**प्लॉट विकणे आहे**
33X60 प्लॉट दत्त मंदिर चौक, माहेर हॉस्पिटल जवळ, देवपूर, धुळे
-: संपर्क :-
LG प्रॉपर्टीज
9793093955

**पाहिजेत**
कॉस्मेटीक्स् मॉल मध्ये सेल्समन व सेल्सगर्ल पाहिजे
बीलींगसाठी कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजे.
-: संपर्क :-
कॉस्मेटीक्स् मॉल
9422287548

**WANTED**
Full Trained Pharmacist &
Experiance Must
(3 Year)
Send Resume
9823833108

**घर विकणे आहे**
ग. नं. १, जुने धुळे येथील (मोठ्या पुलाजवळ) मारुती मंदिरा जवळील घर योग्य किंमत आल्यास विकणे आहे. त्वरित व्यवहारास प्राधान्य
-: संपर्क :-
9822494081

**बागायत शेती पाहिजे**
धुळे लगत १५ ते २० एकर पर्यंत बागायत शेती पाहिजे
-: संपर्क :-
8329593850

५९ वर्षांपासुन धुळेकरांच्या विश्वासाला पात्र ठरलेले...
Authorised Dealer
Godrej
LG Life's Good
सर्व आधुनिक व लेटेस्ट मॉडेल
Japan Premium



0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
BAJAJ FINSERV
HDB FINANCIAL SERVICES
*नियम व अटी लागु
श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे, फोनः (02562) 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०